ग्रंथदेवो भव।
ग्रंथालय भारती

# ग्रंथ भारती

## दिवाळी २०२१

किंमत ७५ रुपये




खुल जा सिम सिम



# ग्रंथ भारती

## दीपावली विशेषांक

## २०२१


मुख्य संपादक

**रवींद्र गुर्जर**

**(९८२३३२३३७०)**

□

संपादक मंडळ

**प्रा. विश्वास नेरकर**

**रवींद्र गोविंद पांडे**

□

संपादन -साहाय्य

**डॉ. ज्योत्स्ना कोल्हटकर**

**डॉ. अनुजा कुलकर्णी**

**सुधीर इनामदार**

**हितेश ब्रिजवासी**

**भानुदास शौचे**

□

जाहिराती सजावट / मुखपृष्ठ

**अशोक बोकील, पुणे**

□

अक्षरजुळणी

**भंडारी मुद्रणालय**

आनंदनगर, सिंहगड मार्ग

पुणे ४११०५१.



**कार्यालयाचा पत्ता :**

२२५, विवेकानंद वाचनालय,

गांधीनगर, नागपूर

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

**बाबासाहेब देशपांडे**

६८-अ, शिवाजीनगर, नागपूर ४४००१०.

फोन नं. ०७१२-२२४८९५२

ई-मेल : granthalayabharti@gmail.com



लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय



'ग्रंथ भारती'चा (ऑनलाईन) 'दीपावली २०२१' अंक सादर करताना संमिश्र भावना आहेत. सुमारे दोन वर्षे देशाला त्रस्त आणि ग्रस्त करणारी महामारी जवळजवळ आटोक्यात आली आहे. जनजीवन पूर्वपदाला येत आहे. मंदिरे, बागा, हॉटेल्स, थिएटर्स इ. सुरू झालेली आहेत. या गोष्टीचा एकीकडे आनंद आहे; तर दुसरीकडे ग्रंथालयांसह साहित्य क्षेत्राला आलेली मरगळ दूर होण्यासाठी काही काळ जावा लागणार आहे, याची चिंताही आहेच. 'पुनश्च हरि ओम्' म्हणून सगळे कामाला लागलेले आहेत, हेही दिलासादायक आहे.

अन्य संस्थांप्रमाणे 'ग्रंथालय भारती'चे कामही या काळात थंडावलेले होते. त्यावर काही उपायही नव्हता. 'ग्रंथ भारती'च्या फेब्रुवारी २०२०मधील छापील 'कोकण विशेषांका'नंतर जे काही मोजके अंक निघाले ते ''ऑनलाईन' स्वरूपात. समस्त कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे हा अंक प्रकाशित करण्यासाठी उत्साह मिळाला. आमचे नेहमीचे हितचिंतक आणि जाहिरातदारांनी चांगला प्रतिसाद दिला आहे.

आपल्या संस्थेतर्फे नुकताच संपन्न झालेला एक उल्लेखनीय कार्यक्रम म्हणजे मा. केंद्रीय मंत्री नितिनजी गडकरी यांच्या उपस्थितीत झालेली 'झूम' भेट. प्रा. हितेश ब्रिजवासी यांच्या पुढाकाराने आणि इतरेजनांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वी झाला. या अंकात त्या विषयीचा अहवाल दिलेला आहे. यंदा पाच अनुवादित कथांचा समावेश झालेला आहे.

आता ग्रंथालयेही सुरू झाली आहेत; परंतु वाचकांची ये-जा मंदावलेली आहे. सरकारच्या मते पुस्तके हा जीवनावश्यक घटक नाही. त्यामुळे 'पॅकेज' तर सोडाच; पण अनुदान देखील पूर्ण आणि वेळेवर मिळणे दुरापास्त झाले आहे. खाजगी आणि सार्वजनिक ग्रंथालयांची महाराष्ट्रातील संख्या सुमारे १५-१६ हजार असेल. तसा विचार केला, तर ही फार मोठी शक्ती आहे. ग्रंथालय भारती आणि जिल्हा ग्रंथालय संघांनी एकत्र येऊन काही महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घ्यावेत. परदेशात खासगी उद्योजक आणि उदार देणगीदारांच्या आश्रयाने ग्रंथालये 'सशक्त' आणि स्वयंपूर्ण झालेली दिसतात. आपण तसा प्रयत्न का करू नये? विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

या अंकाचे सर्व लेखक, जाहिरातदार, मुद्रक, चित्रकार आणि साहाय्यक या सर्वांना मन:पूर्वक धन्यवाद. ही दिवाळी आणि आगामी वर्ष आपणा सर्वांना आनंदाचे आणि सुखसमृद्धीचे जावो!

– रवींद्र गुर्जर
मुख्य संपादक

# ग्रंथ भारती

## दीपावली विशेषांक
## २०२१



# अं|त|रं|ग


संपादकीय / २
गोमंतकातील वाचन चळवळ / प्रा. कृष्णाजी कुलकर्णी / १०
वारकरी संप्रदायाचे प्रसारक / सुनील एकनाथ वायाळ / १३
देवभाषा संस्कृत / सौ. मीना मोहकर / १५
एकात्मतेची आवर्तने / डॉ. विलास देशपांडे / १७
घर करा रे प्रसन्न / अमृता खाकुर्डीकर / १९
डॉ. मालशे प्रस्तावना खंड : विनामूल्य आणि अमूल्य / राजीव जोशी / २१
मध्यांतर / अनंत बाबूराव नाईक / २४
फर्स्ट इम्प्रेशन / डॉ. छाया महाजन / २६
'न्यूनगंड' - एक शत्रू / सौ. सुजाता देशपांडे / २८
'रायरेश्वर' शपथेची पूर्तता करायची आहे / नारायण गुणे / ३१
शान्ताबाई शेळके / ज्योत्स्ना कोल्हटकर / ३३
वागीश्वरीचा वरदहस्त लाभलेल्या शान्ता शेळके / विवेक कवठेकर / ३७
कोरोना संकट आणि बदलती समीकरणे / प्रा. हितेश ब्रिजवासी / ४०
स्वप्नभंग / अनिल अभ्यंकर / ४३
महाराजांची 'पारदर्शक' महावस्त्रे / अनु. रवींद्र गुर्जर / ४८
वाटणी / श्री. सुशांत सुप्रिय / मंजुषा मुळे / ५१
तो परत आला होता? / मराठी अनु. उज्ज्वला केळकर / ५४
वूडटाऊन / मराठी अनु. डॉ. सुषमा पाटणेकर / ५८
कंचन / अनु. मेधा मराठे / ६१
'वाचनातून विकास' : मा.ना. श्री. नितीनजी गडकरी मार्गदर्शन / ६७
देशभक्त : नाथ घाणेकर / प्रा. डॉ. सुरेश गायकवाड / ६९
निखळलेला तारा / श्रीराम ओक / ७३
संस्था-वृत्त / रवींद्र पांडे / ७५


## कविता :


■ शैशवगान । ७६ ■ अंधारगर्भी । ७७ ■ ती रात्र नि:शब्द होती । ७७ ■ तो... । ७८
■ नातं गुरुशिष्याचं । ७९ ■ उदे ग अंबे उदे... । ८० ■ वरदहस्त तुझा लाभू दे । ८०
■ शुभ हो घटस्थापना । ८१ ■ हर जागर । ८१ ■ मुलगी । ८२ ■ व्यथा । ८३
■ शेतकरी बाप । ८४ ■ स्त्री । ८५ ■ स्त्री । ८६


'ग्रंथालय भारती'
दिवाळी अंकास
हार्दिक शुभेच्छा!
DEPOSIT OVER 1451+ CRORES
सोने तारणकर्ज
ए.टी.एम.
PAY DIRECT
ICICI Bank
VISA
धनंजय तांबेकर
व्यवस्थापकीय संचालक
सौ. राजश्री हेमंत पाटील
अध्यक्ष
गोदावरी अर्बन
मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑप. सोसायटी लि; नांदेड
कार्यक्षेत्र : महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा, गुजरात
मुख्यालय:सूर्यवंशी कॉम्प्लेक्स, तरोडा नाका, नांदेड - 431 605 फोन : (02462) 267277
Email : adv@godavariurban.com
प्रशासकीय कार्यालय : रिजेंट चेंबर्स, पहिला मजला, स्टेटस हॉटेलच्या वर, नरीमन पॉईंट, मुंबई - 400 021
यवतमाळ शाखा : वर्मा कॉम्प्लेक्स, दत्त चौक, यवतमाळ. फोन : 07232-237877/244877
Email : BRops-YTM04@godavariurban.com
मेन लाईन शाखा : श्याम टॉकीज चौक, माकडे कॉम्प्लेक्स, मेन लाईन रोड,
यवतमाळ. फोन : 07232- 248877 Email : BRops-YML49@godavariurban.com
follow us on www.godavariurban.com
■ गृहकर्ज ■ वाहनकर्ज ■ व्यवसाय-उद्योगकर्ज ■ महिला स्वयंसहाय्यता समूहकर्ज
■ पर्यटन कर्ज ■ गोदामपावती कर्ज ■ मासिक योजना ■ मुदत ठेव योजना ■ दाम दुप्पट योजना
■ आवर्त ठेव योजना ■ लॉकरची सुविधा ■ कोअर बँकींग ■ एस.एम.एस.बँकींग


Experience a whole new generation choice of a elegant life style with...
Touchmatik
Switches and Smart Living Solutions
To often we underestimate the power of TOUCH... but we @Touchmatik have explored its potential to turn the world around.
With our "Smart Home Automation", Touchmatik offers you complete solutions for Switches to meet every requirement of "Home Energy Management Solutions" & "Hotel Guest room Management System" through its wide range and product basket. it has it's applications in Smart Homes, Hospitals, Malls and where ever a switch is required.
Remote
Mobile / Tab Application
Alexa Compatible
SmartHome Expo 2019
28 - 29 MAY
NEHRU CENTRE, MUMBAI, INDIA.
YOU ARE INVITED TO STALL NO. 19 P
A product by,
keetronics®
(India) Pvt. Ltd.
कीट्रॉनिक्स् (इंडिया) प्रा. लि.
'Devgiri', kothrud Ind. Estate, Near Karishma Society, Kothrud, Pune : 411 038, India.
Ms.Mukul Shetty : +91 7387047231 | 020-67257102
www.touchmatik.com

# जनता नागरी सह. पतसंस्था मर्या. यवतमाळ

## दिवाळी निमित्त सर्व ग्राहकांना, सभासदांना, समस्त जनतेस हार्दिक शुभेच्छा.

शुभेच्छुक

| श्री. अनिल ना. दडे | श्री. रामदास भा. नाईक | श्री. अजय अ. दडे |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | मुख्य कार्यकारी अधिकारी |

श्री. हेमंत ग. खपली — श्री. रवींद्र रा. ढोक
श्री. विजय अ. दडे — श्री. सोहमप्रसाद गु. ठाकरे
श्री. प्रेमकुमार शं. देशपांडे — श्री. योगेश वि. भांदक्कर
श्री. पांडुरंग ना. दोनाडकर — श्री. विनय अ. दडे
सौ. सुनंदा प्रे. देशपांडे — सौ. सायली वि. दडे

व समस्त संचालक मंडळ जनता नागरी सह. पतसंस्था मर्या. यवतमाळ



दि यवतमाळ अर्बन को-ऑप.बँक लि., यवतमाळ
THE YAVATMAL URBAN CO-OP. BANK LTD., YAVATMAL
Regd.No.YML/BNK/114
मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ 445001 - Phone : 07232 - 244241, 243703, 237442
E-mail : ho_adm@yavatmalurbanbank.com - Website : www.yavatmalurbanbank.com
ISO 9001:2015& ISO 27001:2013 CERTIFIED BANK
रु.५००० कोटी वाटचाली कडे
व्यवसाय करणारी विदर्भ-मराठवाड्यातील
अग्रगण्य सहकारी बँक
Balance Enquiry Toll Free (Missed Call) No.08045936032
FASTag
Easy to Cruise
फास्टॅग सुविधा
बँकेच्या सर्व शाखामध्ये उपलब्ध
डी.टी.एच. रिचार्ज
फास्टॅग रिचार्ज
पोस्टपेड मोबाईल बील
पोस्टपेड टेलीफोन बील
एल.पी.जी. गॅस
BBPS
सदर सुविधा उपलब्ध
वीज बील
लोन रिपेमेन्ट
करासंबंधी सर्व ऑनलाईन
चालान भरण्याची सुविधा उपलब्ध.
Income Tax
Sales Tax
T.D.S.
GST
कर्जाचे अत्यंत माफक व्याज दर 9.50%+ पासुन सुरू
त्वरित जलद सोने तारण कर्ज *
अत्यंत माफक दरात...
त्वरित कर्ज वितरण... कमीत कमी कागदपत्रात...
व्यापारी कर्ज
HYP/CC
उपलब्ध
क्रेडीट रेटींग नुसार व्याजदर (+/-)
बाळासाहेब देवरस
लघु व्यवसाय विकास योजना *
लघु व्यावसायिकांकरिता विशेष योजना
कर्ज रक्कम रु. ५ हजार ते १ लक्ष
त्वरित वाहन कर्ज *
अत्यंत माफक व्याज दरात दुचाकी व चारचाकी
वाहन खरेदी करीता कर्ज त्वरीत उपलब्ध
डॉक्टर्स व चार्टर्ड अकाउंटंट्स *
प्रोफेसर व आर्किटेक्ट
यांना सर्व प्रकारचे कर्ज आकर्षक व्याजदरात उपलब्ध
भगवान गोंटीमुकुलवार मुख्य कार्यकारी अधिकारी(प्र) | आशिष उत्तरवार उपाध्यक्ष | अजय मुंधडा अध्यक्ष
संचालक - श्री.म.प्र.देव, श्री.सु.य.सरनाईक, श्री.सं.बा.पालतेवार, श्री.चं.बा.रानडे, श्री.प्र.अ.माधमशेट्टीवार, डॉ.श्री.नि.तु.खर्चे, श्री.सं.चिं.डेहनकर, श्री.गो.द.राठोड, श्री.प्र.म.धुर्वे,
ॲड.श्री.प्र.ल.चौहान, श्री.सु.शि.कदम, श्रीमती मिरा रा.घाटे, श्री.वि.क.बरलोटा (सी.ए.), श्री.सं.रा.चिवरकर, श्री.अ.शं.नाईक (कर्म.प्रति.), श्री.म.श.गंजीवाले (कर्म.प्रति.)

# ग्रंथालय भारती

# कार्यकारिणी

**श्री. प्रभाकर (बाबा) देशपांडे,** अध्यक्ष
दूरध्वनी ०७१२-२२४८९५२

**डॉ. माधव पात्रीकर,** सचिव
भ्रमणध्वनी ९६०४९५०४०५

| | | |
|---|---|---|
| डॉ. सुधीर बोधनकर (नागपूर) | ... | कार्याध्यक्ष |
| श्री. मधुकर देवराव रानडे (यवतमाळ) | ... | उपाध्यक्ष |
| श्रीमती माणिक मदन काशीकर (रामटेक) | ... | उपाध्यक्ष |
| डॉ. सत्यनारायण राधाकिसन बाहेती (अकोला) | ... | उपाध्यक्ष |
| श्री. रवींद्र गोविंद पांडे (नागपूर) | ... | सहसचिव |
| डॉ. विलास केशवराव भिमनवार (वर्धा) | ... | सहसचिव |
| श्री. श्रीपाद श्रीधरराव देशपांडे (नागपूर) | ... | कोषाध्यक्ष |
| श्री. नेमीनाथ वर्धमान सातपुते (बुलढाणा) | ... | सदस्य |
| डॉ. सौ. मेधा सुनील देशपांडे (परतवाडा) | ... | सदस्य |
| श्री. सचिन गोविंद महाजन (अमरावती) | ... | सदस्य |
| श्री. यशवंत अनंत पाटील (यवतमाळ) | ... | सदस्य |
| श्री. दीपक महादेव वेखंडे (चंद्रपूर) | ... | सदस्य |
| श्री. वामन नारायण निचंते (नागपूर) | ... | सदस्य |
| श्रीमती स्वाती गजानन मोहरीर (नागपूर) | ... | सदस्य |
| श्री. अशोक जयकृष्ण कुरझडकर (नागपूर) | ... | सदस्य |

# आमंत्रक

| | |
|---|---|
| डॉ. हेमंतराजे गायकवाड (मुंबई) | आमंत्रक, मुंबई विभाग |
| प्रा. चंद्रकांत रा. जोशी सनपूरकर (परभणी) | सहआमंत्रक, पश्चिम क्षेत्र |
| श्री. श्यामसुंदर जोशी (बदलापूर) | आमंत्रक, कोकण विभाग |

# गोमंतकातील वाचन चळवळ : एक दृष्टीक्षेप

**प्रा. कृष्णाजी कुलकर्णी**

सुमारे ४५० वर्षांच्या परकीय सत्तेच्या जोखडातून गोमंतक मुक्त झाला. मुक्तीनंतरच्या गोव्यात अनेक क्षेत्रांत सुधारणांचे वारे वाहू लागले. भारतासारख्या खंडप्राय देशाचे हे एक निसर्गसंपन्न छोटे राज्य. केवळ परकीय सत्तेच्या अंमलामुळे गोव्याच्या खुंटलेल्या विकासाला नवी चालना मिळाली. अनेक पायाभूत सुविधांबरोबरच गोमंतकीयांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात अनेक बदल घडू लागले. पोर्तुगीज सत्तेने गोमंतकीयांवर लादलेली पोर्तुगीज भाषा मुक्त गोव्यातील परकीय जुलुम-जबरदस्तीच्या आघातानंतरही तशीच राहिली. कारण गोव्याच्या जनतेचा तो आत्मस्वर आहे. गोवामुक्तीनंतर लगेचच 'गोमंतक' हे मराठी दैनिक सुरू झाले. अल्पावधीतच हे वृत्तपत्र लोकप्रिय झाले. गेली अनेक वर्षे कोंडून राहिलेला आत्मस्वर मराठी भाषेच्या रूपाने प्रकट होऊ लागला. मुक्तीनंतर गोव्यात सर्वात महत्त्वाची गोष्ट घडली ती म्हणजे गोव्याच्या जनतेला स्वभाषेत शिक्षण घेणे शक्य झाले. स्वतंत्र गोव्याचे पहिले मुख्यमंत्री भाऊसाहेब बांदोडकर यांनी खेड्यापाड्यात, वाड्या-वस्त्यांवर प्राथमिक मराठी शाळा सुरू केल्या. शिक्षण सर्वसामान्यांच्या दारी पोहोचलो. साक्षरतेचे प्रमाण वाढू लागले. आणखीही काही मराठी दैनिके सुरू झाली. यामधून गोव्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक विश्वाचे प्रतिबिंब उमटू लागले. मुळातच गोव्याची सांस्कृतिक श्रीमंती अतिशय समृद्ध आहे. सर्व कला तर गोव्याच्या मातीतच रुजलेल्या आहेत. मुक्तीनंतर गोमंतकीयांना एक मोकळे आकाश मिळाले आणि विविधांगांनी गोव्याचे लोकजविन बहरू लागले.

गोव्याच्या शैक्षणिक क्रांतीबरोबरच गोमंतकीयांची वाचनाची भूक वाढू लागली. सर्वसामान्य माणूस 'वाचक' बनला. गोव्यातील लेखन-वाचन विशेषत्वाने मराठीच. साडेचारशे वर्षे प्रयत्न करूनही पोर्तुगीजांना आपली भाषा इथे रुजविता आली नाही. मुक्तीनंतरच्या दोन-पाच वर्षातच गोव्याने 'आपली मराठी' मानून अध्ययनाला सुरुवात केली. मराठी विश्वाला गोमंतकीयांनी फार मोठी देणगी दिली आहे. अनेक प्रतिभावंत लेखक, कवी, गायक, रंगभूमीवरील कलाकार आज महाराष्ट्र आणि संपूर्ण देशात नावलौकिकाला पोहोचले आहेत. या सर्वांचे भावविश्व अधिक समृद्ध करण्यासाठी वाचन साधनेची नितांत गरज आहे हे जाणून गोव्यात वाचनालय आणि ग्रंथालयांची चळवळ उभी राहिली. मडगाव येथील 'गोमंत विद्या निकेतन' या संस्थेने आपल्या समृद्ध ग्रंथालयांची शतकोत्तरी वाटचाल जोमाने सुरू ठेवली आहे. ग्रंथालय, वाचनालय याबरोबरच अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांनी, उपक्रमांनी गोव्याच्या जनतेला रिझवले आहे, वैचारिक मेजवानी दिली आहे. पणजी येथील 'श्री सरस्वती मंदिर' ग्रंथालयही असेच समृद्ध! गेली अनेक वर्षे शहरातील वाचकवर्गाची भूक भागविण्याचे कार्य श्री सरस्वती मंदिर वाचनालयातर्फे सुरू आहे.

प्राथमिक शिक्षणानंतर गोव्यात क्रमाक्रमाने माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन अशा स्तरावर शिक्षण घेणारा फार मोठा वर्ग आता निर्माण झाला आहे. वाचनाची व्याप्ती वाढलेली आहे. नवनवीन ज्ञानशाखा नव्या पिढीला खुणावत आहेत. हे सर्व वातावरण पाहता ग्रंथालये आणि वाचनालये आणि त्याचबरोबर अभ्यासिका यांच्या संख्येत मोठी भर पडली आहे. वाचकसंख्याही खूप मोठ्या प्रमाणात वाढली आहे. एकंदरीतच शैक्षणिक प्रसाराबरोबरच स्वतंत्र असा वाचक-चळवळीचा प्रवास आहे. समाजात सूज्ञ आणि चतुरस्र वाचक निर्माण होणे हे निकोप समाज जीवनाच्या दृष्टीने खूपच महत्त्वाचे असते. त्या वृद्धीने वाचक-चळवळ ही खूप महत्त्वाची ठरते. वाचनाची सवय बालवयापासून लावून घेणे महत्त्वाचे आहे. एकदा वाचनातली गोडी मनाला भावली तर वाचनसाधनेची साथ आयुष्यभर व्यक्तीला समृद्ध करून सोडते. त्या दृष्टीने बाल वाचकांकडे विशेष जागरूकतेने लक्ष देणे आवश्यक आहे. बाल शिक्षणाबरोबरच

'बालवाचन'ही समांतर दिशेने घडले पाहिजे. बालकांना पुस्तकांकडे आकृष्ट करण्याचे अनेक प्रयत्न चाललेले आहेत. त्यात 'चिल्ड्रेन्स कॉर्नर' हा वाचनालयांचा खास कक्ष महत्त्वाची भूमिका बजावतो आहे. आज गोमंतकात अनेक मोठ्या वाचनालयांनी प्रौढांच्या वाचन-सुविधेबरोबरच बाल वाचकांसाठी असे विशेष कक्ष निर्माण केले आहेत. इथे रंगीबेरंगी चित्रांची पुस्तके, कॉमिक्स, विविध तक्ते, नकाशे, संतांच्या आणि देशभक्तांच्या प्रतिमा अशा अनेक गोष्टींचा समावेश केला आहे. त्याशिवाय शालेय शिक्षणाशीही ह्या साऱ्या गोष्टींची सांगड घातली आहे. वाचन करणे, आपल्या मनातील प्रश्नांची उत्तरे वाचनाद्वारे मिळविणे, नव्या माहितीची भर टाकणे, नव-नव्या संकल्पना समजून घेणे, त्यांच्या नोंदी ठेवणे. संग्रह करणे, सुभाषिते आणि सुविचार यांच्या सान्निध्यात राहाणे अशा सवयी बालमनाला लागाव्यात आणि त्यामधूनच मोठेपणी वाचन-साधनेशी दृढ नाते जुळावे असा उद्देश असतो. या साऱ्या उद्देशपूर्तीसाठी प्राथमिक शाळा-शाळांतून छोटी-छोटी बाल ग्रंथालये चालविली जातात. शाळेतील शिक्षकांना मुलांच्या वर्तनाचा कल पाहून त्यांना त्या-त्या प्रकारच्या वाचनाकडे वळविता येते. या अर्थाने वाचन चळवळ ही एका अर्थाने सहशिक्षण चळवळच म्हणता येईल.

सर्वसामान्य नागरिकांचा एकंदरीत कल हा वृत्तपत्र वाचनाकडे अधिक असतो. वैचारिक आणि ललित (कथा, कादंबऱ्या, कविता) वाचनापर्यंत पोहोचणारा वर्ग तसा वेगळा आहे. शिक्षण क्षेत्राशी संबंधित नसलेल्या नागरिकांचे वाचन तुलनेने कमी आहे. तरीपण अशा वाचकांना थोडक्या वेळात वाचता येईल अशी वृत्तपत्रे व काही नियतकालिके उपलब्ध करून देणारी वाचनालये गावोगावी आहेत. उच्च माध्यमिक विद्यालये आणि महाविद्यालये यांमधून स्वतंत्र ग्रंथालये आहेत. अशा ग्रंथालयांचा लाभ त्या-त्या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना होतो. स्वाभाविकपणे अशा ग्रंथालयांमध्ये ललित साहित्याबरोबरच विविध विषयांच्या अभ्यासग्रंथांचा समावेश मोठा आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी लागणारे संदर्भ ग्रंथ आणि इतर माहिती पुस्तके उपलब्ध आहेत. याचा विद्यार्थी लाभ घेत असतात. आजमितीला गोमंतकात अकरा मराठी वृत्तपत्रे प्रसिद्ध होतात. शिवाय 'महाराष्ट्र टाइम्स', 'लोकसत्ता' यांसारखी वृत्तपत्रे नियमितपणे मिळतात. काही निवडक मासिके आणि साप्ताहिके अशा ग्रंथालयांतून एकत्रितपणे वाचावयास मिळतात. मुलांच्या शिक्षणात ग्रंथांचा उपयोग आणि अवांतर वाचन ह्याचे अनन्य-साधारण महत्त्व आहे. हे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना वाचनप्रवृत्त करण्यासाठी विविध स्पर्धा आणि उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्यानिमित्ताने विद्यार्थी अधिकाधिक ग्रंथ-मित्र कसा होईल या गोष्टीकडे कटाक्षाने लक्ष दिले जाते.

गोमंतक हे भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील एक छोटे राज्य. निसर्गसंपन्न असा पश्चिम घाटातील एक देखणा प्रदेश. प्रशासनाच्या सोयीसाठी गोव्याची विभागणी प्रामुख्याने दोन जिल्ह्यांमध्ये केली आहे. एक उत्तर गोवा आणि दुसरा दक्षिण गोवा. उत्तर गोव्यात म्हापसा, पणजीसारखी शहरे येतात. पणजी हे शहर तर गोव्याच्या राजधानीचे शहर! उत्तर आणि दक्षिण गोव्यात गोवा सरकारने ग्रंथालयाचे दोन भव्य प्रकल्प साकारलेले आहेत. ग्रंथालय विभाग हा गोव्याच्या 'कला आणि संस्कृती' या खात्यांतर्गत कार्यरत आहे. पणजी-म्हापसे येथील 'कृष्णदास शास्त्री' यांच्या नावे उभी असलेली 'सेंट्रल लायब्ररी' हे एक आदर्श ग्रंथालयाचे उत्तम उदाहरण आहे. या ग्रंथालयाची वास्तू अतिशय भव्य आणि अत्याधुनिक आहे. ग्रंथालय विविध विभागांमध्ये मांडण्यात आले आहे. अक्षरशः लाखो ग्रंथ इथे वाचकांसाठी उपलब्ध केले आहेत. शिवाय वाचनकक्ष, अभ्यासिका, नियतकालिक विभाग असे स्वतंत्र विभाग आहेत. वाचकांसाठी उत्तम आसनव्यवस्था असून सूर्यप्रकाशाचा उत्तम उपयोग या दालनांमधून केला आहे. कोणतेही नियतकालिक अथवा ग्रंथ विनाविलंब वाचकांना दिला जातो.



विशिष्ट विषयावरील नेमकी माहिती कशी मिळेल याचे मार्गदर्शनही केले जाते. सर्व ग्रंथालयाचे संगणकीकरण झाले असल्यामुळे ग्रंथ सहजपणे उपलब्ध होऊ शकतात. गोव्यातील असंख्य जिज्ञासू वाचक, अभ्यासक, संशोधक, ग्रंथप्रेमी अशांसाठी एक उत्तम अध्ययनकेंद्र म्हणून 'सेंट्रल लायब्ररी'कडे पाहता येईल. याच धर्तीवर दक्षिण गोव्यासाठी मडगावजवळच्या नावेली गावी अशीच सुसज्ज इमारत उभी करण्यात आली आहे. त्या भागातील लोकांसाठी, अभ्यासकांसाठी जवळपास ग्रंथ उपलब्ध व्हावेत अशी योजना आहे. या दोन जिल्ह्यांमधील ही दोन्ही ग्रंथालये अतिशय उत्तमरीत्या वाचन-संस्कृती राज्यभर पसरविण्याचे कार्य करीत आहेत.

गोव्यात प्रशासनाच्या दृष्टीने एकंदरीत ११ तालुके आहेत. प्रत्येक तालुक्याच्या शहरात एक तालुका वाचनालय-ग्रंथालय आहे. त्याशिवाय ही वाचन-चळवळ केवळ शहरापुरती मर्यादित न ठेवता ग्रामीण स्तरापर्यंत पोहोचविण्याचे कार्य 'कला आणि संस्कृती' विभागाने प्रभावीपणे केले आहे. त्याशिवाय दुर्मिळ आणि जुन्या वाचकप्रिय अशा उत्तमोत्तम ग्रंथांचे पुनर्मुद्रण करून वाचकांच्या हाती देण्याचे कार्यही 'कला संस्कृती' खाते करीत आहे. वाचन संस्कृतीच्या विकासाला हा पूरक असा उपक्रम आहे. ग्रामीण भागाचा विचार केल्यास अनेक ग्रामपंचायतींना ग्रामीण वाचनालय सुरू करण्यात अनुदान देण्याचे कार्यही 'कला आणि संस्कृती' खाते करते. त्यामुळे वाचन-चळवळ केवळ शहरी वाचकांपुरती मर्यादित न राहता ग्रामपातळीपर्यंत पोहोचली आहे. ग्रामपंचायतीखेरीज ज्या सांस्कृतिक कार्य करणाऱ्या संस्था गावोगावी पसरल्या आहेत, अशा संस्थांमार्फतही अनुदानित ग्रंथालये/वाचनालये चालविण्यात अर्थसाहाय्य केले आहे. खऱ्या अर्थाने ही चळवळ तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे उद्दिष्ट गाठण्यात यश प्राप्त झाले आहे. आजमितीला संपूर्ण गोवाभर ग्रामपातळीवरील सुमारे ७० ग्रंथालये कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील वाचकांची गरज भागविण्याचे कार्य ही ग्रंथालये करीत आहेत. त्याचबरोबर गोव्यातील ज्या-ज्या शहरांमधून नगरपालिका आहेत, अशा शहरांतून स्वतंत्र नगर वाचनालये आणि ग्रंथालयेही आहेत. एकंदरीतच बालवाचकापासून ते प्रौढांच्या वाचन-व्यवहाराचा विचार करून गोमंतकात विविध पातळ्यांवर वाचन-चळवळ कार्यरत आहे.

एखादे विशिष्ट पुस्तक ग्रंथालयात उपलब्ध नसेल तर दुसऱ्या शहरातील ग्रंथालयातून आणून ते वाचकाला पुरविण्याची ग्रंथ आदान-प्रदान योजनाही राबविली जाते. काही काळ महाराष्ट्र परिचय केंद्रामार्फत दिवाळी अंकांचा वाचनोत्सवही आयोजित केला जात असे. सुमारे २०० दिवाळी अंक गावातील एखाद्या सार्वजनिक सभागृहात ठेवून त्या-त्या गावातील वाचकांना उपलब्ध करून देण्याची योजना म.प्र. केंद्राने अनेक वर्षे राबविली.

ग्रंथालय म्हणजे केवळ ग्रंथ देवघेवीचे ठिकाण न राहता वाचनपूरक असे अनेक उपक्रमही ग्रंथालयांमार्फत राबविले जातात. ग्रंथदिन, एखाद्या पुस्तकावरील चर्चा, काही साहित्यिक - वैचारिक विषयावरील व्याख्यानमाला, बालवाचकांसाठी चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, पाठांतर स्पर्धा अशांसारखे अनेक उपक्रम वाचकाला अधिकाधिक वाचनप्रवृत्त करतात. आजकालच्या तरुणांना अनेक स्पर्धा-परीक्षांना सामोरे जावे लागते. अशा प्रशासकीय सेवेच्या यूपीएससीसारख्या परीक्षांना उपयुक्त ठरणारे अनेक ग्रंथ वाचनालयांतून उपलब्ध आहेत. त्याचा तरुणांना खूपच उपयोग होतो. त्याचबरोबर गावागावातून फिरणारे फिरते वाचनालयही उपलब्ध केले आहे.

उपरोक्त साऱ्या प्रयत्नांचा उद्देश एकच आहे, तो म्हणजे 'सूज्ञ वाचक वर्ग निर्माण करणे.' आजकालच्या धावपळीच्या आणि वेगवान जीवन पद्धतीत सर्वच वाचक अपेक्षित वेळ देऊ शकत नाहीत. त्यातच 'डिजिटल' माध्यमामुळे 'अक्षर-वाचन' ह्या उपक्रमाकडे मोठे दुर्लक्ष होते आहे. आपल्याला ही माहिती इंटरनेटवर सहज उपलब्ध होते. तेवढीच घ्यायची असा काहीसा कोतेपणा आजच्या अध्ययनपद्धतीला येत आहे. एखाद्या विषयाचे समग्र आणि समूळ ज्ञान संपादन करावे, ही ऊर्मी कमी होताना दिसते आहे. विशेषत: शैक्षणिक क्षेत्रात ज्ञानापेक्षा 'माहिती'ला महत्त्व प्राप्त झाले आहे. यामुळे ग्रंथांद्वारे मिळणाऱ्या समग्र ज्ञानाचा अनुभव घ्यावा, व्यक्तिमत्त्व समृद्ध बनवावे, या गोष्टी काहीशा मागे पडत चालल्या आहेत. अर्थात हा अनुभव केवळ गोव्यातील वाचनालयांचा नाही, तर ही एक जागतिक लाट आहे. तरी ह्या लाटेमध्येही ग्रंथालये/वाचनालये आपली भूमिका ठामपणे बजावीत आहेत, यात शंका नाही. या सर्व उपलब्ध साधनांचा आपल्या विकासासाठी उपयोग करून घेणे हे आपल्याच हाती आहे.

❑

# वारकरी संप्रदायाचे प्रसारक श्री संत नामदेव महाराज यांचा जीवन परिचय

**सुनील एकनाथ वायाळ**



जन्म २६ ऑक्टोबर १२७०.

संत नामदेव यांचा जन्म शिवाजी महाराजांच्याही जवळपास चारशे वर्षं आधी. तेव्हा उत्तरेत मुस्लिम सत्ता स्थिर झाली होती. दक्षिणेत त्याचा पायरव ऐकू येत होता. धर्माच्या नावाने हिंदू धर्ममार्तंड आणि मुस्लिम शासक बहुसंख्य भारतीयांना दुय्यम दर्जाचं जिणं जगण्यास भाग पाडत होते. त्याविरुद्ध संतपरंपरेनं मोठी क्रांती घडवली. फक्त महाराष्ट्रातच नाही तर देशभरातल्या या क्रांतीचं नेतृत्व नामदेवांनी केलं. ते एका शिंपी परिवारात जन्मले. त्यांचा जन्म हिंगोली जिल्ह्यातल्या नरसी गावात किंवा पंढरपुरात झाला. वडील दामाशेटी. आई गोणाई. आऊबाई बहीण. अकराव्या वर्षी लग्न झालं ते राजाईंशी. नारायण, महादेव, गोविंद, विठ्ठल ही चार मुलं. लिंबाई मुलगी. लाडाई, गोडाई, येसाई, साखराई या सुना. असा छान बहरलेला संसार त्यांनी केला. त्यांच्या देवपिसे होऊन केलेल्या भक्तीला सुरुवातीला विरोध झाला. पण नंतर त्यांनी सगळ्यांना आपलं बनवलं. या सगळ्या परिवारानेच नामदेवांच्या प्रभावात अभंगरचना केली आहे.

अगदी लहानपणापासूनच नामदेव विठ्ठलमय झाले होते. पांडुरंगच त्यांचं सर्वकाही होता. आई बाप सोयरा सखा गुरू देव स्वामी तोच होता. विठ्ठलाशी ते संवाद साधत. या बालभक्ताच्या हट्टापायी विठ्ठलाने दुधाचा नैवेद्य सेवन केला, अशी सर्वांत प्रसिद्ध कथा आहे. पुढे 'दगडाचा देव बोलत नाही', अशी आपल्या अभंगातून ग्वाही देणाऱ्या नामदेवांनी लहानपणीच आध्यात्मिक क्षेत्रात मोठाच अधिकार प्राप्त केला होता, एवढं मात्र यातून नक्कीच म्हणता येईल. पण नामदेवांची दुसरी कथा यापेक्षाही महत्त्वाची आहे. सुकी भाकरी पळवून नेणाऱ्या कुत्र्याच्या मागे तुपाची वाटी घेऊन जाणारे नामदेव, देवाला दूध पाजणाऱ्या नामदेवांपेक्षा महत्त्वाचे आहेत. ते लहान वयातच सर्वांभूती भगवंत पाहू शकत होते, हे महत्त्वाचं.

नामदेवांनी सत्य समजून घेण्यासाठी वेदज्ञ, शास्त्रज्ञांकडे हेलपाटे घातले. पण ज्ञातिहीन नामदेवांना कोण उभं करणार? त्यामुळे त्यांनी भक्तीतून म्हणजे थेट भगवंतालाच आधार मानून स्वतःच बुद्धीचा कस लावत विश्वाचे सत्य समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्याचाच एक भाग म्हणून ते लंगोटी नेसून चंद्रभागेच्या वाळवंटात कीर्तन करत सद्विचारांचा प्रसार करू लागले होते. ही वाट स्वतःच शोधायची होती. त्यातून साधनेची नवीनवी साधनं निर्माण होऊ लागली. श्रोत्यालाही सामावून घेणारी वारकरी सामूहिक कीर्तन-भजनाची मुहूर्तमेढही त्यांनीच रोवली. त्यासाठी त्यांनी अभंग या छंदाची निर्मिती केली. अभंग हा छंद गाळला, तर मराठी वाङ्मयात काय उरतं, याचा विचार केलेला बरा.

नामदेवांनीच वारकऱ्यांचा लाडका काल्याचा सोहळाही सुरू केला. तेव्हा ज्ञानेश्वर माऊलींनी नुकतीच 'भगवद्गीते'ची गंगा मराठीत आणली होती. त्यातून

नामदेवांना आपल्या कामासाठी तत्त्वज्ञानाचं अधिष्ठानच मिळालं होतं. कुशल संघटक असणाऱ्या निवृत्तीनाथांना आणि नामदेवांना एकत्र यावंसं वाटणं स्वाभाविकच होतं. त्यासाठी वयाने आणि कर्तृत्वाने ज्येष्ठ असून नामदेव स्वतः आळंदीला गेले. तिथे संत गोरा कुंभारांच्या नेतृत्वात झालेल्या संतसंमेलनांमधल्या चर्चांमधून नामदेवांना भगवद्कार्यासाठी अधिक ज्ञान मिळवण्याची गरज लक्षात आली. त्यासाठी त्यांनी औंढा नागनाथ येथे जाऊन विसोबा खेचरांकडून देवाच्या सगुण निर्गुण रूपाविषयी स्पष्टता मिळवली. याच देवळात कीर्तन करताना त्यांचा पुरोहितांनी केलेला अपमानही त्यांच्यासाठी विचारांचा 'टर्निंग पॉइंट' ठरू शकेल इतका ताकदीचा आहे, हे देखील लक्षात ठेवायला हवं.

नामदेव ज्ञानदेव भेटीतून विचारांचा नवा प्रवाह उदयाला येत होता. ज्ञान आणि भक्तीचा हा संगम होता. त्यातून कीर्तनाच्या रंगी नाचत देशभर ज्ञानदीप लावण्यासाठी दोघांच्याही प्रभावातली सगळी संतमंडळी एकत्र झाली. त्यांची एकत्र तीर्थयात्रा सुरू झाली. महाराष्ट्र पिंजून गुजरात, राजस्थान आणि पंजाबापर्यंत हे संत गेले. माणसाला माणूस बनवण्याची ही धडपड होती. नामदेव कीर्तन करत. चोखामेळ्यासारखे अस्पृश्यही टाळकरी बनून त्यांना साथ देत. जनाबाईंसारखी जातीने अतिशूद्र असणारी स्त्री कीर्तनाचं संचलन करत. ज्ञानदेव अभंग सुचवत. अशा जातीपातीच्या भिंती तुटत होत्या. गोरा कुंभार, सावता माळी, परिसा भागवत, चोखा महार आणि त्यांचा परिवार, जगन्मित्र नागा, नरहरी सोनार, दासी जनी सगळेच त्यात होते. पंजाबातून जाल्हण सुतारही पंढरपुरापर्यंत सोबत आले. हे संत म्हणजे टाळकुटे विरक्त नव्हते तर त्या त्या समाजांचे धार्मिक, वैचारिक आणि सामाजिक नेतेच होते. या ऐतिहासिक तीर्थयात्रेचं उद्यापन पंढरपुरात चंद्रभागेच्या वाळवंटावर झालं. स्पृश्य-अस्पृश्य, उच्च-नीच असे सगळे भेदाभेद सहभोजनात गळून पडले. धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या नीच जातिभेदांना दिलेला हा मोठा धक्का होता. पुढे नामदेवांनी पंढरपुरातल्या विठ्ठलमंदिराच्या दारात उभी केलेली चोखोबांसारख्या अस्पृश्याची समाधी त्यांच्या खंबीर क्रांतिकारकत्वाचा पुरावाच आहे. यानंतर लवकरच ज्ञानेश्वरांनी समाधी घेतली. त्याचा अत्यंत हृदयद्रावक आंखो देखा हाल नामेदवांनी लिहून ठेवलाय. पुंडलिकापासून जनाबाईंपर्यंतच्या भक्तांचं चरित्र लिहून नामदेवांनी या क्रांतिकारक चळवळीचं मोठंच डॉक्युमेंटेशन करून ठेवलंय.

ते महाराष्ट्रातले सगळ्यात महत्त्वाचे चरित्रकार मानायला हवेत आणि ते आद्य आत्मचरित्रकारही आहेत. त्यांनी एक कोटी अभंग लिहिले, असं मानलं जातं. याचा अर्थ त्यांनी विपुल संख्येने साहित्यरचना केली असा घ्यायला हरकत नाही. त्यांच्या साहित्याची भाषा खूपच सोपी आहे.

ज्ञानेश्वर, मुक्ताबाई, चांगदेव या त्यांच्या समकालीनांच्या तुलनेत आज आपल्याला त्यांची भाषा लगेच कळते. त्यांनी कायम अत्यंत सर्वसामान्यांसाठी लिहिलं. त्यात संवाद आणि नाट्य आहे. लोककलांचे विविध फॉर्म त्यांनी हाताळले. श्रीकृष्णाच्या लीला सांगताना त्यांनी मराठीतल्या पहिल्या बालकविताही लिहिल्या. मराठीतल्या गझलेची पहिलं पावलं शोधतानाही संशोधक त्यांच्यापर्यंत पोहोचतात, इतकं त्यांचं लिखाण वैविध्यपूर्ण आहे. तरीही त्यांचं खूपच कमी साहित्य आज उपलब्ध आहे. ज्ञानेश्वरांच्या समाधीनंतरही नामदेवांनी तीर्थयात्रा करून रामेश्वरापासून मुलतानपर्यंतचा भारत पालथा घातला. जिथे गेले तिथले बनले. लोकभाषांतून काव्य केलं. हिंदी साहित्याला नवं भान दिलं. त्यांच्या कामातूनच पुढे रामानंद, कबीर, नानक, दादू दयाळ, मीरा, नरसी मेहता, मलूकदास अशी संतांची मांदियाळी देशभर उभी राहिली. पंजाबात तर ते दोन दशकांहून अधिक काळ राहिले. तिथे त्यांनी केलेल्या मशागतीतून शीख धर्माचा वटवृक्ष उभा राहिलाय. नारायण आणि नामदेव एकच आहे असं मानणाऱ्या शीख परंपरेच्या 'गुरू ग्रंथसाहेबा'तही नामदेवांची ६१ पदं आहेत. नामदेवांचा देशभरावरचा प्रभाव आजही पाहता येतो. महाराष्ट्र आणि पंजाबाबरोबरच राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, हरियाणा, उत्तरांचल, हिमाचल प्रदेश या राज्यांत त्यांची मंदिरं आहेत. तामिळनाडूपासून जम्मूपर्यंतचे लाखो लोक त्यांचं नाव एकतर आडनाव म्हणून किंवा जातीची ओळख म्हणून अभिमानाने मिरवतात. नामदेवांनी ३ जुलै १३५० रोजी अत्यंत समाधानाने आपला देह ठेवला. त्यांची एक समाधी पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराच्या पायरीवर आहे. तर दुसरी पंजाबमधील घुमान येथे आहे.

या महाराष्ट्राच्या थोर संताने आपल्या भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन पार पंजाब प्रांतापर्यंत नेली, ही बाब आपणा सर्वांना अभिमानास्पद आहे. या संतांचे चरणी प्रणाम.

❑

# देवभाषा संस्कृत : सांस्कृतिक आणि शास्त्रीय महत्त्व सांगणारा एक उपक्रम

कार्यक्रम प्रमुख : **सौ. मीना मोहकर,** शालेय शिक्षिका, विवेकानंद प्रतिष्ठान पूर्व प्राथमिक शाळा, जळगाव

**प्रस्तावना :** आजच्या आधुनिक युगात अनेक पाश्चिमात्य संस्कृतीसोबतच तेथील बोलीभाषेचे आकर्षण आणि गरजेपेक्षा जास्त असलेले वेड हे आजच्या तरुणाईत वाढताना जाणवत आहे. याउलट आपल्या संस्कृतीबद्दलची आवड आणि महत्त्व त्यांच्या मनातून कमी होतानाचे चित्र आहे. ही परिस्थिती आपल्या राष्ट्रहिताच्या दृष्टीने अतिशय घातक असून यातून आपल्या देशाची संस्कृती, अस्मिता, परंपरा आणि गौरव असुरक्षित झाल्यासारखे जाणवू लागले आहे, त्यामुळे यावर योग्य वेळीच उपाययोजना करणे गरजेचे आहे. म्हणूनच आपल्या संस्कृतीचा गौरव आणि भाषेचे महत्त्व पटवून देण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन विवेकानंद प्रतिष्ठान पूर्व प्राथमिक विभागात साजरे करण्यात आले.

**कार्यक्रमाचा उद्देश :**

- आपल्या देशाच्या विविधतेचे आणि समृद्धतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देणे.
- संस्कृत भाषेचे शास्त्रीय आणि सांस्कृतिक महत्त्व सिद्ध करणे.
- विद्यार्थ्यांच्या मनात आपल्या संस्कृतीचा आणि भाषेचा आदर निर्माण करणे.

**प्रत्यक्ष कार्यक्रम आणि रूपरेषा :**

सुरस सुबोधा विश्वमनोज्ञा, ललिता हृद्या रमणीया ।
अमृतवाणी संस्कृतभाषा, नैव क्लिष्टा न च कठिणा ।।

भारतीय संस्कृतीची ओळख असणारी संस्कृत भाषा सर्वार्थाने परिपूर्ण अशी भाषा आहे. एक प्रकारे संस्कृत भाषा ही भारतीय संस्कृतीचा आरसाच आहे, असे म्हणायला काही हरकत नाही. सामान्य लोकांच्या मते ही भाषा फक्त देवांची भाषा आहे असे त्यांना वाटत असते; पण वेगवेगळ्या पैलूंनी विचार जर केला तर मनुष्याला अनेक पातळींवर समृद्ध करणारी अशीच ही भाषा आहे. मग विद्यार्थिदशेपासूनच जर माणसावर ह्या भाषेचे संस्कार करायला जर सुरुवात केली तर त्या मनुष्याला पूर्णत्वास नेणारी ही एकमेव भाषा आहे. विविध कला, विज्ञान, गणित, भूगोल, इतिहास, इत्यादी विविध विषयांचे मूळ आपल्याला संस्कृत भाषेतच सापडेल. कौटिल्याचे अर्थशास्त्र असो, विदुरांचे नीतिशास्त्र, भरतमुनींचे नाट्यशास्त्र असो किंवा पाणिनींचे व्याकरणशास्त्र – या सर्व शास्त्रांचा अद्ययावत जीवनात घडणाऱ्या घडामोडींशी सुद्धा तितकाच जवळचा संबंध आहे. या सर्व बाबी लक्षात घेऊन 'विवेकानंद प्रतिष्ठान' नेहमीच संस्कृत भाषेचा पुरस्कार करत आली आहे. प्रतिष्ठानमध्ये पूर्वप्राथमिकपासूनच विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेचे अध्यापन केले जाते. त्या अनुषंगाने गेल्या २५ वर्षापासून प्रतिष्ठान मध्ये संस्कृत सप्ताहाचे आयोजन केले जाते. यावर्षी देखील १९ ऑगस्ट ते २५ ऑगस्ट २०२१ दरम्यान संस्कृत सप्ताह साजरा करण्यात आला, ज्यात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत संस्कृत भाषेच्या विकासासाठी विद्यार्थ्यांकडून अनेक उपक्रम राबविण्यात आले. विद्यार्थ्यांकडून




**कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग**

रामरक्षा स्तोत्र, भगवद्गीतेचे श्लोक पठण तसेच इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांनी झाड, फूल, फळे, प्राणी यांच्या वेशभूषा करून त्यांच्याशी संबंधित संवाद संस्कृतमधून सादर केले. त्याचबरोबर इयत्ता सहावी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी कोरोना काळात घ्यावयाची काळजी या विषयावर संस्कृत नाटिका सादर केली व आजच्या काळात संस्कृत शिक्षण का आवश्यक आहे, या विषयावर अभिवाचन देखील सादर केले गेले. यानिमित्ताने विद्यार्थ्यांकडून संस्कृत भाषेशी संबंधित असणाऱ्या विविध घटकांचा अभ्यासपूर्ण सराव करून घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी देखील त्याला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. विद्यार्थिदशेपासूनच विद्यार्थ्यांवर संस्कृत भाषेचे संस्कार हे त्यांचे उत्तम जडणघडण करण्यास मदतकारक ठरते.

संस्कृत भाषेमुळे मनुष्याच्या वाणीमध्ये असलेले दोषदेखील दूर होतात, असे तज्ज्ञांचे मत आहे. ज्याप्रमाणे मनुष्याच्या शरीराला सुदृढ असण्यासाठी शारीरिक व्यायामाची गरज असते, त्याचप्रमाणे वाणीमध्ये, उच्चारणमध्ये असणारे दोष दूर होण्यासाठी संस्कृत भाषेची अत्यंत गरज असते. संस्कृत भाषेच्या बोलण्याने, वाचनाने वाणीत असलेले दोष देखील दूर होतात. संस्कृत भाषेत असणारे सुभाषित, अमरकोष, प्रहेलिका, हे घटक मुलांच्या बुद्धीला चालना तर देतातच; शिवाय कमी शब्दात खूप मोठा अर्थ सांगणारा आशयदेखील या घटकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समजावता येतो. संस्कृत विषय म्हणजे भरभरून गुण देणारा विषय असा अनेक पालकांचा समज आहे; पण असे नसून प्रत्यक्षात तो एक संस्कार आहे. अनेक विदेशी लोक भारतात संस्कृत भाषेत जे गहन असे ज्ञान आहे ते मिळविण्यासाठी आपल्या भारतात येऊन त्याचे अध्ययन करतात. मग आपण आपल्या मायभूमीतच असलेल्या या भाषेला आत्मसात का करू नये. डॉक्टर ए.पी.जे. अब्दुल कलाम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुषमा स्वराज यांसारखी मंडळीदेखील संस्कृत भाषेचे उत्तम जाणकार होऊन गेलेत. संस्कृत भाषेचे ज्ञान हे मनुष्याच्या चारित्र्यामध्ये वैशिष्ट्यपूर्ण अशी भरच घालते, आणि म्हटलेच आहे, 'गीर्वाण वाणी संस्कृत भाषा नैव क्लिष्टा न च कठिणा' म्हणजेच देवांची भाषा असलेली ही संस्कृत भाषा क्लिष्टही नाही आणि कठीणही नाही. चला, तर मग आपल्या विद्यार्थ्यांवर बालपणापासूनच संस्कृत भाषेचे संस्कार होतील यावर लक्ष केंद्रित करू या.

**पालकांच्या प्रतिक्रिया :**

शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीची जाणीव करून देणाऱ्या उपक्रमाची आवश्यकता आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना संस्कृतसारख्या शास्त्रीय आणि प्राचीन भाषेचे महत्त्व कळाले.

❑

# एकात्मतेची आवर्तने

**डॉ. विलास चिंतामण देशपांडे**

प्रसार माध्यमांवर नित्यनेमाने राष्ट्रीय एकात्मतेचे डोस पाजले जातात. काश्मिरपासून ते कन्याकुमारीपर्यंत आणि द्वारकेपासून ते पुरीपर्यंत खंडप्राय पसरलेल्या या विस्तीर्ण देशात एका नव्या राष्ट्राची जडणघडण करण्यासाठी लागणारी राष्ट्रीय संस्कृती आजपावेतो पूर्ण रूपाने विकसित झाली नाही असा याचा अर्थ होतो. ७४ वर्षांचे भरभक्कम स्वातंत्र्य उपभोगलेल्या जगातील सर्वात मोठ्या लोकशाही नांदत असलेल्या राष्ट्रात अजूनही एकात्म संस्कृतीचे भान येऊ नये ही आपणा सर्वांसाठीच अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. परिणामी आपसातील मतभेद विसरून समस्त देशवासियांनी एकोप्याने नांदावे असे आवाहन लाल किल्ल्यावरून दरवर्षी दिले जाते. हे सगळे कसे यांत्रिकपणे, ठरल्यासारखे वर्षानुवर्षे घडत आहे. राष्ट्रनिर्मितीची व एखाद्या राष्ट्राची संस्कृती, एकात्मता जोपासण्याचे उत्तरदायित्व हे जबाबदार नेतृत्वाबरोबरच नागरिकांचेही कर्तव्य असते असा त्यातून सूर प्रकट केला जातो. मात्र अजूनही आपण राष्ट्रीय एकात्मतेच्या गप्पा मारण्यात केवळ समाधान मानतो आहोत. असे का व्हावे?

### मानसिकतेकडे दुर्लक्ष

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकशाही राज्यव्यस्था आपण स्वीकारली आणि समाजवादी समाजरचनेच्या दृष्टिकोनातून भक्कम राज्य-निर्मितीच्या प्रक्रियेवर अधिक भर दिला गेला. शासनसंस्था, अधिकारांचे वाटप, कायदा, औद्योगिक व कृषी विकास, आर्थिक विकास या स्तरांवर राज्यांच्या विकास करण्याकडे आपण प्रामुख्याने लक्ष पुरविले. एकीकडे राष्ट्र विकासाची कामे करण्याच्या आधाशी वेगामुळे दुसरीकडे मात्र येथील लोकांच्या मानसिकतेकडे आपले संपूर्णपणे दुर्लक्ष झाले. (आस्मानी व नैसर्गिक संकटात लोकांची दुर्दशा झाली तरच काय तो अपवाद!) राजकीय पक्षांना असलेला सत्तेचा मोह आणि ब्रिटिशांनी पेरलेला 'तोडा आणि फोडा' या नीतीचा वापर यामुळे या देशातील माणसांची मने कधीच जुळून आली नाहीत ती आजतागायत!

### मने तोडण्याचे काम

नव्या आर्थिक धोरणांमुळे व राष्ट्राच्या पुनर्बांधणीतून, आधुनिकीकरणामुळे या देशातील जनतेत असणारा संकुचित दृष्टिकोन नाहीसा होऊन व्यापक दृष्टिकोनातून राष्ट्राचे नेतृत्व करणारी ही सर्व नेते मंडळी एकमेकांकडे बघतील, असे स्वातंत्र्यप्राप्तीच्या सुरुवातीच्या काळात या देशातील नागरिकांना वाटत होते. घडले मात्र वेगळेच. काही मंडळींनी आपले गैरवाजवी हक्क शासनावर लादून शासनाने त्यांना संरक्षण देणे आवश्यक असल्याचे शासनाचे गळी उतरवले. यातून गटबाजीच्या राजकारणात सुरुवात झाली. ज्या मंडळींना जे लोक नकोत, त्यांना उपरा अथवा पाहुणा ठरवून तशी वागणूकही देण्यात आली. त्यामुळे लोक एकमेकांपासून तुटण्यास, दुरावण्यास प्रारंभ झाला. स्वातंत्र्यलढ्यात एकात्म भावनेने सहभागी झालेल्या या देशातील जनतेची मने तोडण्यास एकजात सारेच राजकीय पक्ष जबाबदार आहेत.

### गटबाजीचे राजकारण

परस्परांची ओळख नसताना अनोळखी माणसांचे भिन्न भिन्न गट झाले तर त्या त्या गटाचे धोरण, विचार त्या विशिष्ट गटातील लोकांना पटो अथवा न पटो त्या गटातील मंडळी चिकटून राहतात व दुसऱ्या गटातील लोकांवर या ना त्या प्रकारे कुरघोडी करण्याचा सतत प्रयत्न करीत असतात, असे मानसशास्त्र सांगते. विद्यमान भारतीय परिस्थितीचे चित्र नेमके हेच आहे. याला राजकारण, धर्मकारण, भाषाकारण यांची पार्श्वभूमी लाभलेली आहे. गटबाजीच्या राजकारणाला या पार्श्वभूमीबरोबरच उपरोक्त मानसशास्त्रीय सिद्धांत कारणीभूत ठरला आहे. गटबाजीच्या राजकारणातून अनेक छोट्या-छोट्या गटांची निर्मिती होते. मोठा गट लहान गटाला संपविण्यासाठी सतत कार्यरत असतो. पंजाब, काश्मिर, तामिळनाडू, बंगाल, उत्तरप्रदेश इत्यादी राज्यांतील समस्या किंवा राजकीय पक्षांतर्गत फूट इत्यादी घटना या गटबाजीचा परिणाम आहे.

कर्नाटकातील कावेरी पाणी तंटा आणि बेळगाव मराठी भाषिकांचा प्रश्न याचाच परिपाक. सांप्रत देशात चाललेला हिंदू-मुस्लिम या विषयावरील प्रसार माध्यमांतील सततच्या चर्चेने तर हिंदू-मुस्लिमांच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक मूल्यांवरच घाव घालण्याचा मोठा गुन्हा केला जात आहे. अशा प्रकारची आंदोलने, चर्चा अल्पसंख्य वादास जन्माला घालतात. अशा घटनांमुळे सारे

वातावरण ढवळून गढूळ होते. अल्पसंख्य गट आपापली मते, तत्त्वे, विचार प्रसारित करण्यास पुढे सरसावतात. त्यासाठी ते सतत झगडत असतात. बहुसंख्य लोक आपल्या संख्येच्या बळावर आपले म्हणणे अल्पसंख्यांकावर लादतात. लोकांच्या भावना उद्दीपित करून धर्मनिरपेक्ष, जातीनिरपेक्ष यांच्या नावाखाली हा सारा आकांडतांडव थैमान घालीत असतो.

**स्वार्थाची जोपासना**

जेव्हा काही लोक एका विशिष्ट गोष्टीची बांधिलकी स्वीकारतात तेव्हा त्या विचारांशी त्यांची निष्ठा निगडित असते. त्या वेळी असे लोक त्या गोष्टीच्या किंवा विचारांच्या चौकटीतूनच एखाद्या समस्येकडे, प्रश्नाकडे बघत असतात. अशा वेळी सत्यही त्यांना असत्य वाटण्याचा संभव असतो. सार्वजनिक ठिकाणी काम करताना हाच न्याय लागू पडतो. सार्वजनिक जीवनात स्वत:चा निहित स्वार्थ साध्य करण्यासाठी लोकांच्या भावना स्वत:ला पाहिजे तशा चिथावण्यात सार्वजनिक क्षेत्रातील काही मंडळी नेहमीच समाधान मानतात. बहुसंख्य जनता शासनावर प्रभुत्व मिळविण्याच्या कामी लागलेले असतात तर अल्पसंख्य स्वत:चे अस्तित्व टिकवण्यासाठी व हक्क मिळविण्यासाठी सतत संघर्ष करीत असतात. म्हणूनच गटागटांमधील संघर्षाकडे जनतेचे विशेष लक्ष आकर्षित केले जात असते. आपल्या गटाकडे जास्तीत जास्त पाठबळ गोळा करणे व दुसरा गट कमकुवत करण्याने व त्यांच्यात भांडणे लावून देणे हाच सारा खेळ खेळला जात असतो. लोकसभा, विधानसभा इत्यादी जनप्रतिनिधींच्या द्वारे राज्यकारभार चालविण्यात येणाऱ्या संस्थांमध्येही खासदार, आमदारांचे विविध गट याचे उत्तम उदाहरण म्हणून सांगता येते.

**दुहेरी धोरण**

'एक जनता एक राष्ट्र' या संकल्पनेला बहुसंख्य नागरिकांचा नियमित पाठिंबा असतो. त्यांच्या सामान्य दृष्टिकोनातून त्यांची ही कृती नि:संशय राष्ट्रवादीच आहे. परंतु अल्पसंख्यांक लोकांनी अथवा दुसऱ्या संस्कृतीच्या, धर्माच्या पुरस्कर्त्यांनी त्यांच्या या संकल्पनेला पाठिंबा द्यावा असा बहुसंख्यांकांचा आग्रह असतो. तथापि आपत्कालीन परिस्थितीत देशाच्या अखंडतेचा व निष्ठेचा प्रश्न जेव्हा उद्भवतो तेव्हा मात्र गटागटात विखुरलेले हे लोक 'बहुसंख्य' या लेबलखाली एकत्र येतात. परंतु त्यातही त्यांचे वेगळेपण ठळकपणे स्पष्ट होतच असते. असे लोक गटागटाच्या आधारानेच सुरक्षित राहू शकतात अशी त्यांना खात्री वाटते आणि तसे जर ते राहिले नाहीत तर त्यांचे गटातील प्रत्येकाचे अस्तित्वच नष्ट होण्याची शक्यता असते. गटातून फुटून निघालेल्या व्यक्तीला त्या गटाकडून आणि कधीकधी ज्या दुसऱ्या गटात तो गेला असतो त्या गटाकडूनही अपमानास्पद, तिरस्करणीय वागणूक मिळत असते. त्यांच्या कुटुंबावर अत्याचार सुद्धा केले जाऊ शकतात. सुरक्षिततेच्या अभावाच्या भावनेच्या भीतिपोटी व्यक्ती गटागटाने राहात आली आहे, हा माणसाच्या संस्कृतीचा इतिहास आहे. त्यामुळे आपल्या संस्कृतीवर परक्याने ओढलेला एखादा ओरखडाही व्यक्ती अथवा समाज सहन करू शकत नाही. भिन्न धर्मियांच्या बाबतीत तर या विषयावर बोलायलाच नको. जे लोक जन्मभूमीशी प्रामाणिक नाहीत अशा लोकांनी स्वत:च्या पूर्वजांना नावे ठेवली तरी चालतात; परंतु दुसऱ्या गटाच्या लोकांनी अशा अप्रामाणिक, निष्ठावान लोकांच्या पूर्वजांना नावे ठेवली तर अशी मंडळी वेळीच थयथयाट करतात. माणसे दोन प्रकारच्या प्रवृत्तीची असतात. 'चांगली' आणि वाईट'. 'चांगली' तेव्हाच नजरेत भरतात ज्यावेळी त्यांना 'वाईट' विरोध करतात. बहुसंख्यांकांच्या मधील 'वाईट' लोक नेहमी अल्पसंख्याकांचा बळी देण्याच्या शोधात असतात. हे अव्याहत सुरूच राहणार आहे.

**राष्ट्रीयत्व जपा**

हे सगळे सुरूच राहणार आहे, म्हणूनच तर विद्यमान काळात राष्ट्रीय एकात्मतेवर ओरडून ओरडून व्याख्याने द्यावी लागतात. कारण राष्ट्रीयत्व ही एक भावना आहे. राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत राष्ट्रीयत्व चेतवणे हे महत्त्वाचे. राष्ट्रीय प्रवृत्तीचा आविष्कार एखाद्या आध्यात्मिक प्रवृत्तीप्रमाणे राज्यात संचार करीत असते. ही राष्ट्रवादी प्रवृत्ती प्रभावी व प्रबळ करण्यासाठी राष्ट्रवादी शक्तीप्रवाहाचा आधार घ्यावा लागतो. बहुजिनसी समाजात विविध मूल्य - पद्धतीच्या अस्तित्वामुळे सर्वांना मान्य होतील अशी राष्ट्रीय मूल्ये प्रस्थापित करणे आज अवघड होऊन बसले आहे. या दृष्टिकोनातूनच या देशातील विविध आंदोलनांकडे बघितले पाहिजे. म्हणूनच प्रसारमाध्यमावरील नित्यनेमाने प्रसारित होणाऱ्या एकात्मतेच्या आवर्तनांमधून येथील लोकांमधून राष्ट्रीयत्वाची भावना सतत तेवत ठेवावी लागते. देशवासियांची मने जुळतील असा आशावाद बाळगायला हे आवश्यक आहे.

# घर करा रे प्रसन्न

अमृता खाकुर्डीकर

'मन करा रे प्रसन्न... सर्व सिद्धीचे कारण' हे संतवचन सर्वश्रुत आहे. मनाच्या प्रसन्नतेबद्दल अनेकजण अनेक परींनी आपल्याला सांगत असतात. आधुनिक मानसशास्त्रात तर समुपदेशन पद्धतीत मनाचे तंत्र सांभाळण्यासाठी त्याची प्रसन्नता हाच मंत्र सांगितला जातो. यावरून हे नक्की की आपल्या रोजच्या जगण्यातले क्षण आनंदाने घालवायचे असतील तर मन प्रसन्न हवंच; पण मन जसं प्रसन्न हवं तसं आपण जिथे सदैव वावरतो, जे आपल्या जगण्याचा आणि भावविश्वाचा मुख्य भाग असलेलं आपलं घर, हेदेखील तितकंच प्रसन्न हवं!

ते प्रसन्न ठेवण्यासाठी सर्वप्रथम हाती घ्यावी लागते स्वच्छता, साफसफाई. घराचा कानाकोपरा स्वच्छ झालाच पाहिजे, असा कडक नियम काही सणांच्या पूर्वी आपल्याकडे पाळला जातो. उदा. पितृपक्ष संपल्यानंतर सर्व स्वच्छता करूनच घटस्थापना केली जाते. दिवाळीचा सण म्हणजे प्रकाशाचे पवित्र पर्व. त्याचे स्वागत करताना संपूर्ण घरादाराची स्वच्छता तर झालीच पाहिजे, एवढेच नव्हे तर भिंतींची रंगरंगोटी आणि घराचे सुशोभीकरण केले तर देवी लक्ष्मी प्रसन्न होऊन कृपेची बरसात करते, अशी एक सर्वसाधारण श्रद्धा आहे. हीच गोष्ट श्री गणपती बाप्पाचे आगमन आणि महालक्ष्मीची स्थापना या मंगल उत्सवाच्या वेळीही घडून येते. त्या वेळी मुख्यत्वे आधी स्वच्छतेला प्राधान्य दिले जाते. त्याचप्रमाणे हिंदू नववर्षाचा प्रारंभ म्हणून चैत्री गुढी-पाडव्याला खूप महत्त्व आहे. वर्षाची सुरुवात करताना कोणतीही गृहिणी स्वच्छता आणि टापटीप याला आवर्जून महत्त्व देते.

सणासुदीचा रिवाज असल्याने अनिवार्य म्हणून का होईना; पण वर्षातून चार वेळा अशी संपूर्ण घरादाराची जी स्वच्छता केली जाते; ती अतिशय अतिशय गरजेची आहे. घराला नवचैतन्य देणारी ही सफाई झाल्यावरच कळतं, की त्याची काय जादू झालेली आहे.

गृह सजावटीसाठी हौसेने जमवलेल्या, कुठून कुठून आणलेल्या, किंवा प्रेमाने भेट मिळालेल्या शोभेच्या मौल्यवान सुंदर वस्तू, कपाटात संग्रही ठेवलेले, खास शोधून आणलेले मौलिक ग्रंथ, आवडत्या लेखकांची पुस्तकं यावरची धूळ झटकण्याची ही एक सुंदर संधी असते. ती धूळ पुसताना प्रेमाने आपला हात फिरतो. असा हात फिरल्याने त्या स्पर्शातून पुन्हा एकदा आपले त्या वस्तूशी असलेले नाते दृढ होते. ती वस्तू या घरात केव्हा आली, का आली, त्या सगळ्या आठवणी जाग्या होतात. त्यातूनच जरा जास्तच प्रेमाने ती स्वच्छ केली जाते. आणि मग एका नव्या झळाळीने ती वस्तू पुन्हा नव्याने चमकायला लागते. त्या वेळी तिच्याकडे बघताना आपलेही डोळे आनंदाने चमकत असतात, पण ते आपलेच डोळे आपल्याला दिसायची सोय नाही ना...!

अनावश्यक साचून ठेवलेल्या वस्तू, तुटकीफुटकी भांडी, फर्निचर, रद्दी-भंगार, मोड, जुनेपाने कपडे सर्व काही बाहेर निघते. मग त्याची विल्हेवाटही लागते. अशी अडगळ बाहेर पडल्याने आपले निवासस्थान असलेली आपली प्रिय वास्तू कशी मोकळा प्रसन्न श्वास घेते. खूश होऊन आपल्या सगळ्या इच्छाआकांक्षांना 'तथास्तू तथास्तू' म्हणू लागते. अशावेळी आहे तेच घर पण मोठं वाटायला लागतं, आडून राहिलेली जागा मोकळी मोकळी झाल्याने नव्या खरेदी केलेल्या वस्तूंनाही ऐसपैस जागा मिळते. ते बघून मन अगदी भरून जातं.

या स्वच्छतेमुळे मिळालेल्या समाधानातून मनात आणखी काही 'रंग-तरंग' उमटायला लागतात... मग त्यातूनच सुचतं

घराला नवा रंग द्यावा. जुना फिकुटला रंग घेऊन उदासवाण्या झालेल्या भिंतींना जेव्हा हे रंगबदलाचं नियोजन ऐकू येतं, तेव्हा त्या स्मितहास्य करून आनंदाने संमतीदर्शक डोलू लागतात. बघता बघता रंगारी तो जुना रंग खरडून उतरवून टाकतात. नवा, आपल्या आवडीच्या जरा वेगळ्या छटा असलेल्या रंगाची निवड होते. ती करताना घरातील सर्व सदस्यांनी मिळून विचारविनिमयाना ठरवून जर केली आणि आपापल्या खोल्यांना हवा तसा रंग देऊन घेतला की सगळं घर नवचैतन्याने भरून जातं. सगळ्यांच्याच मनातल्या भिंतींवर सुद्धा एक आनंदाचा रंग चढतो. भिंतीचं खुललेलं रूप पाहून छतालाही आनंद होतो. त्याच्यावरही एक नवी झळाळी चमकायला लागते. रंगरंगोटीच्या या साऱ्या खटपटीत खिडक्या-दारांच्या चौकटी आपलाही नंबर लावून घेतात आणि आपल्याला शोभेल अशा नव्या, जरा चकचकीत दिसणाऱ्या रंगात नटूनसजून घराचं सौंदर्य ठळक करतात.

रंगामुळे डोळ्याला सुखावणारा घराचा चेहरामोहरा पाहून यात आणखी भर घालण्यासाठी येतात, भिंतीवर सुरेखसे पेंटिंग, छताला झुंबर, कोपऱ्यात ऐटीत बसतात. आकर्षक फुलदाण्या आणि तरतऱ्हेच्या आकाराचे आणि प्रकाराचे शोभेचे दिवे-डेकोरेटिव्ह लॅम्प. मधेच कुठे मोक्याची जागा शोधून विराजमान होतं एखादं म्युरल, मधुबनी किंवा वारली चित्र, जे कुटुंबातील सदस्यांच्या रसिकतेची साक्ष देतं. दारावरच्या सुंदर तोरणापासून घरातल्या पायतळीच्या गालीच्यापर्यंत ही रसिकता सुंदरतेचा प्रत्यय देत राहते.

सौंदर्याची आणि रसिकतेची साक्ष देणारी आणखी एक गोष्ट म्हणजे, दारा-खिडक्यांचे पडदे. भिंतींच्या रंगाला शोभेल अशी छटा निवडून झुळझुळीत किंवा रेशमी, नाहीतर वेलवेट किंवा पारदर्शक नेट यातील हवा तो प्रकार निवडून मोठ्या कौशल्याने आणि काळजीपूर्वक पडद्यांची निवड करावी लागते. ते एकदा नक्की ठरले की मग पडदे घराची शोभा आणखी वाढवायला सज्ज होतात.

अशा सगळ्या तामझामसह घराचा हॉल आणि इतर खोल्या, देवघर, व्हरांडे असे सगळे भाग सजले की स्वयंपाकघरात आकर्षक आकाराच्या बरण्या, नव्या धाटणीचे डबे, भांडे-कुंडे-डिश-वाट्या याचीही खरेदी न ठरवता सुद्धा आपोआप होते. ही खरेदी कधी ठरली, हे घरच्या गृहस्थाला कधीच कळत नाही. चतुर गृहलक्ष्मी आपल्या खिशात हात घालून आपल्याच डोळ्यादेखत हे कसे करू शकते, याचे कोडे त्याला कधीच उलगडत नाही. असो. ते काही का असेना पण सगळे घर एकदाचे अंगोपांगाने सजते. मग अंगणाची, किंवा अंगण नसेल तर बाल्कनीचीही सजावट हातोहात करून घ्यावी, असं कुणाच्यातरी डोक्यातून येतं. त्या भरात मग अंगणातली बागही आपला सहभाग नोंदवते. आवडीचं एखादं रोप कुंडीत वाढू लागतं, कमनीय तुळशीवृंदावनात तुळशीचं रोपटं डौलात उभं राहतं. काही शोभेच्या इनडोअर प्लँन्टच्या हिरव्या फांद्या, उंच टांगवल्या जातात, नाहीतर काही वेलींचे फुटवे भिंतीला लगटून आपलं जिवंत अस्तित्व निर्माण करतात. तिथे आरामात बसून हवा खायला एखादी छानशी इझीचेअर प्रवेशते आणि थोड्याच दिवसात हिरव्या पानांआडून एखादी रंगीत कळी हळूच डोकावताना दिसते. ते दृश्य अगदी हरखून पाहताना नवसृजनाचा आनंद धन्य धन्य करून जातो. घर खऱ्या अर्थाने फळतं... फुलतं...

अशी अथपासून इतिपर्यंत घराची सजावट पूर्ण झाली की, आपलं साधंसं घरही सुंदर, प्रसन्न होतं. अशा सुंदर प्रसन्न घरातून रोगराई पळून जाते. दारिद्र्य, दुःख तर फिरकतच नाहीत. उलट अतिशय आशादायक आणि प्रेरणादायक लहरी निर्माण होतात. घरातल्या प्रत्येक सदस्याला घराची ओढ लागते. दमून-भागून बाहेरून आलेल्या माणसाला हे असं सुंदर सुशोभित घर एक उबदार सुखाची अनुभूती देतं आणि एका आनंदी वास्तूचा अनुभव मन भारून टाकतो. गृहस्वामी आणि गृहस्वामिनी यांच्या मनात एक गाणं रुणुझुणू लागतं,-

'ये तेरा घर... ये मेरा घर...
हमारे ख्वाहिशोंका घर...
ये घर बहोत हसीन है,
ये घर बहोत हसीन है...

आपल्याही मनाला या सुंदर अनुभूतीपर्यंत न्यायचं असेल तर... सुरुवातीला म्हटलं, तेच म्हणायला हवं,- ''घर करा रे प्रसन्न...'' आपापल्या पद्धतीने, आपापल्या कुवतीनुसार, आपापल्या अभिरुचीनुसार जमेल तसं, जमेल तेव्हा ''घर करा रे प्रसन्न''!!


❑

# डॉ. मालशे प्रस्तावना खंड : विनामूल्य आणि अमूल्य

■

राजीव जोशी

सुप्रसिद्ध लेखक, संपादक, संशोधक, समीक्षक, मीमांसक, वाङ्मयेतिहासकार, अनुवादक, प्रस्तावनाकार, नाटकांचे आलोचक, मुलांसाठी विविध लोककथांचे भाषांतरकार, संस्कृती-समन्वयक डॉ. स.गं. मालशे यांचं जन्मशताब्दी वर्ष चालू आहे. या निमित्ताने 'ग्रंथसखा वाचनालया'द्वारा श्री. शाम जोशी, अर्चना कर्णिक आणि अर्णव चव्हाण या त्रयींनी संकलित केलेला जवळपास साडेपाचशे पानांचा प्रस्तावना खंड सुप्रसिद्ध समीक्षक डॉ. अनंतराव देशमुख यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. या ग्रंथाचं देखणं मुखपृष्ठ गिरीश सहस्रबुद्धे यांनी साकारलं आहे. डॉ. सदानंद मोरे यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना ग्रंथाच्या मूल्यात्मकतेत मोठीच भर घालणारी आहे.




मराठी साहित्य-समीक्षेत मालशे या नावाचा दबदबा आहे. साक्षेपी वाचक, अभ्यासक, संशोधक त्यांच्या पुस्तकांच्या शोधात असतात. याचं कारण संशोधन व समीक्षेतील मालशे यांचं सव्यसाचीत्व. त्यांची पुस्तके आजही विद्यापीठांमध्ये अभ्यासली जातात. डॉ. मालशे यांनी एकूण ७४ पुस्तके लिहिली. त्यापैकी ४७ पुस्तकांना प्रस्तावना लिहिल्या. या सर्व प्रस्तावना खंडात समाविष्ट केल्या आहेत. या खंडातील लेखनात प्रामुख्याने १९व्या व २०व्या शतकातील वाङ्मयीन चर्चा असली तरी लेख नि:संदर्भ झालेले नाहीत. मालशे यांनी अत्र्यांच्या 'झेंडूची फुले' या विडंबनपर कवितासंग्रहाला प्रस्तावना लिहिली. या कविता एवढ्या गाजल्या की विडंबनपर कविता म्हटलं की अत्रे व झेंडूची फुले हे समीकरण समोर येतं. तथापि मराठीतील आद्य विडंबन कवीचा मान मंगेशराव तेलंग यांच्या 'संगीत हजामत'ला आहे असं निरीक्षण मालशे नोंदवतात.

'संतर्पण'मधील ज्ञानेश्वरांवर तीन लेख, फादर स्टीफन यांच्या क्रिस्त पुराणावरील लेख, मुक्तेश्वराचे नलोपाख्यान, समर्थ रामदासांवरील आख्यान विचारप्रवृत्त करतातच, समीक्षा व्यवहारावर भाष्यही करतात. क्रिस्त पुराणाच्या निर्मितीची कुळकथा सांगताना फादर स्टीफनने मान्य केलेले मराठीचे श्रेष्ठत्व मनाला सुखावून जाते. श्रीपाद महादेव वर्दे यांच्या 'मराठी शाहीर' या ग्रंथाच्या अभ्यासपूर्ण प्रस्तावनेत मालशे, वर्दे यांच्या भूमिकेशी मतभिन्नता व्यक्त केलेली आहे. प्रशासनव्यवस्थेत शिष्टाचाराची औपचारिकता व गरज म्हणून नागरलिपीची शीघ्र लिपी मोडी छत्रपतींच्या काळात विकसित कशी झाली याविषयी तसेच व्यवहाराचे मार्गदर्शन करणारी पुस्तके म्हणजे मेस्तक याविषयी मालशे सविस्तर लिहितात.

ब्रिटिश राजवटीला, १९व्या शतकातला 'गतशतक शोधतांना' या संग्रहात ते 'कलहशतक' म्हणतात. कॅप्टन जार्विस याने काढलेलं परिपत्रक 'मराठी गद्य निर्मितीची नांदी' कशी होती,

बळवंत मल्हार चिटणीस यांनी सातारच्या छत्रपतींची 'लेखी तस्वीर' कशी रेखाटली याबाबतची माहिती या प्रस्तावनेतून कळते. 'जातिभेद' या पुस्तिकेत भारतीय परंपरेचे कृषिकाळ, वीरकाळ, विचारकाळ आणि भ्रमकाळ असे चार कालखंड करून मालशे लोकहितवादी गोपाळ हरी देशमुखांना 'आधुनिक भारतीय प्रबोधनाचे महाराष्ट्रीय अग्रदूत' मानतात. नाटक मालशे यांचा आवडीचा विषय. ह. ना. आपटे यांची मराठी नाटकाविषयीची लेखमाला त्यांनी संपादित केली. कृष्णाजी आबाजी गुरुजी यांच्या 'नाटकाची स्थित्यंतरे' या निबंधावर मालशे यांनी निरीक्षणं नोंदवली आहेत. गुरुजी टिळकांचे निकट सहकारी, त्यांचे चरित्रकार, पत्रकार आणि नाटककारही. टिळकांचा 'लोकमान्य' असा उल्लेख करायचा मान गुरुजींचाच असं मालशे यांनी साधार सिद्ध केलं.

मालशे यांनी केलेलं 'महात्मा फुले समग्र वाङ्मय' या ग्रंथाचे केलेले संपादन महाराष्ट्राला मोठीच देणगी आहे. प्रत्येक शतकात न्याय, नीति आणि मानवता या शाश्वत तत्त्वांची जाणीव करून देऊन स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा मार्ग दाखवणारे जे महापुरुष असतात त्यापैकी जोतीराव एक होते' असं म्हणून मालशे यांनी जोतीरावांची जागतिक इतिहासात नोंद केली. मालशे जोतीरावांना भारतीय समाजक्रांतीचे जनक आणि भारतातील सामान्य जनतेच्या नवयुगाचा प्रेषित मानतात. जोतीरावांना इतिहासात बंदिस्त न करता त्यांचा संबंध समाजाच्या भविष्याशी जोडतात. एकूणच कट्टर मानवतावादी, समतेचा ध्यास आणि प्रजासत्ताकाची आस लागलेले जोतीराव, मालशे सहजतेने उलगडतात.

बुलढाण्याच्या ताराबाई शिंदे म्हणजे भारतीय स्त्रीवादाच्या आद्य जनक. मालशे यांनी त्यांची दखल घेतली आणि आज ताराबाई शिंदे यांची पुस्तकं विद्यापीठीय अभ्यासक्रमात आली, देश-विदेशात पोहोचली, सावरकर, गडकरी आणि अत्रे २०व्या शतकातले मातब्बर. सावरकरांचे करुणोदात्त जीवित कार्य आणि अत्र्यांसारख्या सिद्धहस्त लेखकाची लेखणी यांच्या मधुर संगमातला तिसरा प्रवाह म्हणजे मालशे यांनी लिहिलेल्या प्रस्तावना. ही सर्व मंडळी त्यांची दैवतं होती. मालशे सावरकरांबरोबर ते वावरले असले तरी मालशे यांची निरीक्षणं नवी दृष्टी देणारी महत्त्वाची निरीक्षणं आहेत. सावरकरांना 'सावरकरपण येताच ते मित्रमेळ्याचे पुढारी बनतात, त्यांची अहंता जागृत होते, आत्मसमर्थक वृत्ती बलवत्तर होऊन आत्मपरीक्षक तटस्थतेवर कुरघोडी करते,' असं ते नोंदवतात. मात्र सावरकरांना ते 'देशभक्तीने झपाटलेले झाड'ही म्हणतात. आजच्या पिढीला सावरकरांच्या आयुष्यातील अनेक प्रसंग अद्‌भुत वाटू शकतील अशी आहेत, मालशे म्हणतात, असे प्रसंग ऐतिहासिक कथाकादंबरीतच वाचायला मिळतात. पण सत्य हे कादंबरीहून अद्‌भुत असते याची प्रचीती यावी असेच सावरकरांचे पूर्व चरित्र आहे.

मालशे याचं मित्रमंडळ मोठं होतच. प्रियोळकर, न.र. फाटक, धनंजय कीर, अत्रे, खांडेकर अशा प्रभावशाली व्यक्तिमत्त्वांमुळे किती काळजीपूर्वक साक्षेपाने ग्रंथ वाचले पाहिजेत, याचा वस्तुपाठ त्यांना मिळाला होता. यातूनच त्यांनी नामवंतांच्या ग्रंथामधील विसंगती दाखवून दिल्या, अभ्यासूवृत्ती- बरोबरच, त्यांच्यात विवेचक, साक्षेपीपणा हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा नेमकेपणा होता. 'झेंडूची फुले' या अत्र्यांच्या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेमुळे त्यांना बरीच प्रसिद्धी मिळाली हा अपवाद सोडला तर त्यांनी अन्य ग्रंथांना त्यांनी लिहिलेल्या विवेचक प्रस्तावना वाचकांच्या नजरेसमोर किंवा चर्चेत आल्या नाहीत. याचं कारण प्रस्तावना हा दुर्लक्षित प्रकार आहे, याची जाणीव 'ग्रंथसखा'मधील ग्रंथपाल अर्चना कर्णिक यांना प्रथम झाली. समीक्षासंज्ञा या विजया राजाध्यक्ष यांनी संपादित केलेल्या कोशातला टिपणवजा उल्लेख सोडला तर संज्ञा-संकल्पना कोशात प्रस्तावना शब्दच नाही, दाते सूचीतही उल्लेख नाही, किंबहुना प्रस्तावनांची सूचीही नाही. डॉ. राजेंद्र डोळके यांच्या साहित्यसंचार या पुस्तकातील प्रस्तावना : काही मूलतत्त्वे किंवा डॉ.माधव आळतेकर यांच्या गाजलेल्या प्रस्तावनामधील तुरळक उल्लेख हे काही अपवाद. या खंडातील प्रस्तावना शब्दाच्या व्युत्पत्तीचा शोध मोठा रंजक आहे. महादेवशास्त्री जोशी यांच्या संस्कृतीकोशात आलेला 'प्रस्तोता' हा शब्द प्रस्तावनेचं मूळ आहे. सामवेदातून हा शब्द संस्कृत नाटकात आणि मग झिरपत मराठी साहित्यात रूढ झाला असावा. या प्रस्तावना खंडाच्या निमित्ताने प्रस्तावनेचं मंथन या ग्रंथात झालेलं आहे.

अर्थात, प्रस्तावना खंडाचा हा काही पहिलाच प्रयोग नाही. अशा प्रयोगांची १२ पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. गाजलेल्या प्रस्तावना (संपा. वि.ग. कानिटकर), वि.का. राजवाडे प्रस्तावना खंड (संपा. मु.ब. शहा), परामर्श (६ प्रस्तावना) संपा. राम

बापट, प्रस्तावना व आणखी काही प्रस्तावना (व.दि. कुलकर्णी), उत्तम कांबळे यांच्या प्रस्तावना (संपा. मिलिंद कसबे) आणि यशवंतरावांच्या प्रस्तावना (संपा. विठ्ठलराव पाटील) ही काही उदाहरणे असली तरी धन्यतेची थाप (डॉ.वि.भि. कोलते), मला उमजलेले (ग.प्र. प्रधान), अरुण टिकेकर यांचे देणे समाज पुरुषांचे, चिंतन (मंगेश पाडगावकर) ही प्रस्तावनेची पुस्तकं आहेत. मात्र वाचकांची प्रस्तावनेसंबंधीची अनास्था पाहता थेट उल्लेख टाळला गेला असावा.

ग्रंथसखा वाचनालय, शाम जोशी, अर्चना कर्णिक यांनी संकलित केलेला हा खंड मराठी साहित्यात, मराठी वाचन संस्कृती, ग्रंथालय आणि एकूणच अभ्यास विश्वासाठी बोनान्झा आहे. अर्चना कर्णिक या अभ्यासू ग्रंथपाल आहेत. सतत काहीतरी शोध घेण्याच्या वृत्तीतून प्रस्तावनेच्या दुर्लक्षितपणाचा लागलेला शोध प्रेरणादायी आहेच, पण शाम जोशी, 'ग्रंथसखा' यांनी त्याचं मूल्य आणि महत्त्व लक्षात घेऊन खंड प्रकाशित करावा हे एकूणच ग्रंथालयांसाठी, ग्रंथालय चालवणाऱ्यांसाठी दिशादर्शक आहे. या खंडाच्या अर्पणपत्रिकेत म्हटलंय की 'लेखकाला दोनदा मृत्युयोग असतो, एकदा शरीर रूपाने आणि दुसऱ्यांदा त्याचे लिखाण विस्मृतीत गेल्यावर.'

हा अमूल्य खंड म्हणजे डॉ. मालशे विस्मृतीत गेले नाहीत याची प्रचीती आहे. विनामूल्य उपलब्ध करून देणं हे 'ग्रंथसखा'चं धाडस असलं तरी मालशे यांच्या लेखनाचा तो यथोचित सन्मान आहे. आज, घराघरातील पुस्तकं रद्दीत काढण्याचे, ग्रंथालयांना देणगी देण्याचे दिवस आहेत. यासाठी पुस्तकवेडे मालशे समजून घेणं महत्त्वाचे आहे. जुन्यातले जुने ग्रंथ मिळवायचे आणि त्यांच्या रसास्वादात रममाण व्हायचे हा त्यांचा पिंड होता. ते स्वत: ग्रंथसंग्राहक होते. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे काही काळ कार्यकर्ते होते, लेखनिक म्हणून त्यांनी कवी मायदेव यांच्याबरोबर काम केलं होतं, मामा वरेरकरांची नाटकं त्यांनी नकलून दिली होती. 'संगम', 'शाम गुप्ते' या टोपण नावाने लेखन केलं, हंस मासिकात रहस्यकथा लिहिल्या. हा प्रस्तावना खंड अनेक अर्थाने मराठी साहित्य, वाचन संस्कृती आणि प्रकाशन क्षेत्रात एक महत्त्वाचं पाऊल आहे.

❑



चित्र : कु. तन्मय सतीश भोसले

# मध्यांतर ■ अनंत बाबूराव नाईक

''दत्ता, ए दत्ता! अरे ऊठ आता. सकाळचे सात वाजून गेलेत. आज तुझा रिझल्ट आहे ना? चल, ऊठ लवकर. मी गरम पाणी काढून ठेवते अंघोळीला. नंतर मग तुझी धावपळ होते, रोजच्यासारखी. अन मग नाष्टा न करताच पळतोस कॉलेजला.''

सविताचा रोज सकाळचा हा ठरलेला दिनक्रम होता. पण आजचा दिवस तिच्यासाठी व बाबांसाठी खूपच महत्त्वाचा व आयुष्याला महत्त्वाचे वळण देणारा टप्पा होता. आज तिचा धाकटा भाऊ दत्ता ह्याच्या बारावीच्या परीक्षेचा रिझल्ट होता.

आठ वर्षांपूर्वी आईच्या अकस्मात निधनानंतर दत्तापेक्षा फक्त दोन वर्षांनी मोठ्या व एका पायाने अपंग असलेल्या सविताने आपल्या लहान भावाला व आईच्या मृत्यूने निराशेच्या खाईत लोटल्या गेलेल्या बापाला प्रेमाने व जिद्दीने सावरले होते. विस्कटलेली घराची घडी एका पायाच्या आधारावर परत बसविली होती.

बापाची तुटपुंजी कमाई, भावाचा व स्वत:चा शाळेचा खर्च, घरभाडं, खाणंपिणं, औषधपाणी हे सर्व भागविताना सविताची खूपच तारांबळ होत होती. एक दिवस आईच्या फोटोसमोर उभे राहून एक ध्येय ठरविले व त्यावर ठाम राहिली. तिच्या निर्णयात पहिला बळी गेला तो तिच्या शिक्षणाचा. सातवीनंतरचे शिक्षण बंद करून संपूर्ण ध्यान तिने दत्ताच्या शिक्षणावर केंद्रित केले. त्याची शाळा, वह्या, पुस्तके, खाणेपिणे ह्यावर ती अधिक वेळ व पैसे खर्च करू लागली.

भावाच्या शिक्षणात आर्थिक अडचण येऊ नये, म्हणून तिने घरच्या घरी उदबत्ती तयार करण्याचे काम मिळविले. रात्रंदिवस जागून ती बापाच्या बरोबरीने संसाराचा गाडा ओढू लागली. डोळ्यासमोर एकच ध्येय तिने ठेवले होते, ते म्हणजे दत्ताला जास्तीत जास्त शिकवून मोठा माणूस करावयाचा व ह्या दारिद्र्यातून सर्वांची सुटका करावयाची.

...आणि आज तिच्या ध्येयपूर्तीचा पहिला टप्पा पार करण्याचा तो क्षण आला होता. तिच्या कष्टाला, तिच्या ध्येयाला आज नवी दिशा मिळणार होती. सरती रात्र तिने संपूर्ण जागून काढली होती. तिच्या हृदयाची धडधड वाढली होती. तिचा आत्मविश्वास खंबीर होता. पण काळाची पावले कशी पडतात ह्याची भीतीही वाटत होती.

दत्ता सर्व आवराआवरी करून देवाच्या फोटोपुढे हात जोडून उभा होता. बाबासुद्धा मुलाला धीर देण्यासाठी व निकाल ऐकण्यासाठी अर्धा दिवस घरीच थांबणार होते. मालकांकडून अर्धा दिवस सुट्टी मागून घेतली होती. त्याच्या मागे उभे राहून तेही मुलाच्या प्रयत्नांना यश देण्यासाठी परमेश्वराला हात जोडून विनवणी करीत होते. सविता लांबूनच एका पायावर उभे राहून लाडक्या भावाला अंत:करणापासून 'यशस्वी भव'चा आशीर्वाद देत होती.

दत्ताने आईच्या फोटोवरून हात फिरविला. त्याचे डोळे भरून आले होते. त्याचे प्रतिबिंब फोटोच्या काचेतून आईच्या चेहऱ्यावर पडले होते. दत्ताचे भरून आलेले डोळे. फोटोतील आईच्या डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रूप्रमाणे दिसत होते. दोघा बहीणभावांना आईच्या डोळ्यांतील वाहणारे अश्रू म्हणजे आशीर्वादाचा जणू कौल दिल्याचा भास होता होता. दत्ताने मागे वळून बाबांचे चरण स्पर्श केले. बाबांनी भावनिक होऊन मूक आशीर्वाद दिला. तो सवितापुढे येऊन उभा राहिला. त्याला एकदम भरून आले. पाया पडण्याऐवजी 'ताई' म्हणत त्याने सविताला मिठीच मारली. सविताने त्याला आईच्याच मायेने आपल्या पदराआड घेतले. मायेने त्याच्या डोक्यावर व पाठीवर हात फिरविला. त्याचे डोळे आपल्या पदराने पुसले व हसत हसत त्याला निरोप दिला. घराबाहेर पडण्याअगोदर साखरेचे चार दाणे त्याच्या तोंडात घालून त्याचे तोंड गोड केले. दत्ताला घरातून बाहेर जाऊन दोन तास होऊन गेले होते. एव्हाना रिझल्ट मिळायला पाहिजे होता. सविता दारात उभी राहून विचार करीत होती. जसजसा वेळ जात होता तसतशी तिच्या जीवाची उलघाल वाढत होती. बाबासुद्धा दत्ताची आतुरतेने वाट पाहात होते. हाताची बोटं एक दुसऱ्यात गुंतवून शून्यात नजर लावून वेळ ढकलत होते. सविता दाराचा आधार घेत दूरवर नजर टाकीत प्रत्येक येणाऱ्या-जाणाऱ्या माणसांत दत्ताचा चेहरा

हुडकत होती. सविताच्या डोक्यात नको ते विचार रेंगाळत होते. अचानक तिला मागच्या गल्लीत राहणाऱ्या बांगडीवाल्या राधाकाकूंच्या मुलीची आठवण झाली. त्यांची दहावीत शिकणारी मुलगी कुमकुम हिने नापास होण्याच्या भीतीने कॅनॉलमध्ये उडी मारून आत्महत्या केली होती. सविताच्या अंगावर सर्रकन काटा उभा राहिला.

ती गच्च डोळे झाकून शांत उभी राहिली. शांतपणे घरात आली. रामरक्षाचे छोटे पुस्तक हातात घेतले व मनातल्या मनात एक-एक ओळ वाचू लागली. तिकडे दत्ता कॉलेजमधील लायब्ररीमध्ये एकटाच विचार करीत बसला होता. तो ब्याण्णव टक्के गुण मिळवून कॉलेजमध्ये पहिला व राज्यात सातवा नंबर घेऊन पास झाला होता. त्याला माहित होते, की ही बातमी ऐकून ताई व बाबा खूप आनंदी होतील. ताई तर एका पायावर उड्या मारेल. बाबा लाडाने मला जवळ घेतील. ताई मीठमोहरीने माझी दृष्ट काढेल. हे सर्व जरी खरे असले तरी ह्या ब्याण्णव टक्क्यात माझे वैयक्तिक किती टक्के योगदान आहे? ताईने मला शिकवून मोठे करण्यासाठी स्वत:च्या शिक्षणाला तिलांजली दिली. स्वत: जमिनीवर सरपटत माझ्या तब्येतीकडे खाण्यापिण्याकडे, माझ्या शिक्षणाकडे, माझ्या गरजांकडे सरपटणाऱ्या पायांची सालपटं निघेपर्यंत माझी काळजी घेऊन मला माझ्या दोन्ही पायांवर खंबीरपणे उभे केले. गरिबीची झळ मला कधीही लागू दिली नाही. माझ्या शिक्षणात आर्थिक अडचण नको म्हणून रात्रंदिवस उदबत्त्या वळून वळून स्वत:च्या हातावरील स्वत:ची भाग्यरेषाही बुजवून टाकली. बाबा किराणा मालाच्या दुकानात पाठीचे मणके ढिले होईपर्यंत हमाली काम करतायत. रात्री त्यांना पाठीवर झोपता येत नाही. रात्रभर कूस बदलत राहतात. रात्री अभ्यास करताना त्यांच्या वेदना मी पाहात होतो. मला घडविण्यासाठी त्या दोघांनी आपले आयुष्य पणाला लावले. निरंजनातील प्रकाशाचे काहीच योगदान नसते. खरी किमया असते ती तेलात भिजलेल्या वातीची. ती रात्रंदिवस जळत राहते व प्रकाश आपोआपच घरभर पसरतो. माझे बाबा अन् ताईसुद्धा त्या तेल व वातीप्रमाणेच आहेत. मी प्रकाशमान व्हावे म्हणून ते दोघे रात्रंदिवस खपत असतात; पण ह्यापुढे मी असे होऊ देणार नाही. त्यांच्या बहुमूल्य चार हातांच्या व तीन पायांच्या आधारावर मी वर्तमानातील अर्धी लढाई जिंकली आहे; पण भविष्यातील वाटचाल मी स्वत: करणार. स्वत: स्वावलंबी होऊन चंदनाप्रमाणे झिजणार. मी त्यांच्या त्यागाची परतफेड करू शकणार नाही, हे जरी खरे असले तरी त्या दोघांचे पुढील आयुष्य चंदनाच्या पवित्र सुवासिक वासामध्ये बुडवून टाकणार. माझ्या स्वकर्तृत्वावर जगातील सर्व सुख त्यांच्या पायाशी अर्पण करणार. आई हे सर्व करण्यासाठी मला तुझा आशीर्वाद दे, असे म्हणत त्याने डोळे मिटून हात जोडले व आईचा आशीर्वाद घेतला. त्याची पावलं आपोआप घराकडे वळाली. तो झपाझप पावले टाकीत घरी पोचला.

दत्ताने घरातूनच आवाज दिला. ताऽऽई... बाऽऽबा... मी पास झालो. दत्ताचा आवाज कमी पडताच सविता आपले देहभान विसरली. तिचा आनंद डोळ्यांतून घळाघळा वाहू लागला. तशीच सरपटत दत्ताजवळ आली. दत्ता खाली बसला. त्याने तिच्या एका पायावर आपले डोके ठेवले. सविताने त्याला कवटाळले. बाबा लांबूनच बहिणभावाची ती अनोखी भेट पाहात होते. ते त्यांच्या जवळ येऊन बसले. प्रेमाने दोघा लेकरांना छातीशी धरले. सविता भविष्यकाळात डोकावित होती. दत्ताच्या ह्या प्रगतीने दारिद्र्यावर मात करण्याचा अर्धा टप्पा पूर्ण झाला होता. त्या तिघांचा आयुष्यांतील काळरात्र संपायला अजून वेळ होती. दत्ताची जिद्द, सविताचे स्वप्न व बाबांचे कष्ट ह्या सर्व बाबींना भविष्यातील सुखाचा सूर्योदय पाहण्यासाठी येणाऱ्या काळाची वाट पाहावी लागणार होती. आज केवळ संपणाऱ्या दु:खाचे सावट दूर होऊन सुखाची चाहूल लागली होती. सुखदु:खाच्या किनाऱ्यावरील एकप्रकारचा मध्यांतर झाल्याचा भास होत होता. दत्ता आईच्या फोटोकडे पाहात होता. आईचा चेहरा आनंदी दिसत होता. त्याची नजर बाजूच्या अक्कलकोट स्वामींच्या फोटोकडे गेली. स्वामी आपल्याकडेच पाहात असल्याचे दिसले. फोटोखालील बोधवाक्य तो रोजच वाचायचा. पण तेच वाक्य आज त्याला फक्त आपल्यासाठीच लिहिले आहे, असे वाटू लागले. त्याने ठरविलेल्या ध्येयाला त्या वाक्यामुळे अधिकच बळकटी मिळाली. त्याच्या अंगात जणू नव्या ऊर्जेचा जन्म झाल्याचे त्याला जाणवू लागले. एक नवी प्रेरणा त्याला मिळाली होती.

**।। भिऊ नकोस; मी तुझ्या पाठीशी आहे! ।।**

❑

# फर्स्ट इम्प्रेशन

डॉ. छाया महाजन

''चला, खाली उतरून चहा घ्यायचा का?'' बसमध्ये समोरच्या सीटवर वाकत मी माझ्या दीड ते दोन दिवसात झालेल्या मैत्रिणीला म्हणाले. म्हणजे मला वाटलं की आमची मैत्री झालीये. आम्ही सहलीला आलेलो. इतरही खूप जण होते. कोणी मित्र-मैत्रिणींच्या गटाबरोबर आलेले. कोणी नातेवाइकांसोबत. मी मात्र नवऱ्यासह होते. आणि आमच्या-सारखे चारदोन फुटकळ ढगांसारखे नुसते तरंगत आलेलेही होते. विमानतळावरचा वाट पाहण्याचा भाग कंटाळवाणा होता, तरीही अपरिहार्य. तेव्हा आम्ही एकमेकींकडे पाहिलं. स्वभावानुसार मी हसले. तिनं नवऱ्याकडे पाहिलं हसू की नको असं. त्याचा अंदाज घेतला किंवा मला वाटलं तसं; पण मग हसली मंद.

थोड्या वेळात आम्ही बोललो. आम्ही एकाच टूरवर होतो. नाव गाव विचारलं. कुठून कसे इ. टिपिकल भारतीय. कारण इतर देशात असा उद्योग कमीच असतो. तासाभरानं ती बरीच मोकळी झाली. सिनेमावर बोललो - सुरक्षित विषय. राजकारण वगैरे नको. तरीही आम्ही एकमेकींना कृत्रिम होकार वगैरे दिले नसावेत.

मला ती खूप आवडली. माझ्यासारखीच पन्नाशीची. छान नाजूक, गोरी, छोटीशी वाटावी अशी. दाट केस. मधे भांग. खूप शांत होती. डोळे विलक्षण शांत होते, उत्सुक नव्हते. आक्रमक तर अजिबात नाही. प्रवास वेगवेगळ्या सीटवर बसून झाला, तरीही पोचताच मी चहाला तिच्या टेबलाला गेले. जेवायलाही त्यांनाच जॉइन केलं. ही दहा दिवसांची ट्रिप चांगली पार पडणार याची मला खात्री झाली होती. जेवणानंतर आम्ही बसमध्ये साइट-सीइंगला निघालो होतो. एकदा थांबलो होतो; पण तरीही मला वाटलं उतरावं आणि चहा मारावाच.

''चलतेस?''

''नको!'' ती तिरसटल्यासारखं म्हणाली. ''माझा झालाय मागच्या स्टॉपवर.''

''चल की घे थोडा.'' माझा आग्रह.

ती उठली नाही. तिच्या चेहऱ्यावर निग्रह होता. ती हललीसुद्धा नाही. दोनएक मिनिटं थांबून मी उतरले. मागच्या सीटवरची स्वाती खुशीनं उतरली आणि चहाही प्याली. छान हसली. आणखी दोन तासांनी खाण्याच्या पिशव्या बाहेर पडल्या. मी स्नेहाला खाण्याचा आग्रह केला. तिचा पुन्हा तसाच नकार. माझा अनुनय पुन्हा फोल ठरला. या वेळी मी दुखावले. इतक्या प्रेमानं आपण म्हणतोय तर एखादा घासही न घेण्याचा तिचा हट्ट पाहून आश्चर्य वाटत होतं. ही अशी ताठ का? माझं काही चुकलं का, असंही वाटून गेलं.

याउलट स्वामी होती. आनंदी, उत्साही, सतत बडबड करणारी. खूप पटकन प्रतिक्रिया देणारी. नेहमी सकारात्मक बोलणारी. जाड होती; पण दिसण्याबद्दल किंवा इतर बाबींबद्दल थोडाही विचार करत नसावी; पण तिचा आनंद मला आनंद देत होता. तिच्याबद्दलचं माझं मत चांगलं झालं होतं.

एकदा आम्ही प्रेक्षणीय स्थळं पाहायला बसमध्ये बसलो. स्वातीच्या वरच्या रॅकवर दुसऱ्या कोणाची तरी बॅग होती. स्वातीची बॅग ठेवायची तीच रॅक होती.

''कोणाची आहे बॅग?'' ती जोरात ओरडली.

एक वयस्क बाई म्हणाल्या, ''माझी आहे,'' त्यावर त्या वयस्क दांपत्यावर ती चिडली. खूप जोरजोरात त्यांच्याशी भांडू लागली.

मी मनात दचकले. तिचं हे स्वरूप असेल असं मला वाटलंच नव्हतं.

अगदीच थोड्या अनुभवांवरून मी मित्र-मैत्रिणी ठरवत

गेल्याचं माझं मलाच जाणवलं. पहिल्या इम्प्रेशनवर मी चिकटून राहते हेही जाणवलं. तेच कायम सत्य. आधी स्नेहाला मी सहृदय, हळवी समजले होते ती फार कडक होती, ठाम होती. तिरसट, माणूसघाणी होती. त्यापेक्षाही दुसऱ्याच्या भावना समजू शकत नव्हती. आनंदी स्मिता भांडखोर व रागीट होती.

कमी सहवासावरून माणसाच्या स्वभावाबद्दल, वृत्तीविषयी ठरवणं घाईचं आहे, तरीही पहिली छाप ही महत्त्वाची आहे. पहिलं इम्प्रेशन नेहमीच वरवरचं असेल असं नाही. त्यामागे आपला अनुभव असतोच ना. काही समाजधुरीणांचा, राजकीय विचारधारा यासम करणाऱ्यांचा पहिल ठसा अंतिम राहतोच.

माझे राजकारणी मित्र आहेत. त्यांच्या मते माणूस दारातून आत येतानाच त्यांना ओळखू येतात. येणाऱ्याला राजकीय महत्त्वाकांक्षा आहे की पैसे मागायचे आहेत की वर्गणी पाहिजे किंवा कौटुंबिक अडचण वा नोकरी हवी हे लागलीच कळतं. मला या गोष्टीचं कौतुक वाटतं. कारण मला ते कधीच जमलेलं नाही. तसं येणाऱ्याला कसं येणं केलं, वर फोन का केला हे विचारणंही जमलेलं नाही.

या दोघींच्या  अनुभवानंतर तर मी पुन्हा चमकले. खरंतर वारंवार नापास होणाऱ्या विद्यार्थ्याला नापास होण्यानं धक्का बसायला नको; पण बसतो खरा. त्यामागे काहीतरी बरोबर असण्याची आशा असते. माझं तसंच होतं. दर दिवशी अनुभव येतातच. अनेक अनुभवातून सुटका नसतेच. पण मी त्यातून काही शिकत नसावी. एकूणच विद्यार्थी म्हणून 'माठ' या संवर्गातली असावी.

बराच काळ आई मला 'भंगड' माणसासारखी चटकन विश्वास ठेवत जाऊ नकोस म्हणून बजावायची. मैत्रिणींकडून येणाऱ्या कटू अनुभवानंतर घरी येऊन रडण्याची रागदारी मी आळवायची. मग खडसावली जायची. पुढे मोठेपणी, जग आपल्यासारखं नसतं, त्यात वेगवेगळ्या प्रवृत्तीचे लोक असतात, आपण जपून राहावं हेही सूज्ञपणे आई सांगायची. एक शिष्ट बहीण तर 'किती धडाधड स्वत:बद्दल सांगतेस ग? समोरचा माणूस बघ ना! पहिल्या भेटीत समोरच्याला जोखून बोल की,' असंही म्हणायची.

पण पहिल्या भेटीतच समोरच्याला मी अत्यंत विश्वासार्ह माणूस गृहित धरत आलीये. माझ्या या वरवरच्या 'प्रथमदर्शनी छाप' प्रकरणाने मी अनुभवात कच्ची राहते. त्या समोरच्याच पुनर्दर्शनातील वागणुकीने दचकत राहते. माणसं मला आवडतात. कधी दिसण्यामुळे, कधी प्रवृत्तीमुळे, कधी बुद्धिमत्तेमुळे. तसं जमतंही. लवकर संवादही होतो. मनोमन मी त्यांना आवडीच्या व्यक्तींच्या संग्रहातही जमा करते.

पण हा वेग जरा जास्त असावा. माझ्या चिरस्थायी मैत्रीमागे माझाच विश्वास असावा. काळाची गती, व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा, मार्ग यामुळे मैत्रीच्या दिशा दुभंगतात. मैत्रीच्या काळापेक्षा आठवणींचा काळ मोठा होतो. आपण वेगळ्या वाटांचे पांथस्थ आहोत आणि वाटा ह्या झाडांच्या मुळांसारख्या चौफेर उपवाटा तयार करतात हेच कळतं. कोणा एका थांब्यावर एकत्र आलेले, काही काळ टिकलेले प्रवासी प्रासंगिक होऊन जातात. त्या वेळी 'चिरस्थायी' (माझ्या मते) होणारी ही मैत्री सरस्वती नदीसारखी होते.

यावरून मला व्यक्तिचित्रण हा प्रकार कधी लिहायला जमेल, असं वाटत नाही. चांगल्या व्यक्तीही भेटतात. अनुभवही चांगले असतात. पण त्या थोड्या काळातल्या प्रतिमेवर एकांगी, प्रकाशातल्या बाबींवर चित्रण करावंसं वाटत नाही. काही लेखक तर कुलुपाकडे पाहूनही लिहितात. त्यांच्याबद्दल फार आदर वाटतो एवढंच म्हणेन.

गदिमांचं 'तीळ आणि तांदूळ' असो, पुलंचं 'व्यक्ती आणि वल्ली' असो, अनंतराव भालेरावांची 'आई व आत्या' असो कायम लक्षात राहणारी माणसं. असे अजून कितीतरी लेखक आहेत, ज्यांची व्यक्तिचित्रणं ही तीन भिंतीत जिवंत होतात. त्यांचा परीघ मोठा असतो. गदिमांनी बहिणीबद्दल (अक्का) लिहिलेलं मी विसरूच शकत नाही. ही चित्रणं सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक संदर्भ घेऊन येतात. तो मोठा सांस्कृतिक ऐवज आहे. वृत्ती-प्रवृत्तींचा आलेख आहे. त्यात लेखकांचं सामर्थ्य आहे.

मूलत: माणसाला ओळखण्याची, पारखण्याची आणि पहिला ठसा यथार्थ असल्याची खूण आहे. माझ्यासारखी या पहिल्या ठशातच, फर्स्ट इम्प्रेशनलाच ठेचकाळते, वाट चुकते. त्या वेळी सर्वांप्रती आदर ठेवत 'इदं न मम' म्हणणे योग्य.

❑

# ‘न्यूनगंड’ – एक शत्रू

**सौ. सुजाता देशपांडे**

संध्याकाळी देवासमोर समई, निरांजन लावून नमस्कार करण्यासाठी हात जोडले. ‘शुभं करोती कल्याणम्, आरोग्यं धनसंपदा, शत्रुबुद्धी विनाशाय, दीपज्योती नमोस्तुते’ म्हटलं आणि पुन्हा एकदा नेहमीच पडणारा प्रश्न उसळून मनामध्ये आलाच. वयाची ५५ वर्षे पार पडल्यावरही लहानपणापासून मनात रुंजी घालत असलेला प्रश्न अजूनही डोकावतोय; म्हणजेच त्या प्रश्नाचं उत्तर सापडलं नाहीये, हेही प्रकर्षाने जाणवलं. मनातल्या मनात हसू आलं अन मन अलवार जुन्या आठवणींमध्ये भरकटायला लागलंच. ‘‘‘शत्रुबुद्धी विनाशाय’ म्हणजे नेमकं काय? शत्रूची बुद्धी की बुद्धीचा शत्रू?’’ स्वत:-बद्दल असलेला न्यूनगंडसुद्धा एकप्रकारे शत्रूच हे ज्या प्रसंगामुळे उमगलं तो प्रसंग डोळ्यांसमोर जशाचा तसा उभा राहिला.

मला आठवतं लहानपणी हा प्रश्न मी एकदा आजीला विचारला होता. तिनं सांगितलं ते तेव्हा बालबुद्धीला पटलंही. ‘‘वाईट विचारांची म्हणजेच शत्रू, त्यांच्या वाईट विचारांचा नाश होवो.’’ हा अर्थ तिने सांगितला होता.

लहानपण फार लवकर मोठं होत जातं, शरीराने आणि बुद्धीनेही. बऱ्याच अंशी पुढे जाण्याच्या नादात जिथून सुरुवात केली ती जागा, तो रस्ता, ते अंगणच आपण विसरतो. तरीही काही गोष्टी तशाच मनात रुंजी घालत राहतात. पडसाद उमटत राहतात. अंगणात खेळत असताना कुणीतरी कुणाला तरी मारलेली प्रेमळ हाक मनामध्ये खोलवर दडून बसलेली असते.

त्या दोघीजणी अगदी जिवलग मैत्रिणी! आम्ही पाचसहा जणींचा घोळका असायचा. त्यात या दोघींची विशेष जोडी होती. लक्षात रहाण्याजोगी. रमोला आणि गीताली. आम्ही त्या दोघींना गमतीने ‘गीतमाला’ म्हणून चिडवायचो. असंख्य गाण्यांचे मुखडे या दोघींना तोंडपाठ असायचे. गाण्याच्या भेंड्या खेळताना हमखास ‘गीतमाला’ विजयी पक्षात असायच्याच. मजेतले बालपण फुलपाखराचे पंख लावून हळूच मागे सरले. यौवनात पदार्पण केलं आम्ही. नंतर प्रत्येकीला वेगवेगळ्या विषयात रुची असल्यामुळे कॉलेजंही वेगवेगळी झाली. अभ्यास, भविष्य, नोकरी यांत गुरफटलो. घरंही बदलली. काहीजणी तर दुसऱ्या गावी रहायला गेल्यामुळे गाठीभेटी दुर्मिळ होत गेल्या. तरी मनाच्या एका मऊशा कोपऱ्यात लहानपण जपून ठेवलं गेलं होतं. स्वत:च्याही नकळत. अधूनमधून पत्राने ख्यालीखुशाली समजून घ्यायचो आम्ही.

गेल्या आठवड्यापासून आम्ही सर्वच चाट पडलो होतो. ‘गीतमाला’ची कॅसेट कुठेतरी अडकली होती. टेप निसटत होती आणि सुरातले गाणे सूर पकडत नव्हते. एरवीही खुसपूस, हसण्याचा मृदल ध्वनी कुठेतरी हरवला होता. दोघी बरोबर तर यायच्या; पण बरोबर मात्र नसायच्या. कुठेतरी काहीतरी बिनसलं होतं खास. नेमके कॉलेजच्या ॲडमिशनचे दिवस होते. सगळ्याजणी नवीन सुरुवातीसाठी उत्सुक होतो. त्यामुळे ‘गीतमाला’मधला बेबनाव इतका प्रकर्षाने जाणवला नाही म्हणा किंवा त्याकडे इतकं लक्ष दिलं गेलं नाही.

मधे बरीच वर्षं संसार, मुलंबाळं, नोकरी यात रमलो आम्ही साऱ्या. ५०नंतर मात्र थोडी फुरसत मिळाली आणि अधूनमधून कॉन्टॅक्टमध्ये असणाऱ्या आम्ही सहाही जणींनी एकत्र भेटायचं ठरलं. सर्वांनाच सोयीचं जाईल म्हणून तळेगावला माझ्याकडे. खूप उत्सुकतेनं मी ठरल्या दिवसाची वाट बघत होते. पुन्हा एकदा लहानपण अनुभवायचे म्हणून मोहरलो होतो आम्ही साऱ्याच. शालेय जीवनातल्या गमतीजमती आम्ही एकत्रच अनुभवल्या होत्या. कॉलेजमधल्या रंगीत दिवसांत अधूनमधून एकमेकींना भेटत होतोच. आता नेहमी भेटत राहायचं आणि एकत्र सहलीलासुद्धा जायचं. माझ्यासारख्याच इतर जणीही असाच विचार करीत असतील हे गृहीतच होतं एकमेकींचं

कुशल विचारायचं. सुखदु:खाची देवाणघेवाण करायची बास. मनसोक्त गाण्याच्या भेंड्या खेळायच्या.

आपण ठरवतो एक आणि त्याच वेळी विधाता मात्र आपल्यासाठी काही वेगळंच योजत असतो. अगदीच अपेक्षित नसलेलं. झालं असं – ठरल्याप्रमाणे साऱ्या जणी आल्या – 'गीतमाला'सुद्धा. फक्त या दोघीजणी कुठेतरी 'हरवलेल्या' होत्या. दोघीही उपस्थित असूनही खेळकरपणा, उत्साह हरवलेला होता. निस्तेज, पांढुरक्या आणि अबोलशा बसून राहिल्या होत्या. नाही कसं म्हणायचं म्हणून उदासीन वृत्तीनं, मरगळलेल्या चेहऱ्यानं एकत्र आलेल्या त्या जोडीकडे बघवत नव्हतं. फक्त त्या दिवशी 'रंग का भंग' नको म्हणून छेडलं मात्र कुणीच नाही. मन मात्र अस्वस्थ होऊन गेलं. 'शत्रुबुद्धी विनाशाय' – या दोघींच्या मैत्रीआड येणाऱ्या दुष्ट बुद्धीचा शोध घ्यायचाय असं मनोमन ठरवलं.

मला मान्य आहेच की शाश्वत असं काही नसतंच. नाती तरी त्याला अपवाद कशी असतील? अगदी मैत्रीचं झालं तरी नातंच ते. संदर्भ बदलत जातो आणि मैत्रीचं स्वरूप बदलत जातं. अडकून राहिलं की गुंता वाढतो; पण तरी गुंता सोडवायचा प्रयत्न करून बघायला काय हरकत आहे, याच विचारानं मी झपाटले.

सगळ्या व्यक्ती सारख्या नसतात. तशा रमोला व गीतालीसुद्धा वेगवेगळ्या होत्या. तरी त्यांचे स्वभाव, आचारविचार, आवडीनिवडी, राहणी बऱ्याचशा सारख्या होत्या. त्या जोडीला बघताक्षणी वाटायचं की किती साम्य आहे. तरी त्या जसजशा मोठ्या होत गेल्या तशी त्यांच्यातली 'भिन्न विशेषत:' त्या दोघींनाही जाणवायला लागली. तडजोड करत एकत्र राहाणं थोडं अवघड होत गेलं. तरी हे वेगळेपण ओळखणं त्यांना अवघड गेलं. एकमेकींना सुखी ठेवण्याच्या नादात दोघीही कोमेजल्या. नाइलाजाने एकमेकींचा सहवास स्वीकारत गेल्या. इतरांसाठी 'गीतमाला' म्हणून जगताना त्यांची ओढाताण होत राहिली. स्वभावभिन्नता स्वीकारणे आणि जगणे ह्यातच प्रेम आहे, हेच त्यांना उमगलं नाही.

रमोला व गीताली दोघीही आपापल्या संसारात रमल्या होत्या व सुखी होत्या. त्या दोघींनाही एकच खंत होती ती म्हणजे 'लहानपणातल्या या दोघी सुंदर मैत्रिणी' एकमेकींपासून दुरावल्या होत्या. रमोला जशी मोठी होत गेली तशी ती काहीशी अबोल आणि शांत होत गेली होती. तर गीताली तशीच अवखळ, खट्याळ आणि मजेत जगणारी राहिली. रमोलाला असं वाटायचं की आपण गरीब आहोत. गीतालीसारखं जगणं आपल्याला कसे जमेल? आईबाबांना इतका खर्च कसा परवडणार? हॉटेलिंग, शॉपिंग यापासून ती जरा दूर दूर राहात गेली. लहानपणी असे पैसे खर्च करण्याची जोपर्यंत वेळ आली नव्हती तोपर्यंत दोघीही मजेत होत्या. गीतालीला वाईट वाटू नये, म्हणून रमोला काहीतरी कारण सांगून वेळ मारून न्यायची व शॉपिंगला गीतालीबरोबर जाणे टाळायची. एकत्र बाहेर जाणे बरेचसे कमी झाल्यामुळे त्यांचा एकमेकींबरोबरचा सहवास कमी झाला आणि याचे दोघींनाही खूप वाईट वाटायचे. पण दोघींनीही कधीच एकमेकींकडे मन मोकळे केले नव्हते आणि मनातल्या मनात खंतावत मात्र होत्या.

खरंच, मनातल्या सगळ्या गोष्टी माणूस प्रच्छन्नपणे बोलू शकला तर मनुष्यप्राणी किती सुखी होईल. पण मला वाटतं, प्रत्येक माणूस वाढतो, जगतो, खातो–पितो ते स्वत:च्या एका गूढ आवरणातच. अगदी जवळची जवळची म्हणवणारी माणसं देखील हे आवरण भेदून आतपर्यंत पोहोचू शकत नाहीत. रमोला आणि गीताली देखील अपवाद नव्हत्या. फक्त आयुष्याचा एक–एक टप्पा गाठत पुढे जात असताना, प्रवासाचा मनमुराद आनंद घेत असताना 'बालपणीच्या आठवणी' त्यांना बेचैन करत होत्या. दोघींनीही ती आठवण तर जपली होती; मात्र स्वभावाचे वेगळेपण स्वीकारले नव्हते. दोघींनाही प्रेमभावना होती. मात्र त्या भावनेत त्या अडकून पडल्या होत्या. एकमेकींचा सहवास त्यांना हवाहवासा वाटत होता; मात्र गप्पांसाठी विषय सापडत नव्हता. साड्या, दागिने, मुलं त्यांचं शिक्षण यात रमणारी गीताली. रमोलासोबत साहित्य, पुस्तक, छानशा चित्रपटाविषयी बोलत नव्हती. बडबडी गीताली शांत रमोलाशी संवाद साधू शकत नव्हती. दोघीही आपापलं वेगळेपणाचं अस्तित्व ओळखायला कमी पडल्या होत्या आणि त्यामुळे दोघीही कोमेजल्या होत्या, दुरावल्या होत्या.

एकमेकींचे ऐकणे, एकमेकींचा आदर, मैत्रीच्या नात्यातही थोडी स्पेस असणे, असे मॅच्युअर्ड नाते असूनही रमोला व गीताली दोघीजणी अनावधानाने वेगळ्याच 'मोड'मध्ये गेल्या होत्या. निखळ बालपणीची समज, अल्लडपणा आणि घट्ट मैत्रीमध्ये थोडीशी दरी विनाकारण निर्माण झाली होती. आणि

ही दरीच ओलांडता येणं दोघींना खूप कठीण जात होतं. आपापल्या आवडींवर प्रेम करण्यापेक्षा मला तिच्यासारखं वागता का येत नाही, याच विचारांचा प्रभाव दोघींवरही प्रामुख्याने होता. दोघीही स्वत:चेच विश्लेषण करत बसायच्या मनातल्या मनात. इथेच सारी मेख होती. अगदी साधेसाधे प्रश्न त्या दोघींना पडत असत. 'असं बोलू की नको, अशी वागू की नको?' एक ना अनेक. नात्यातला सहजपणा पाऽऽर दूर कधी पळून गेला हे 'गीतमाला' समजूच शकल्या नव्हत्या. मला मात्र दोघींना भेटल्यावर ही गोष्ट लक्षात आली, आणि या सिलॅबसच्या बाहेरच्या प्रश्नाने दोघींना परीक्षेत फक्त काठावरच पास होता आले याचा उलगडा झाला.

इतक्या वर्षानंतर आम्ही भेटलो होतो; त्यामुळे ही गोष्ट पुन्हा प्रकर्षाने लक्षात आली होती. अगदीच टोकाला काही हे नातं गेलं नव्हतं. तडजोड व पेशन्स् दोघीही करत होत्याच. फक्त स्वत:मध्ये असलेल्या 'न्यूनगंडाला' बाहेर फेकून देण्याची गरज होती. 'आपापल्या आवडीनुसार जगणे म्हणजे आनंदाने जगणे' हे मनावर ठसायला हवं होतं. 'मी तिच्यासारखी नाही' हे मान्य करण्यापेक्षा आम्ही वेगवेगळ्या असूनही आमचे प्रेम निखळ आहे, ही भावना खूप छान आहे, हे समजणं गरजेचं होतं.

शांत रमोलाशी बोलताना मीच मग एका गेटटुगेदरमध्ये अगदी सहज पुस्तकांचा विषय काढला. कोणतं पुस्तक चांगलं आहे आणि का याची सुंदर चर्चा सुरू झाली, आणि आपोआप तिची कळी खुलत गेली. गीतालीने सुद्धा चर्चेत सहभाग घेतला होता. दोघीही पुन्हा लहान झाल्या आणि रमोला पटकन गीतालीच्या जवळ गेली. तिने गीतालीला कडकडून मिठी मारली – गीतालीच्या महागड्या साडीचा विचार न करता, गीताली एकदम सुखावली आणि पीळ सुटला.

एकमेकींनी नकारात्मक भावनेतून बाहेर कसं पडायचं, याचा विचार करून दोघीही कुठेतरी एकमेकींना जास्तच जपत होत्या. परिस्थिती हळूहळू बिघडत चालली होती. दुसऱ्याचा विचार करणे म्हणजे अर्थ स्वत:ला हवा तसा न काढता काही गोष्टी विचारपूर्वक, सवयी बदलण्याचा सराव करून स्वभावात रुजवायच्या, विचारांना योग्य सकारात्मक दिशा देऊन त्यांच्यावर नियंत्रण ठेवायचे, हेच 'गीतमाला' विसरल्या होत्या. सरळ स्पष्ट बोलणे, सरळ अर्थ काढणे आणि स्वत:बद्दल न्यूनगंड न बाळगता दुसऱ्याच्या आवडीचा आदर राखणे. परिस्थितीचा बाऊ न करता तिच्याशी जुळवून घेऊनही आनंद मिळवता येणे खूपच सोपे आहे. यासाठी मोठा पराक्रम करण्याची गरज नाही तर बाजू उत्तम सांभाळून मनातले प्रश्न, शंका, कटू विचार, छूमंतर करण्याची गरज आहे हे मात्र खरं. स्वत:च्या न्यूनगंडावर विजय मिळवणे म्हणजे सुद्धा एकप्रकारे 'शत्रुबुद्धी विनाशाय'. समोर समईची ज्योत शांत तेवत होती आणि माझं मन बालपणातल्या सुंदर मैत्रीभोवती फेर धरून छान हसत होतं. ❑


**'ग्रंथ भारती दीपावली २०२१'ला हार्दिक शुभेच्छा!**

**प्रा. विश्वास नेरकर**

भ्रमणध्वनी : ९४२१७२४०२८



# 'रायरेश्वर' शपथेची पूर्तता करायची आहे !

नारायण गुणे

छत्रपती शिवाजी महाराज यांनी वयाच्या १६व्या वर्षी काही सवंगड्यासमवेत रायरेश्वर येथील शिवमंदिरात वैभवसंपन्न हिंदवी स्वराज्याची पुनर्स्थापना करण्याची शपथ घेतली. भारतीयांनी सन १६४६ ते १९४७ या तीनशे वर्षात परदेशी आक्रमकांना परास्त केले. काही आक्रमक देश सोडून गेले व काही भारतीय समाजात विलीन झाले. आता स्वतंत्र भारत वैभवसंपन्न करावयाचा आहे. त्याची सुरुवात करण्याचे दायित्व महाराष्ट्राकडे आहे.

### महाराष्ट्राचे योगदान 'मराठा साम्राज्य'

संपूर्ण भारत देशास अभिमानास्पद वाटावी अशी महाराष्ट्राने करून दाखविलेली नजीकच्या काळातील कामगिरी म्हणजे अठराव्या शतकात निर्माण केलेले 'मराठा साम्राज्य'!

आदिलशाहीत सरदार असलेल्या शहाजी राजे यांच्या मनात व त्यांच्या पत्नी जिजाबाई यांना स्वतःचे राज्य हवे होते. सोन्याचे तख्त हवे होते. त्यांना हवा होता आपला झेंडा, आपला प्रधान आणि वैभवसंपन्न प्रजा! बाल शिवाजीने मातापित्याची ही इच्छा पूर्ण करण्यासाठी रायरेश्वर येथे शपथ घेतली.

रायरेश्वर शपथेच्या वेळी उत्तरेकडून अत्याचारी मोंगल भारतावर तुटून पडले होते. समुद्रातून पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रज हे आक्रमक युरोपियन व्यापारी भारताच्या किनाऱ्यावर आले होते. हिंदवी स्वराज्यास विरोध करणारे अनेक आप्त स्वकीय होते. राजे शिवाजी व त्यांच्या शिलेदारांनी स्वकीयांना आपलेसे करणे व उत्तर व दक्षिणेतून आलेल्या परकीयांशी लढा देणे असे तिहेरी कार्य यशस्वीपणे केले व तीस वर्षांच्या संघर्षानंतर १६७४ साली स्वराज्याची पुनर्स्थापना केली. शिवपुत्र संभाजी महाराज यांनी मोगल साम्राज्याशी कडवी टक्कर दिली. त्यानंतर मराठी योद्ध्यांनी 'मराठा साम्राज्याची' सीमा उत्तरेस पेशावर व दक्षिणेत रामेश्वरपर्यंत वाढविली.

### पराभवाकडून जयाकडे

शिवाजी महाराजांच्या काळापासून हिंदूंचा विजय होण्यास सुरुवात झाली. जिंजी ते गुजरात व मध्यप्रांतांपर्यंत मराठ्यांची राज्ये स्थापन झाली. दिल्लीच्या मोगल बादशहाने करार करून मराठ्यांकडे बंगाल, बिहार, ओरिसा ते सिंध, पंजाब व दक्षिणेतील सर्व सुभ्यासह हिंदुस्थानचा कारभार सोपविला. परिणामतः मराठ्यांच्या या आक्रमक धोरणांचा प्रोत्साहक व आश्वासक दरारा सर्व देशात निर्माण झाला.

पानिपत युद्धानंतर संपूर्ण साम्राज्याचा कारभार व्यवस्थित व्हावा म्हणून बऱ्याच सरदारांना त्यांच्या क्षेत्रात अधिसत्तेचे अधिकार दिले गेले. नागपूर, कोल्हापूर, तंजावर येथे छत्रपती शिवाजी राजे यांचे 'भोसले' वंशज अधिसत्तेवर होते.त्याशिवाय बडोद्याचे गायकवाड, ग्वाल्हेरचे शिंदे, देवासचे पवार,

महाराष्ट्रात, सांगली, मिरज, कुरुंदवाड, जत येथे पटवर्धन, औंधचे पंत प्रतिनिधी, असे अनेक सरदार त्या त्या भागातील कारभार पाहू लागले. मराठी साम्राज्याचा चांगला वचक होता. सतराव्या शतकात ब्रिटिशांची दृष्टी उत्तरेकडे दिल्लीकडे वळली. तेथे प्रामुख्याने मराठी सत्ता होती.

सन १८०३ मध्ये जनरल लेक याने व १८०५ मध्ये आर्थर वेल्सली याने मराठ्यांचा पराभव केला व दिल्ली ताब्यात घेतली. त्यानंतर १८१८ मध्ये मराठ्यांचा महाराष्ट्रात पराभव झाला. तत्पूर्वी मराठा साम्राज्याची प्रेरणा घेऊन देशात अनेक राजांनी व सरदारांनी अनेक संस्थांनांची निर्मिती केली होती. देशास पूर्ण स्वातंत्र्य मिळावे म्हणून १८५७ मध्ये पहिले स्वातंत्र्ययुद्ध लढले गेले, त्यात बऱ्याच संस्थांनिकांनी भाग घेतला. देशात अनेक सरदारांच्या शौर्याची, सैनिक दलाच्या क्षमतेची जाणीव ब्रिटिश सरकारला होती. मराठा साम्राज्य काळात संपूर्ण देशात अस्मिता जागृतीची ओळख समाजास झाली होती. देशात विखुरलेले सरदार एकत्र येणार नाहीत व साम्राज्याची शक्ती परत निर्माण होणार नाही ही गोष्ट लक्षात घेऊन ब्रिटिश सरकारने कावेबाज पद्धतीने सर्व संस्थांनिकांशी करार केले. सर्व संस्थांनिकांची अधिष्ठात्री इंग्लंडची राणी होती. तिला'एम्प्रेस ऑफ इंडिया' हा किताब होता. सर्व संस्थानिक हे त्या राणीचे 'राजपुत्र'(Princes) म्हणून संबोधिले गेले. ब्रिटिश सरकारने हे सर्व 'राजपुत्र' ऐषारामात राहतील व त्यांच्या मनात स्वातंत्र्याची ऊर्मी निर्माण होणार नाही, याची काळजी घेतली. परंतु मराठी साम्राज्याच्या स्वाभिमानाचा प्रभाव देशभर जबरदस्त होता. उपलब्ध स्वातंत्र्याचे आधारे त्या सर्व संस्थांनांनी आपापल्या क्षेत्रात प्रगतीची पायाभरणी केली. विद्यापीठे स्थापन केली, शिक्षण संस्था, सेवाभावी संस्थांना जन्म दिला, धरणे कालवे बांधले, अनेक उद्योगधंदे चालू होतील, याची काळजी घेतली. परिणामतः स्वातंत्र्याची, प्रगतीची ऊर्मी जागृत राहिली. अनेक संस्थांनिकांनी स्वातंत्र्य चळवळीस छुपा पाठिंबा दिला. सार्वत्रिक स्वातंत्र्य चळवळींचा अंतिम परिणाम म्हणून इंग्रजांना भारतास १९४७ साली स्वातंत्र्य बहाल करावेच लागले. येथेच रायरेश्वर शपथेच्या पूर्वतयारीचा भाग पूर्ण झाला. आता स्वतंत्र देशास पुनः वैभवसंपन्न करणे हे शपथेचे खरे उर्वरित दायित्व आहे.

**संस्थांनिकांचे वंशज आज समाजनेते**

स्वातंत्र्यानंतर देशाचे गृहमंत्री या नात्याने सरदार वल्लभ भाई पटेल यांनी सर्व संस्थाने भारतीय संघराज्यात विलीन करून घेतली. त्या सर्व संस्थांनिकांचे स्फूर्तिस्थान छत्रपती शिवाजी महाराज होते. त्या सर्वांमध्ये भारताविषयीची आस्था, प्रेम जागृत होते. आता देशातील सर्व संस्थांनिकांचे वंशज विविध भूमिकांद्वारे देशाच्या विविध विकासकार्यात आपल्या नेतृत्वाचा सहभाग देत आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज यांचा आपण 'जय भवानी, जय शिवाजी' असा उच्चस्वरात जयजयकार करतो. धुमधडाक्यात शासकीय व समाजपातळीवर महाराजांची जयंती मोठ्या मिरवणुका काढून साजरी करतो. आता या जयजयकारात संपूर्ण देश पुन्हा संपन्न अवस्थेपर्यंत गेला पाहिजे, हा संकल्प असावयास हवा. एकेकाळी आर्थिक, सांस्कृतिक, विज्ञान या सर्व क्षेत्रात अग्रेसर असलेला भारत आज जगात 'एक गरीब देश' म्हणून ओळखला जातो. देशाची ही ओळख बदलून आमचा भारत जयिष्णू व वैभवसंपन्न आहे अशी करावयाची आहे.

**२५.०० ट्रिलियन : रायरेश्वर शपथ पूर्तता**

जपान व महाराष्ट्र क्षेत्रफळ व लोकसंख्या या दोनही बाबतीत समान आहेत. जपान ५.०० ट्रिलियन अर्थव्यवस्था होऊ शकतो. महाराष्ट्रानेही ५.०० ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेस जाण्याचा प्रवास चालू केला की इतर सर्वच राज्ये महाराष्ट्राचा कित्ता गिरवतील आणि पंचवीस वर्षांनी स्वातंत्र्य शतक महोत्सवाचे वेळी, २०४७ साली, भारत देश जगात २५.०० ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे संपन्न राष्ट्र म्हणून उदयास येईल.

**देशाची ही संपन्नता**

....हीच छत्रपती शिवाजी महाराज यांना खरी आदरांजली होईल.
....हाच महाराजांचा खरा जयजयकार असेल.
....हाच शिवजयंती उत्सव असेल.
....हाच राज्यारोहण समारंभ असेल.
....हीच रायरेश्वर शपथेची पूर्तता असेल.

❑

# शान्ताबाई शेळके :
# एक असामान्य शब्दप्रभू व्यक्तिमत्त्व

**ज्योत्स्ना कोल्हटकर**



मराठी साहित्याच्या दरबारात ज्यांना मानाचे स्थान मिळाले. त्या ज्येष्ठ कवयित्री शान्ताबाई शेळके यांचे यंदाचे वर्ष हे जन्माताब्दी वर्ष!

शान्ताबाईंनी प्रत्येक साहित्य प्रकारावर आपला ठसा उमटविला. कथा, कादंबऱ्या, ललितलेखन, बालसाहित्य, अनुवाद, गीतलेखन असे सर्व साहित्य प्रकार त्यांनी हाताळले. पण रसिकांच्या मनात मात्र त्यांची प्रतिमा राहिली ती कवयित्री म्हणूनच! सुरुवातीला 'चित्रलेखा' या टोपणनावाने त्या लिहीत असत. आज ८० वर्षे होऊन गेली; तरी त्यांच्या लेखनातला ताजेपणा कुठेही कमी झाला नाही.

कविता हा त्यांचा प्राण होता. देवांग कोष्टी समाजात त्यांचा जन्म झाला. अतिशय सुसंस्कृत असे आईवडील त्यांना लाभले. त्यांचे वडील रेंज फॉरेस्ट ऑफिसर होते. त्यांच्या अनेक गावी बदल्या होत. प्रत्येक गावी त्यांना गावाबाहेर बंगला मिळे. त्यामुळे निसर्गाची प्रत्येक ऋतूत बदललेली रूपे त्यांनी पाहिली आणि त्यांच्याशी त्यांचे जन्मभराचेच नाते जुळले. त्या नऊ वर्षांच्या होईपर्यंत त्याची कालक्रमणा अगदी सुखाने चालू होती. परंतु अचानक त्यांच्या वडिलांचे निधन झाले, आणि त्या पुण्याला काकांकडे रहायला आल्या. लहानपणी त्यांच्याकडे भारत गौरव माला, हिंद एजन्सी मालेची पुस्तके घेत असत. वडील तालुक्याच्या गावी गेले की पुस्तके येत असत. त्या काळी ते 'गृहलक्ष्मी' मासिकाचे वर्गणीदार होते. आईवडिलांना वाचायची खूप आवड होती. एकत्र कुटुंबपद्धती असल्याने घरातल्या वडिलधाऱ्या स्त्रियांकडून त्यांना अनेक ओव्या, अभंग, सणा-समारंभाची गाणी, फेराची गाणी, जात्यावरच्या ओव्या तसेच दारावरच्या भिक्षेकऱ्याची गाणी ऐकायला मिळत. ती त्यांची पाठ होऊन जात. शान्ताबाईंच्या आईला वाचनाची खूप आवड होती. एकदा शान्ताबाईंनी माझी त्यांच्या आईशी ओळख करून दिली. तेव्हा त्यांच्या आई म्हणाल्या, ''मी एक हजार पुस्तके वाचली आहेत, आणि गडकरी माझे तोंडपाठ आहेत.'' तेव्हा शान्ताबाई मला म्हणाल्या, ''मला जी स्मरणशक्तीची देणगी मिळाली आहे ना ती आईकडूनच.''

शान्ताबाईंची स्मरणशक्ती जशी चांगली होती, तसेच त्यांचे शब्दप्रेमही उत्कट होते. कोणताही नवीन शब्द ऐकण्यात, वाचण्यात आला की त्या त्या शब्दाची पाळेमुळे शोधत. शब्दांइतकेच त्या निसर्गावर, माणसांवर, मांजरांवर प्रेम करत. मांजर हा त्यांच्या आवडीचा विषय. पण या विषयाचा त्यांनी खूप अभ्यास केला होता. मांजरांवर देशविदेशात झालेले संशोधन त्यांनी अभ्यासले होते.

शान्ताबाईंच्या वाचनवेडाला पुण्यात आल्यावर दिशा मिळाली. पुण्यात आल्यावर शिवाजी मराठा हायस्कूल आणि हुजुरपागेत त्यांचे शिक्षण झाले. आणि पुढे त्यांनी स.प. महाविद्यालयात प्रवेश घेतला. या महाविद्यालयीन जीवनात त्यांना श्री. म. माटे, रा. श्री. जोग, प्रिं. करमरकर, के. ना. वाटवे यांच्यासारखे गुरु लाभले. त्यामुळे त्यांचे साहित्यप्रेम निकोप बनले. या काळात फडके-खांडेकर युग चालू होते.

त्यांच्यासारखे आपणही लिहून पाहावे, ही ऊर्मी साऱ्याच तरुण पिढीच्या मनात होती. शान्ताबाईही याला अपवाद नव्हत्या. माधव जूलियन हे त्या काळच्या तरुण पिढीचे दैवत होते. त्यांचे स्वप्नरंजन आणि विरहतरंग हे काव्यसंग्रह शान्ताबाईंचे खूप आवडते होते. या प्रेमातूनच त्यांनी आपल्या कादंबरीला स्वप्नतरंग हे नाव दिले. शान्ताबाईंनी 'स्वप्नतरंग', 'विझती ज्योत', 'मायेचा पाझर', 'धर्म', 'ओढ', 'कोजागिरी', 'माझा खेळ मांडू दे' अशा कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या कादंबऱ्या प्रामुख्याने स्त्रीकेंद्री आहेत. त्यांनी लहानपणी घरात अनुभवलेले स्त्रियांचे विश्व, त्यांची कुचंबणा या कादंबऱ्यांतून व्यक्त झाली. मात्र त्यांची शैली खूप पाल्हाळिक होती. स्वत: शान्ताबाईंनीच ''कादंबरी हा मला न जमलेला वाङ्मयप्रकार आहे'' असे म्हटले आहे.

कादंबऱ्यांप्रमाणेच शान्ताबाईंनी अनेक कथाही लिहिल्या. कथाही स्त्रीकेंद्री आहेत. स्त्रियांची कुचंबणा, त्यांचा कोंडमारा, गुलामगिरी त्यांना प्रामुख्याने जाणवली तीच त्यांच्या कथांमधून व्यक्त झाली. कादंबऱ्यांमध्ये ग्रामीण स्त्री-जीवन त्यांनी रेखाटले. मात्र कथांमधील स्त्रिया ग्रामीण आहेत, तशा शहरीही आहेत. स्त्रियांचे अनेक प्रकार शान्ताबाईंनी दाखवले. कोणी प्रौढ कुमारिका आहेत, कोणी निपुत्रिक स्त्रिया आहेत. सासुरवास सहन करणाऱ्या सुना आहेत. संसारतापाने वैतागलेल्या गृहिणी आहेत, तर प्रेमभंग मूकपणे सहन करणाऱ्या स्त्रियाही आहेत. शान्ताबाईंच्या काही कथांमध्ये पुरुषांच्याही व्यथा आहेत. शान्ताबाईंच्या कथांमधले वातावरण कौटुंबिक आहे. त्यामुळे पात्रांच्या तोंडी अगदी साधीसुधी भाषा आहे. पाल्हाळिकता या सगळ्या कथांमध्ये आहे. मात्र या कथांची कथानके, प्रसंग, व्यक्तिरेखा बोलक्या आणि परिणामकारक आहेत. 'मुक्ता', प्रेमिक, काचकमळ', 'कावेरी', 'गुलमोहोर', 'सवाष्ण', 'अनुबंध', 'बासरी' हे त्यांचे कथासंग्रह.

फडके-खांडेकरांच्या प्रभावातून शान्ताबाईंनी ज्या कथा-कादंबऱ्या लिहिल्या त्या कृत्रिम अलंकारिक भाषेतल्या होत्या. परंतु ही त्यांची शैली बदलली ती आचार्य अत्रे यांच्यामुळे! 'नवयुग'मध्ये त्या आचार्य अत्रे यांच्याकडे काम करत असताना त्यांचे ललितलेखन सुरू झाले. आपल्या रोजच्या वागण्याबोलण्यात जसे आपण साधे, सोपे शब्द वापरतो, तसे शब्द अत्रे यांनी त्यांना लिहायला शिकवले. वृत्रपत्रातून सदरलेखन करताना मोजक्या शब्दांत विषय मांडायची हातोटी त्यांना जमली. त्यांच्या लहानपणचे अनुभव, त्यांचे शब्दप्रेम, त्यांच्या सहवासात आलेली माणसे, त्यांचे निसर्गप्रेम याच्या आधाराने त्यांनी अनेक वृत्तपत्रातून सदरलेखन केले. शान्ताबाईंना कथा आणि कादंबऱ्या लिहिताना अनुभवांचे जे स्वयंप्रकाशी तुकडे सापडले, ते त्यांच्या ललितसाहित्यातून व्यक्त झाले असे मला वाटते. 'शब्दांच्या दुनियेत', 'एकपानी', 'संस्मरणे', 'सांगावेसे वाटते म्हणून...', 'जाणता अजाणता', 'आनंदाचे झाड', 'धूळपाटी', 'पावसाआधीचा पाऊस' 'वडिलधारी माणसे', 'मदरंगी' ही त्यांची ललितलेखनाची पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. शान्ताबाईंचे व्यक्तिमत्त्व अनुभवसमृद्ध असल्याने त्यांच्या ललितलेखनात खूप विविधता आहे. त्या स्वत: आपल्या ललितलेखनाबद्दल म्हणतात, ''वाहत्या प्रवाहात अंग झोकून पाण्यावर तरंगताना पोहणाऱ्यांना जो अनुभव मिळतो, तोच आनंद असे मुक्त लेखन सातत्याने करताना मला लाभला आहे.'' या लेखांची शीर्षके देण्यातही औचित्य आहे. फळ तेच असते, पण त्याच्याबरोबर जर देठ आणि पान असेल तर त्याची गोडी वाढते. शोभाही वाढते. तसेच सूचक शीर्षके देऊन त्यांनी आपल्या लेखांची गोडी वाढवली आहे.

आचार्य अत्रे यांनी त्यांना एकदा पंडित नेहरूंचे चरित्र वाचायला दिले. त्यातला कमला नेहरूंच्या निधनाचा प्रसंग त्यांच्या मनाला अगदी चटका लावून गेला. तेव्हा अत्रे त्यांना म्हणाले, ''एवढा तुला हा प्रसंग आवडला आहे, मग आपल्या वाचकांसाठी तू त्याचा अनुवाद कर.'' येथून त्यांच्या अनुवाद लेखनाला सुरुवात झाली. नंतर त्या सेन्सॉर बोर्डावर काम करू लागल्या. तेव्हा अनेक उत्तमोत्तम इंग्रजी चित्रपट त्यांना पाहायला मिळाले. त्याच्या कथांचा अनुवाद त्यांनी 'गाजलेले विदेशी चित्रपट' आणि 'पश्चिमरंग' या नावाने केला. 'लिटल वुइमेन' ही त्यांची आवडती कादंबरी! पुढे 'युसिस'मध्ये काम करताना त्यांनी अनेक कादंबऱ्यांचे अनुवाद केले. 'लिटल वुइमेन' आणि 'गुड वाइव्हज्' या कादंबऱ्यांचा अनुवाद त्यांनी 'चौघीजणी' या नावाने केला. ती कादंबरी खूप लोकप्रिय झाली. याशिवाय सुखाची सीमा, निरूपमा, तालपुष्कर, लोकांचे राज्य, गवती समुद्र, औट घटकेचा राजा, गाठ पडली ठकाठका ह्या त्यांनी अनुवादित केलेल्या कादंबऱ्या. याशिवाय हेलन केलरच्या चरित्राचा त्यांनी 'आंधळी' या नावाने केलेला अनुवाद. वेद

मेहता या परदेशी शिक्षणासाठी जाणाऱ्या पहिल्या भारतीय अंध विद्यार्थ्याच्या आत्मचरित्राचा त्यांनी 'आंधळ्यांचे डोळे' या नावाने केलेला अनुवाद खूप लोकप्रिय झाला. ''कुठलीही भाषा आपल्याबरोबर आपली संस्कृती घेऊन येत असते. त्यामुळे अशा तऱ्हेच्या अनुवादांमुळे नवे प्रवाह, नवे प्रयोग यांचे आदानप्रदान होऊन भाषा अधिक समृद्ध होत असते,'' असे शान्ताबाई म्हणतात. त्यांनी अनेक जपानी हायकूंचे अनुवाद केले, ते 'पाण्यावरल्या पाकळ्या' या नावाने प्रसिद्ध आहेत. एक हायकू त्यांच्या वाचनात आला.

**'कॉफी हाऊस कॉफी हाऊस**
**प्रत्येक टेबलावर स्वतंत्र पाऊस'**

हा हायकू वाचल्यावर त्याच्या त्या प्रेमातच पडल्या. त्यानंतर त्यांनी अनेक हायकूंचे अनुवाद केले.

शान्ताबाईंनी मुलांसाठीही खूप लेखन केले आहे. त्यात 'थुई थुई नाच मोरा', 'टिप टिप चांदणी चिमुकली, 'झोपेचा गाव' ही बालगीते आहेत. त्यांच्या 'तोच चंद्रमा' या गीतसंग्रहातही अनेक बालगीते आहेत. तसेच त्यांनी लिली, मीनाक्षी, आरश्यातील आई, सागरिका, राजकन्या शाल्मिरा, चंद्रशेखर, कविता करणारा कावळा, निळा दिवा या कथा मुलांसाठी लिहिल्या आहेत. स्वत:ची विद्वत्ता विसरून मुलांना आवडतील अशा भाषेत, आणि मुलांच्या आवडत्या विषयांवर शान्ताबाईंनी मुलांसाठी लेखन केले आहे.

एवढे विपुल लेखन करूनही शान्ताबाईंची प्रतिमा रसिकांच्या मनात भरून राहिली ती कवयित्री म्हणून! 'वर्षा', 'रूपसी', 'गोंदण', 'अनोळख', 'जन्मजान्हवी', 'इत्यर्थ' हे त्यांचे कवितासंग्रह. त्यांच्या कवितांमध्ये अनेक निसर्गकविता आहेत, काही भावकविता आहेत, काही प्रेमकविता आहेत. 'वर्षा' आणि 'रुपसी' या कवितासंग्रहातील कविता अगदी साध्या, सोप्या भाषेतल्या आहेत. उदा.

**पावसाच्या धारा येती झरझरा**
**झाकळले नभ सोसाट्याचा वारा**

किंवा

**आम्रतरू हा धरी शिरावर प्रेमळ बिज साऊली**
**मृदुल कोवळी श्यामल हिरवळ पसरे पायातळी**

वाचल्याबरोबर या कवितेत अर्थाचे पदर उलगडत जातात. पण पुढील काळात शान्ताबाई बदलल्या. त्यांना जगाचे विचित्र अनुभव आले. त्यामुळे पुढच्या काळातली त्यांची कविता उदासीनतेला बरोबर घेऊन आली. सुरुवातीच्या काळात हर्षोत्फूल असणारा निसर्ग आता त्यांच्या उदास मन:स्थितीचा साक्षीदार बनून येऊ लागला. एकाकीपणाने त्यांच्या भावकवितेला व्यापून टाकले.

परंतु कथाकवितेत बदललेल्या शान्ताबाईंचे गीतलेखन मात्र ताजे टवटवीत राहिले. अनेक चित्रपटांसाठी, ध्वनिमुद्रिकांसाठी त्यांनी गीते लिहिली. त्यासाठी भूमिकेनुरून शब्दरचना करून गीते लिहिली. मुंबई आकाशवाणीवरील संगीतकार श्री. प्रभाकर पंडित यांनी शान्ताबाईंच्या गीताबद्दल सांगताना असे म्हटले होते, की ''शान्ताबाईंचा स्वररचनेनुसार लयबद्ध गीते लिहिण्यात हातखंडा होता.'' 'तोच चंद्रमा' आणि 'कळ्यांचे दिवस फुलांच्या राती' हे त्यांचे गीतसंग्रह आहेत.

शान्ताबाईंची एवढी विराट वाङ्मयसंपदा पाहिल्यावर असे वाटते की शान्ताबाईंचे व्यक्तिमत्त्व प्रत्येक साहित्यप्रकारात वेगवेगळ्या रूपात दिसते. शब्दांवर, निसर्गावर, माणसांवर, मांजरांवर, प्रेम करणाऱ्या या कवयित्री, भोवतालच्या जगातले अनुभव डोळसपणे मांडणारी ललितलेखिका, स्वत:ची विद्वत्ता विसरून बालगोपाळांसाठी सोप्या भाषेत लेखन करणारी बालकथालेखिका, भूमिकेनुरूप तालासुरांना बरोबर घेऊन गीते लिहिणारी गीतलेखिका, मराठीइतकेच इतर भाषांवर प्रेम करून त्यातले भांडार मराठी वाचकांपुढे खुले करणारी अनुवादिका, असे अनेक पैलू त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आहेत. प्रत्येक या शब्दावरी माझा ठसा, माझा ठसा हे शब्द माझा चेहरा हे शब्द 'माझा आरसा' असे म्हणत त्यांनी कायम शब्दांशी नाते जोडले आहे.

आर्थिक गरजेतून जरी त्यांच्या लेखनाला सुरुवात झाली असली तरी घरातल्या एकत्र कुटुंबात त्यांच्यावर झालेले संस्कार, ज्येष्ठ लेखकांचे, कवींचे संस्कार, नंतर आचार्य अत्र्यांचे संस्कार, त्यांनी काळानुरूप बदललेली आपली शैली, यामुळेच त्यांच्या साहित्याला कालातीत असे महत्त्व आहे.

आज शान्ताबाईंच्या 'गजानन श्री गणराया' किंवा 'गणराज रंगी नाचतो' या गीतांशिवाय गणपती उत्सव पूर्ण होत नाही किंवा 'तोच चंद्रमा', 'मी डोलकर' या गीतांशिवाय मराठी

गाण्याच्या कार्यक्रमात रसिकांचे समाधान होत नाही. त्या स्वत:च आपल्या एका गीतात म्हणतात, ‘अजून माझी उत्सुक ओंजळ अजून ताजी फुले’. या कवितेतला अजून हा शब्द त्यांचे चिरतारुण्य दर्शवितो. काळाची कितीही पाने उलटली तरी शान्ताबाईंचे लेखन रसिकांना आवडतच राहील, यात शंका नाही. त्यांनी स्वत:च आपल्या एका गीतात म्हटले आहे की,

**असेन मी नसेन मी**
**तरी असेल गीत हे**
**फुलाफुलात येथल्या**
**उद्या हसेल गीत हे**

या वर्षी शान्ताबाईंची जन्मशताब्दी आहे. त्यानिमित्ताने हा लेख लिहिताना माझ्या मनात त्यांच्या अनेक आठवणी जाग्या झाल्या. शान्ताबाईंच्या साहित्याचा अभ्यास करण्याच्या निमित्ताने त्यांचा लाभलेला सहवास हे माझ्या जीवनातले आनंदपर्व आहे. हा आनंद सदैव स्मरणात राहील.

शान्ताबाईंना जनमानसात स्थान मिळाले, ते त्यांच्या प्रसन्न शब्दकळेमुळे! फाय फौंडेशनचा पुरस्कार, गदिमा पुरस्कार, सु.ल. गद्रे मातोश्री पुरस्कार, चतुरंग पुरस्कार, दीनानाथ मंगेशकर पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांची त्या मानकरी ठरल्या. त्यांच्या ‘जन्मजान्हवी’ला कुसुमाग्रज पुरस्कार मिळाला, तर ‘गोंदण’ला शासकीय पुरस्कार मिळाला. आळंदी येथे भरलेल्या साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाचा मानही त्यांना मिळाला. हा मान शान्ताबाईंच्या नाजूक प्रतिभेचा आणि शब्दप्रभू व्यक्तिमत्त्वाचा आहे, हेही तितकेच खरे आहे. म्हणून तर जनसामान्यांच्या अध्यक्षपदी त्या विराजमान झाल्या आहेत, हे मान्य करावेच लागेल.

❑


‘ग्रंथ भारती दीपावली २०२१’ला हार्दिक शुभेच्छा!

आपल्या मनातील पुस्तकांसाठी

**प्रथमेश एंटरप्रायजेस**

कथा, कादंबरी, ललित, वैचारिक पुस्तकांचे
सातारा जिल्ह्यातील एकमेव वितरक

१४६/अ, प्रतापगंज पेठ, साईलीला अपार्टमेंट,
सातारा ४१५ ००२.
मोबाईल : ९८८१७३९७१०

# वागीश्वरीचा वरदहस्त लाभलेल्या शान्ता शेळके

■

**विवेक कवठेकर**

'गजानना श्री गणराया', 'जय शारदे वागेश्वरी' यांसारखी भक्तिगीते, 'किलबिल किलबिल पक्षी बोलती' सारखे बालगीत, 'सजणा का धरिला परदेस', 'काटा रुते कुणाला', 'जिवलगा राहिले रे दूर घर माझे', 'तोच चंद्रमा नभात' अशी विरह गीते, 'माझे राणी माझे मोगा', 'राजा सारंगा', 'शालू हिरवा पाचू नि मरवा', 'शारद सुंदर चंदेरी राती' यांसारखी प्रेमगीते, लेकीची पाठवणी करतानाचे 'दाटून कंठ येतो'सारखे वात्सल्यपूर्ण गीत, 'शूर आम्ही सरदार' सारखे स्फूर्तिगीत आणि 'रेशमाच्या रेघांनी' ही फक्कड लावणी लिहिणाऱ्या कवयित्री, लेखिका, अनुवादक व गीतकार शान्ता जनार्दन शेळके यांचे हे जन्मशताब्दी वर्ष!

एकाच लेखणीतून नवरसांची आश्चर्यकारक उधळण करणारी गीतं लिहिणाऱ्या शान्ताबाईंचा जन्म पुणे जिल्ह्यातील इंदापूरचा. खेड, मंचर या परिसरात त्यांचं बालपण गेलं. शान्ताबाईंचे आजोबा म्हणजे अण्णा शिक्षक होते. वडील रेंज फॉरेस्ट ऑफिसर असल्याने त्यांच्या बदलीच्या नोकरीमुळे चिखलदरा, नांदगाव, खर्डी या गावातही त्यांना वास्तव्य करावे लागले. त्यांच्या वडिलांना त्या 'दादा' आणि आईला 'वहिनी' म्हणत. एकूण ही पाच भावंडे, त्यात शान्ताबाई सगळ्यात मोठ्या. आईच्या मृदू स्वभावाचे, तिच्या चित्रकलेचे, तिच्या वाचनवेडाचे संस्कार कळत-नकळत शान्ताबाईंवर होत राहिले.

लहानपणी आजोळी गेल्यावर विविध पारंपरिक गीते, ओव्या, श्लोक त्यांच्या कानावर पडत. त्यामुळे कवितेची नि वाचनाची आवड, त्या संस्कारक्षम वयात रुजत गेली. १९३० मध्ये शान्ताबाईंच्या वडिलांचे निधन झाले त्या वेळी त्या नऊ वर्षांच्या होत्या. आता आई हीच त्यांची सखी झाली. चौथीपर्यंत त्यांचे शिक्षण झाले होते. यानंतर सारेजण पुण्याला काकांकडे आले. पुढील शालेय शिक्षण पुण्याच्या हुजुरपागेत झाले. सुसंस्कृत, सुविद्य, अभिजात अशा या शाळेतील वातावरणाचे संस्कार त्यांच्या मनावर झाले. १९३८ मध्ये त्या मॅट्रिक झाल्या आणि पुण्याच्या स. प. महाविद्यालयातून बी.ए. झाल्या. प्रा. श्री. म. माटे, प्रा. के. ना. वाटवे, प्रा. रा. श्री. जोग यांच्यामुळे अभ्यासाच्या पुस्तकांव्यतिरिक्त अवांतर वाचनाची, कवितेची गोडीही वाढत राहिली. या काळात साहित्याचे संस्कार त्यांच्यावर झाले. 'रविकिरण मंडळा'तील कवींच्या कवितांनी भारावलेला तो काळ होता. या वेळेस कॉलेजच्या नियतकालिकासाठी त्यांनी एक लेख लिहिला. प्रा. माटे यांच्या त्यावरील अभिप्रायाने त्यांना लेखनासाठी हुरूप आला. हळूहळू त्या कविता, लेख लिहू लागल्या. बी.ए. झाल्याबरोबर 'मुक्ता आणि इतर गोष्टी' नावाचा त्यांचा एक कथासंग्रहही निघाला. १९४४मध्ये संस्कृत घेऊन शान्ताबाई एम्.ए. झाल्या. या परीक्षेत त्यांना तात्यासाहेब केळकर सुवर्णपदक मिळाले. एम्.ए. झाल्यावर सुरुवातीला त्यांनी आचार्य अत्रे यांच्या 'समीक्षक' मासिकात, नंतर 'नवयुग' या अत्र्यांच्या 'साप्ताहिका'त आणि 'दैनिक मराठा'त दोन-तीन वर्षे काम केले. अत्र्यांसारख्या मुरब्बी संपादकासोबत काम करताना विविध प्रकारच्या लेखनाच्या अनुभवाची शिदोरी त्यांना तेथे मिळाली. अनेक साहित्यविषयक गोष्टी त्यांना शिकायला मिळाल्या. नागपूरचे हिस्लॉप कॉलेज, मुंबईचे रुईया आणि महर्षी दयानंद महाविद्यालयात त्यांनी अनेक वर्षे अध्यापन केले.

कविता, गीत, चित्रपटगीत, कथा, कादंबरी, बालसाहित्य अशा विविध साहित्यप्रकारांत शान्ताबाईंची जवळपास शंभर पुस्तके प्रकाशित झाली. 'वर्षा' (१९४७) हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह. 'रूपसी' (१९५६), 'तोच चंद्रमा' (१९७३), 'गोंदण' (१९७५), 'अनोळख' (१९८६), 'कळ्यांचे दिवस फुलांच्या राती' (१९८६), 'जन्मजान्हवी' (१९९०), 'चित्रगीते'

(१९९५), 'पूर्वसंध्या' (१९९६), 'इत्यर्थ' (१९९८) हे त्यांचे इतर काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. 'मुक्ता' (१९४४), 'गुलमोहर' (१९४९), 'प्रेमिक' (१९५६), 'काचकमळ' (१९६९), 'सवाष्ण' (१९७४), 'अनुबंध' (१९८०), 'बासरी' (१९८२), 'कविता करणारा कावळा' (बालकथासंग्रह १९८७), 'सागरिका' (बालकथासंग्रह १९९०) हे कथासंग्रह; 'विझली ज्योत' (१९४६), 'नरराक्षस' (१९४८), 'पुनर्जन्म' (१९५०), 'धर्म' (१९७३), 'ओढ' (१९७५), 'स्वप्नतरंग', 'कोजागिरी', 'मायेचा पाझर' या कादंबऱ्या; 'शब्दांच्या दुनियेत' (१९५९), 'आनंदाचे झाड', 'धूळपाटी' (१९८२), 'पावसाआधीचा पाऊस' (१९८५), 'एक पानी', 'वडीलधारी माणसे' (१९८९), 'संस्मरणें' (१९९०), 'मदरंगी' (१९९१), 'सांगावेसे वाटले म्हणून' (१९९४) हे ललितलेखन इत्यादी विपुल अशी त्यांची साहित्यसंपदा प्रकाशित झाली आहे. 'धूळपाटी' हे त्यांचे आत्मपर लेखन आहे. 'तालपुष्कर' (१९५०), 'आंधळ्याचे डोळे', 'औट घटकेचा राजा' (१९५७), 'चौघीजणी' (१९६०), 'गाठ पडली ठका ठका' (१९६१), 'गवती समुद्र' (१९६२), 'आंधळी' (१९६३), 'गाजलेले विदेशी चित्रपट' (१९८९), 'पाण्यावरल्या पाकळ्या' (१९९२), 'मेघदूत' (१९९४) असे अनेक अनुवादही शान्ताबाईंनी केले आहेत. विविध साहित्यप्रकारात विहार करूनही त्यांचं पहिलं आणि खरं प्रेम राहिलं ते कवितेवरच. हळुवार भावकवितेपासून नाट्यगीते, भक्तीगीते, कोळीगीते, बालगीते, चित्रपटगीते, प्रासंगिक गीते अशा विविध रूपांतून त्यांची कविता आपल्या भेटीला येत असते.


'रेशमाच्या रेघांनी लाल काळ्या धाग्यांनी' यासारखी लावणी लिहिणाऱ्या शान्ताबाईंना मराठीतील पहिल्या स्त्री लावणीकार म्हटले जाते. त्या बी.ए.च्या पहिल्या वर्षात असताना त्यांची पहिली कविता 'शालापत्रक' मासिकात छापून आली. तीही काहीशी बालगीत या स्वरूपात. एकीकडे अनेक कवींच्या, विशेषत: माधव जूलिअन यांच्या काव्याचा त्यांच्यावर फार मोठा प्रभाव होता. त्यामुळे सुरुवातीला त्या वळणाची कविताच त्या लिहित राहिल्या. पण 'गोंदण' (१९७५)पासून शान्ताबाईंच्या कवितेला चेहरा मिळाला. त्यांची कविता अधिकाधिक अंतर्मुख, चिंतनशील व प्रगल्भ होत गेली. बालपणाच्या सुखद आठवणी, प्रेम वैफल्य, मानवाच्या अपुरेपणाचा वेध, एकाकीपण, मनाची हुरहूर, सृष्टीची गूढता हे सारे काव्यविषय गोंदणपासून पुढील कवितेत अधिक प्रगल्भपणे प्रतिमारूप धारण करून वाचकांसमोर येतात.

वृत्तबद्ध कविता जशी त्यांनी लिहिली. तेवढ्याच सहजतेने त्यांनी गीते, बालगीते, सुनीते आणि मुक्तछंद रचनाही केल्या. ग. दि. माडगूळकरांप्रमाणेच उत्कृष्ट भावानुकूल चित्रपट-गीते लिहिणारी गीतलेखिका म्हणून त्यांना प्रसिद्धी मिळाली. गरजेनुसार, मागणीनुसार भालजी पेंढारकर, दिनकर पाटील, लता मंगेशकर, सुधीर फडके, हृदयनाथ मंगेशकर, सलील चौधरींसारख्या अनेक संगीत-दिग्दर्शकांसाठी त्यांनी चालीबरहुकूम अशी अनेक गीते लिहिली. हृदयनाथ मंगेशकरांनी चाली दिलेली, सर्वांत गाजलेली लोकप्रिय गीते म्हणजे 'वादळवारं सुटलं गं', 'वल्हव रे नाखवा', 'राजा सारंगा, राजा सारंगा' ही होत. जितेंद्र अभिषेकी यांनी संगीत दिलेल्या 'वासवदत्ता' आणि 'हे बंध रेशमाचे' या दोन्ही नाटकांसाठी शान्ताबाईंनी गाणी लिहिली. अशाप्रकारे कवितेच्या विविध रूपात, विविध लेखनप्रकारात त्या रमलेल्या होत्या. संतांच्या काव्यातील सात्त्विकता, पंडितांच्या काव्यातील विद्वत्ता आणि शाहिराच्या काव्यातील ललितमधुर उन्मादकता यांचा त्रिवेणी संगम शान्ता शेळके यांच्या कवितेत आढळतो. संतसाहित्य, पंतसाहित्य नि तंतसाहित्याचा मेळ पाहायचा असेल शान्ताबाई वाचायला हव्यात. त्यांच्या कथा ह्या त्यांनी बालपणी अनुभवलेल्या ग्रामीण जीवनाचे शब्दचित्र आहे. प्रौढ वयात अनुभवलेले शहरी जीवनातील अनुभवही नंतर कथेत आले. मनोविश्लेषण किंवा धक्कातंत्र या निवेदनशैलीचा वापर न करता अगदी सहज रोजच्या अनुभवाप्रमाणे त्यांच्या कथा अभिव्यक्त होतात. हीच बाब त्यांच्या ललितलेखनाबद्दल मांडता येते. रोजच्या दैनंदिन अनुभवाला एक मानवी, वैश्विक स्तर देऊन त्यांनी ललितलेखन केले आहे. मानवी जीवनाकडे बघण्याची कुतूहलपूर्ण दृष्टी, मानवी स्वभावाविषयीची उत्सुकता यापोटी मिळालेले अनुभव अतिशय चिंतनशीलतेतून शान्ता शेळके यांनी त्यांच्या ललितलेखनातून मांडले आहेत. अनुवादित कृतीला स्वतंत्र निर्मितीच्या जवळपास नेण्याची दृष्टी ठेवून अनुवादातून जवळजवळ पुनर्निर्मितीचा आनंद मिळावा, ह्या गांभीर्याने शान्ता शेळके यांनी त्यांचे अनुवाद कार्य केले आहे. सौंदर्यदृष्टी, रसिकता, मानवी मनोभूमिका आणि सहजता ही शान्ता शेळके

यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये होत. अवतीभोवतीचा सामाजिक, सांस्कृतिक अवकाश त्यांनी याच सौंदर्यदृष्टीतून आणि सहजतेतून अभिव्यक्त केला आहे.

शान्ताबाई शेळके यांना असंख्य पुरस्कारांनी गौरविण्यात आले. त्यांना डेक्कन बालमित्र मंडळाचा 'यशवंतराव चव्हाण पुरस्कार' (१९८८), कॉन्टिनेन्टल प्रकाशनाचा 'कुसुमाग्रज पुरस्कार' (१९९१), 'ग. दि. माडगूळकर पुरस्कार' (१९९४) इत्यादी पुरस्कार लाभले. त्याबरोबरच १९९६ मध्ये आळंदी येथे भरलेल्या ६९व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा म्हणून त्यांना सन्मानित करण्यात आले. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त कवितांच्या कार्यशाळा व्हायला हव्यात. त्यांतून गेय कविता लिहिणारे काही कवी निर्माण होऊ शकले, तर ती शान्ताबाईंना खरी आदरांजली ठरेल! ❑

**संदर्भ : मराठी विश्वकोश**



# कोरोना संकट आणि बदलती शैक्षणिक समीकरणे

**प्रा. हितेश गोपाल ब्रिजवासी**
ग्रंथपाल, विवेकानंद प्रतिष्ठान पुरस्कृत
के.ए.के.पी संस्थेचे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, जळगाव

प्रस्तावना : मित्रहो, गेल्या दोन वर्षापासून संपूर्ण जग हे कोरोनाच्या महामारीमुळे त्रस्त आहे. या वस्तुस्थितीशी आपण सर्व जण परिचित आहातच. या महामारीमुळे जगात दोन प्रकारचे वर्ग निर्माण झाले आहे. यांत पहिला वर्ग म्हणजे ज्यांच्या जीवनावर या महामारीचा झालेला नकारात्मक परिणाम आणि दुसरा वर्ग म्हणजे ज्यांच्या जीवनावर झालेला सकारात्मक परिणाम होय. अशा या दोन वर्गात जग विभागलेले दिसते. मात्र पहिल्या वर्गात मोडणाऱ्यांची संख्या फार मोठी आहे. यांत फक्त व्यक्तीच नव्हे तर समाज, संस्थाने, कार्यालये, उद्योगधंदे, श्रमिक अशा विविध घटकांचा समावेश आहे, शैक्षणिक क्षेत्रावर देखील या महामारीचा परिणाम झालेला जाणवतो. हा परिणाम काही अंशी सकारात्मक तर वाटतो मात्र याचा दूरगामी विचार केला तर, याचे नकारात्मक परिणाम जास्त आहेत असे आपल्या लक्षात येईल. या लेखात कोरोना संकट आणि त्यामुळे निर्माण झालेल्या नव्या शैक्षणिक समीकरणावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

**कोरोना संकट आणि शैक्षणिक क्षेत्र :** कोरोनामुळे 'न भूतो न भविष्यति' अशी परिस्थिती आपल्या सर्वांनी आपल्या आयुष्यात पहिल्यांदाच नुसती अनुभवली नाही तर त्या सोबत जीवनसुद्धा जगत आहोत. वर्ष २०२० चे स्वागत आपण सर्वांनी अगदी उत्साहात केले. मात्र तो आपल्यासोबत इतके मोठे संकट आणेल याची चाहूल सर्वसामान्यांना स्वप्नात देखील नव्हती. मात्र मार्च आणि एप्रिल महिन्यात या संकटाने आपल्या संपूर्ण आयुष्याची समीकरणे बदलून टाकली. सर्वत्र नैराश्य, चिंता, भय आणि मृत्यूचे तांडव सुरू झाले. मात्र मनुष्य हा या भूतलावरील असा एक प्राणी आहे जो संकटांचा सामना अगदी हुशारीने करतो. अर्थात मनुष्यजातीवर येणारे संकट हे त्याचे स्वनिर्मित असते यांत कुठलीही शंका नाही. कोरोनादेखील अशाच काही अमानवीय विकृतीचा भाग आहे. तंत्रज्ञान आणि संशोधनाच्या नादात मनुष्य हे जीवन जगणे विसरत आहे असे जाणवते. भविष्य अधिक सुखकर करण्याच्या प्रयत्नात आजच्या वर्तमानाकडे दुर्लक्ष केले जात आहे. अशी अवस्था आज सर्वच क्षेत्रात आहे. शैक्षणिकक्षेत्र देखील यास अपवाद नाही. गेल्या एक वर्षात अध्ययन आणि अध्यापनाची सर्व समीकरणे बदललेली जाणवतात. कोरोना संकटामुळे शैक्षणिक क्षेत्रात काहीअंशी सकारात्मक परिणाम झालेला जाणवतो, तर काही नकारात्मक परिणाम देखील उद्भवल्याचे चित्र आहे.

कोरोना संकटाच्या काळात शैक्षणिक क्षेत्रात झालेले सकारात्मक परिणाम जाणून घेऊ या.

- कोरोना संकटामुळे जगभर कामकाज थांबविण्यात आले. अनेक देशांत लॉकडाऊन लावण्यात आले. त्यामुळे आर्थिक, सामाजिक आणि व्यावहारिक चक्र पूर्णतः थांबले होते. मात्र हळूहळू परिस्थितीतून मार्ग काढून शिक्षकांनी अध्यापन आणि अध्ययन प्रक्रियेला सुरुवात केली. या माध्यमातून शिक्षकांनी विद्यार्थ्यांनाच नव्हे; तर त्यांच्या पालकांना सुद्धा या संकटाबद्दल जागृत केले. या संकटामुळे नैराश्य आणि भीतीच्या वातावरणात असलेल्या विद्यार्थी आणि पालकांना आशेचा एक नवा किरण दाखविता आला आणि पुन्हा एकदा सर्व सुरळीत होईल याची खात्री पटवून शिक्षणाची ज्ञानगंगा अविरत सुरू ठेवण्यात यश आले.

- कोरोना संकटाच्या काळात शैक्षणिक क्षेत्रातील कार्य इतक्या लवकर सुरू करणे कसे शक्य झाले, हा प्रश्न अनेकांना पडतो. याचे कारण म्हणजे 'जिथे ज्ञान आहे तिथे विचार आहे आणि जिथे विचार आहे तिथे मार्ग आहे' असे देखील आपण म्हणू शकतो. मात्र हे शक्य झाले ते सकारात्मक प्रयत्नाने व आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने.
- लॉकडाऊनच्या काळात घराबाहेर न पडता आपले कामकाज पुन्हा सुरू करण्यासाठी गरज होती ती म्हणजे अशा तंत्रज्ञानाची, ज्याच्या माध्यमातून कार्य करणे शक्य होईल. यासाठी सर्वात जास्त मदत झाली ती आय.सी.टी तंत्रज्ञानाची म्हणजेच माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाची. आय.सी.टी.च्या मदतीने इंटरनेट, मोबाईल, संगणक, दृक्श्राव्य संसाधने, मोबाईल ॲप्लिकेशन इत्यादींचा वापर करून पुन्हा एकदा शैक्षणिक प्रक्रिया सुरू करणे शक्य झाले.
- अनेक वेबिनार, ऑनलाईन कार्यशाळा, ऑनलाईन तासिका, व्याख्याने यांच्या माध्यमातून जणू ज्ञानाची वर्षाच होऊ लागली. खरेतर शैक्षणिक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर हा काही नवा प्रयोग नव्हता. मात्र इतक्या मोठ्या प्रमाणात याचा वापर करण्याची ही पहिलीच वेळ होती.
- शैक्षणिक क्षेत्रातील अध्यापन, अध्ययन आणि संशोधन कार्य सुरू ठेवण्यात आता शालेय स्तरापासून तर विद्यापीठ स्तरापर्यंतची पूर्ण फळी जोमाने कार्य करू लागली होती. नुसते अध्ययनच नव्हे, तर ऑनलाईन परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्षाचे नुकसान होऊ न देण्याचा विडा उचलण्यात आला आणि त्यात यशदेखील प्राप्त झाले.
- हळूहळू ग्रामीण भागापासून तर शहरी भागापर्यंतचे शिक्षक, प्राध्यापक, ग्रंथपाल, संशोधक हे चांगल्या पद्धतीने ऑनलाईन शिक्षणपद्धतीचा वापर करू लागले. अनेक शैक्षणिक संसाधने आणि माहितींची देवाणघेवाण होऊ लागली. यांत अनेक अडचणी देखील होत्या. मात्र त्यावर मात करत शैक्षणिक पद्धती आणि त्यांची समीकरणे बदलण्याचा यशस्वी प्रयत्न झाला.
- विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, शिक्षण आणि प्रशिक्षण टीव्ही, मोबाईल, इंटरनेट, रेडिओ, सोशल मीडिया, सोशल नेटवर्किंग साईट्सच्या माध्यमातून घरोघरी उपलब्ध करण्यात आले, जणू अध्ययन आणि अध्यापनाचे स्वरूपच नव्याने तयार करण्यात आले.

असे अनेक सकारात्मक बदल शैक्षणिक क्षेत्रात कोरोना



संकटाच्या काळात झाले. मात्र अनेक नकारात्मक बदल देखील या काळात झालेले आहेत आणि त्याचे दूरगामी परिणाम होतील असे चित्र सध्या तरी जाणवत आहे.

कोरोना संकटाच्या काळात शैक्षणिक क्षेत्रात झालेले नकारात्मक परिणाम जाणून घेऊ या.

- शैक्षणिक क्षेत्रातील बदलत्या कार्यपद्धतीचे अनेक नकारात्मक परिणाम शिक्षकांना व प्राध्यापकांना जाणवत आहे. यांत प्रामुख्याने शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या प्रती असलेली आपुलकी आणि आदर हा फारसा पूर्ववत् राहिलेला नाही. काही शिक्षक तंत्रज्ञानाच्या वापरात मागे असल्यामुळे अनेकदा विद्यार्थ्यांच्या वतीने त्यांचा उपहास केला जात आहे.
- काही विद्यार्थी हे आर्थिकदृष्ट्या कमकुवत आणि ग्रामीण भागातील असल्यामुळे शिक्षणाच्या या बदलत्या प्रवाहात त्यांना सामावून घेण्यात संसाधनांची कमतरता, जनजागृती आणि मानसिकता इत्यादींची अडचण येत आहे.
- विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणपद्धतीचा मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या त्राससुद्धा उद्‌भवत आहे. विद्यार्थ्यांसोबत शिक्षक व प्राध्यापकांना देखील असा त्रास जाणवत आहे.
- आधुनिक शिक्षणाचा विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर देखील परिणाम झालेला जाणवतो. ऑनलाईन शिक्षण घेत असताना अनेक अडथळे उदभवतात. जसे की, आवाज स्पष्ट न येणे, चित्र व्यवस्थित न दिसणे, इंटरनेटचा स्पीड, नेटवर्कचा अडथळा यामुळे अनेकदा विद्यार्थ्यांना अभ्यास किंवा सांगितली जाणारी माहिती व्यवस्थित कळत नाही. परिणामी विद्यार्थी आपला व्हिडिओ बंद करून त्या तासिकांकडे दुर्लक्ष करतात.
- काही विषयांना किंवा मुद्यांना शिकविण्यासाठी प्रयोगशाळेचा किंवा साहित्यांचा व फळ्याचा वापर करावा लागतो, आणि ऑनलाईन शिक्षणात अशा प्रसंगात अनेक वेळा, अनेक मुद्दे विद्यार्थ्यांना स्पष्टपणे सांगणे कठीण होते. यामुळे विद्यार्थ्यांची शिकण्याची इच्छा कमी होऊन असे शिक्षण विद्यार्थ्यांना नकोसे वाटू लागले. विद्यार्थ्यांची गृहपाठ करण्याची सवय संपत चालली आहे. पालकवर्ग देखील कोरोनाच्या संकटामुळे स्वत: चिंतेत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करण्यात असमर्थ ठरत आहे.
- विद्यार्थी हा अभ्यासापेक्षा जास्त मोबाईलवर वेळ घालविण्यात, खेळण्यात व टीव्ही बघण्यात व्यस्त आहे.
- परीक्षेची भीती विद्यार्थ्यांना राहिलेली नाही. एक तर सरसकट पास किंवा ऑनलाईन परीक्षेत होणारे विविध चुकीचे प्रकार यांमुळे विद्यार्थीवर्ग शिक्षणाप्रती बिनधास्त झालेला जाणवत आहे व परीक्षेबद्दल त्यांच्या मनात असलेली भीती नाहीशी होत चालली आहे. तर हुशार आणि अभ्यासू विद्यार्थी परीक्षा देता आली नाही या चिंतेत त्रस्त आहे.
- मागील वर्गात झालेला अभ्यास देखील विद्यार्थी विसरत चालले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा नव्याने सुरुवात करताना अनेक अडचणी उद्‌भवणार आहे.
- विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षणाचे महत्त्व आणि त्यांची गरज पुन्हा एकदा नव्याने निर्माण करावी लागणार आहे.
- शारीरिक शिक्षण, योग, प्राणायाम, मैदानी खेळ यांचे महत्त्वदेखील या काळात विद्यार्थी विसरत आहेत.

कोरोना काळात झालेल्या शिक्षणाच्या या दुर्गतीमुळे व उद्योगधंद्यांच्या झालेल्या अधोगतीमुळे उच्चशिक्षणाच्या पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगल्या रोजगाराची संधी उपलब्ध करून देणेदेखील शैक्षणिक संस्थांना (प्लेसमेंट) सध्यातरी शक्य होत नाही. किंबहुना या काळात पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना रोजगार मिळविण्यात अडचणी येतील किंवा नाही, हे येणारा काळच सांगू सांगेल.

❑

**सारांश :** कोरोना काळात अनेक नकारात्मक आणि दूरगामी परिणाम कोरोना संकटामुळे शैक्षणिक क्षेत्रावर झालेले दिसत आहेत. या सर्व बाबींमुळे शैक्षणिक क्षेत्रातील अध्यापन आणि अध्ययन प्रक्रियेला अधिक चांगल्या प्रकारे स्थापित करण्यासाठी सर्व परिस्थिती पूर्ववत् होणे गरजेचे आहे. तरच या सर्व बाबींवर नव्याने कार्य करता येणे शक्य होईल. आपण सर्व मिळून आशा करू या की कोरोना नावाचे संकट संपूर्ण जगातून लवकर नष्ट होईल आणि पुन्हा एकदा चांगल्या पद्धतीने शिक्षण उपलब्ध करता येणे शक्य होईल.

# स्वप्नभंग

**अनिल अभ्यंकर**

आज मी बऱ्याच महिन्यांनंतर रमाकांतच्या सोसायटीत गेलो होतो. दरवर्षी त्यांच्या सोसायटीत गणेशोत्सवाचे कार्यक्रम मी बघायला जायचो... छान कार्यक्रम असायचे. या शहरात आल्यावर रमाकांतची आणि माझी मैत्री झाली. आमच्या शेजारच्या सोसायटीत तो राहात असे. त्याखेरीज आमच्या सोसायटीत काहीच कार्यक्रम होत नसत. त्यामुळे मी रमाकांतच्या सोसायटीत आज गेलो.

''ये-ये! मनोहर... तुला फोन करणारच होतो. अरे या वर्षीदेखील आमच्या सोसायटीत चांगले कार्यक्रम बसवले आहेत. तू येणार ना बघायला?''

''हो! हो! हे काय विचारणे झाले... मी नक्की येणारच... मला सांस्कृतिक कार्यक्रमांची आवड; पण आमच्या सोसायटीत सगळे निरुत्साही लोक. मी तुमच्याकडे वर्गणीच द्यायलाच आलोय...

''अरे वर्गणीचे काय? तू येऊन आमच्या कलावंतांचा उत्साह वाढवतो तीच आमच्यासाठी मोठी वर्गणी आहे. ''चल, आपण सोसायटीच्या कम्युनिटी हॉलकडे जाऊ. तिथे कार्यक्रमांची तालीम बघता येईल...''

''अरे नको! नको! बरे दिसत नाही. डायरेक्ट कार्यक्रम बघायला येईन...''

''तेव्हा येशीलच रे; पण आत्ता चल माझ्याबरोबर! पाच मिनिटाचे काम आहे.''

मी रमाकांतसोबत कम्युनिटी हॉलमध्ये गेलो. थोडी धावपळ चालू होती; पण तरी एका खुर्चीवर बसलो. रमाकांत आत गेला होता. तेवढ्यात माझ्या कानावर एक आवाज ऐकू आला: आम्ही सादर करत आहोत, दोन पात्री मराठी एकांकिका- 'नावात काय आहे?'

चटकन मला विश्वासच बसेना. सादर करत आहोत नाटक- 'नावात काय आहे?'

नाटकाचे नाव ऐकताच माझं डोकं सुन्न झालं. मी आत धावलो... तर आत चालू होती दोन पात्री नाटकाची तालीम- 'नावात काय आहे?'

माझं डोकं गरगरायला लागलं- मला मनात आले, ओरडून सांगावे- थांबवा हे नाटक... पण माझ्या तोंडातून शब्द फुटत नव्हते. मला धाप लागली. मी पटकन बाहेर खुर्चीवर येऊन बसलो. जीव घाबरला होता. तेवढ्यात रमाकांत आला. ''अरे मनोहर बाहेर का बसलाय? आत येऊन नाटकाची तालीम बघायची. मस्त आहे नाटक- 'नावात काय आहे?' ''

''अरेऽ अरेऽऽ! मी आत गेलो. पण रमाकांत?''

''अरे मनोहर, तुझी तब्येत बरी नाही का? घामाने डबडबलाय तू. थांब मी पाणी आणतो...''

रमाकांतने पाणी पाजले. मी रुमालाने कपाळावरचा घाम पुसला. ''नाही रे रमाकांत! मी बरा आहे.''

''नाही, तुला ताण आलेला दिसतोय. चल, आपण डॉक्टरकडे जाऊ यात.''

''गरज नाही त्याची. मी बरा आहे. चल, आपण टपरीवर जाऊन चहा घेऊ. मला बरं वाटेल.''

चहा घेतल्यावर मला बरे वाटले. रमाकांतने विचारले, ''काय झालं होतं तुला मनोहर?''

''अरे मनोहर, तू गेल्यावर मी सहज आत डोकावले तर तिकडे नाटकाची तालीम चालू होती. नाटकाचे नाव ऐकून मी गांगरलो आणि अस्वस्थ वाटू लागले.''

''का बरं? नावात काय आहे! हे तर विनोदी नाटक आहे. मग तू का अस्वस्थ झाला?''

‘‘अरे, हे नाव ऐकल्यावर मला ४०-४२ वर्ष आधीचा माझा भूतकाळ आठवला. त्यामुळे मी अस्वस्थ झालो. या नावाचा आणि माझ्या आयुष्यात घडलेल्या घटनेचा मला संबंध आठवला.’’

‘‘ए मनोहर, कोड्यात बोलू नकोस. या नावाचा आणि तुझ्या आयुष्यात घडलेल्या घटनेचा काय संबंध आहे, हे मला ऐकायला आवडेल.’’

‘‘तर रमाकांत ऐक- ‘नावात काय आहे?’ या नाटकाने माझेदेखील आयुष्य ढवळून निघाले आहे. योगायोग असा, की तुमच्या सोसायटीतल्या या नाटकाच्या नावाने माझ्या आयुष्याच्या ४०-४२ वर्षांपूर्वीच्या आठवणी जाग्या झाल्या.’’

‘‘ए मन्या... सगळे तुम्ही सविस्तर सांगा... माझी उत्सुकता शिगेला पोहचली आहे.’’

‘‘रमाकांत, मी सगळं सांगतो. तू लक्षपूर्वक ऐक. ही घटना आहे अंदाजे ४०-४२ वर्षांपूर्वीची. आम्ही एक छोट्या गावात १५-२० मराठी कुटुंबीय एका आळीत छोट्या प्रमाणात गणेशोत्सव साजरा करत असू. छोटेमोठे कार्यक्रम. जसे- नकला, नृत्य, रांगोळी स्पर्धा, खेळायच्या स्पर्धा ठेवायचो. यात आम्हाला खूप आनंद मिळत असे. सगळे मध्यमवर्गीय असल्यामुळे खर्चिक कार्यक्रमांना फाटा असायचा; पण तरी सगळे समाधानी असायचो. वेगळे काही करावे असे मनात नसायचे. पण आमच्या या जुन्या कल्पनेला सर्वप्रथम छेद दिला आनंदीताईने. आनंदीताई तिचे यजमान अनुराग तांबे आणि दोन मुलांसह भाड्याने रहायला आली होती. तिच्यामुळे अनेक बदल झाले.’’

‘‘पण आनंदीमुळे असे काय बदल झाले हे सांग मनोहर?’’

‘‘हो... हो... सांगतो ना! आनंदीताई फारच सुस्वभावी, लाघवी, सगळ्यांशी हसतखेळत वागणारी होती. त्यामुळे आमच्या आळीतल्या सर्व कुटुंबीयांमध्ये मिसळून गेली... माझी बहीण अक्कासोबत तिचे मेतकूट चांगले जमले. आनंदीताईचे यजमान अनुरागदादा सुद्धा फार सुस्वभावी होते. असो, पुढे त्या वर्षी गणपतीसाठी आमची बैठक झाली तेव्हा आनंदी-ताईलाही बोलावले. ओळख वगैरे झाल्यावर कार्यक्रमाचा विषय निघाला.

आनंदीने विचारले- ‘‘अक्का, तुम्ही कोणते कार्यक्रम करता?’’

‘‘अगं आनंदी - नकला, गाणी, नृत्य, रांगोळी स्पर्धा ठेवतो.’’

‘‘आक्का, मी आमच्या गावी नाटकात काम केलेले आहे. एखादे नाटक बसवा.’’

‘‘आनंदी, कल्पना चांगली आहे. हा माझा लहान भाऊ मनोहर. थोडंफार लिहितो - त्यालाच सांगू नाटक लिहायला.’’

‘‘अरे वाऽ! अक्का हे तर फारच चांगले. मनोहर तू एखादे नाटक लिहून काढ!’’

‘‘आनंदीताई, माझ्या डोक्यात एक हिंदी नाटकाची कल्पना आहे.’’

‘‘चालेल! हिंदी तर हिंदी. काहीतरी वेगळे होईल.’’

‘‘मनोहर, तू नाटक लिहितोस हे माहीत नव्हते रे...’’

‘‘रमाकांत, मी छोट्यामोठ्या एकांकिका लिहिल्या आहेत!’’

‘‘बरं! मग मनोहर, पुढे ते हिंदी नाटक झाले का?’’

‘‘हो! हो!! सगळं सविस्तर सांगतो मनोहर तुला.’’

‘‘ते हिंदी नाटक होते- ‘मंगताराम की चाहत’ ’’

‘‘मग आनंदीने त्या नाटकात काम केलं का मनोहर?’’

‘‘नाही रमाकांत. आम्ही तिला विचारलं, पण ती म्हणाली, ‘‘माझी मुलं लहान आहेत. त्यामुळे मी या वर्षी भाग घेणार नाही; पण पुढच्या वर्षी नाटकात काम करेन.’’ पण आनंदीताईने नाटकासाठी खूप मदत केली. ती जवळजवळ रोज तालमीला येत असे. मीसुद्धा नोकरी करत होतो. अक्कासुद्धा नोकरी करत होती. त्यामुळे अक्काने अभिनयासोबत दिग्दर्शनाचा भारही उचलला. नाटक विनोदी होते, त्यामुळे लोकांची हसूनहसून पुरेवाट झाली. सगळ्यांना नाटक आवडले.’’

रमाकांत, पुढच्या वर्षी आम्ही गणपती उत्सवासाठी एक मराठी एकांकिका करण्याचे ठरवले. शाळेच्या नोकरीमुळे या वर्षी अक्काला नाटकासाठी वेळ नव्हता. मग आनंदीताईने एका मराठी मासिकात आलेली कथा नाटकासाठी निवडली. कथेचे नाव होते- ‘नावात काय आहे?’ ताईनेच कथेचे नाट्यरूपांतर केले. आनंदीताई यात बायकोची भूमिका करणार होती. मला यात गोंधळलेल्या नवऱ्याची भूमिका करायची होती. मी थोडे आढेवेढे घेतले. लगेच आनंदीताईने माझी कानउघाडणी केली.

‘‘मन्याऽ, माझ्यासोबत तुला काम करायला काय प्रॉब्लेम आहे?’’

''अगं ताई! प्रॉब्लेम काही नाही; पण थोडा संकोच-''

''आता समजलं मन्या, मी तुमच्या ग्रुपमध्ये नवीन आहे. म्हणून तू काम करायला संकोच करतोय, नकार देतोय.''

''नाही ताई, असं काही नाही गं?''

''मग मला कारण कळायलाच हवे? हे बघ मी नाटकात काम केलं आहे. चांगले काम करेन मी.''

''अगं ताई, तुझा गैरसमज होतोय - मी तर अगदी क्षुल्लक काम केलंय. माझ्यामुळे नाटक पडले तर...''

''मनोहर, अजिबात काळजी करू नकोस. मी मागच्या वेळी तुझं काम बघितलंय... तू चांगलं काम करतोस. आता आपलं हे नाटक फायनल झालंय... बरं मी तुला मन्या म्हणेन, चालेल ना?''

''हो! चालेल की - मी लहानच आहे.

''बरं! तू कामावरून केव्हा घरी येतोस?''

''मी पाच वाजता येतो...

''मग उद्यापासून संध्याकाळी सहा ते सात नाटकाची तालीम करू. ये उद्या घरी. बेस्ट लक...''

याप्रकारे दुसऱ्या दिवसापासून आमच्या 'नावात काय आहे' या नाटकाची तालीम सुरू झाली.

''मनोहर, तुमच्या त्या नाटकाचे आणि आमच्या सोसायटीच्या नाटकाचे नाव डिक्टो सेम आहे... म्हणूनच तुला भूतकाळ आठवला का?''

''हो. म्हणूनच तुमच्या सोसायटीच्या नाटकाचे नाव ऐकून मी अस्वस्थ झालो...''

''अरे, पण यात अस्वस्थ होण्यासारखे काय आहे? हा निव्वळ योगायोग आहे. मला तुझ्या अस्वस्थ होण्याचे कारण समजायला हवे...''

''तेच मी सांगणार आहे रमाकांत तुला. ठरल्याप्रमाणे आमची रोज तालीम सुरू झाली. सातआठ दिवस मी आणि ताई रोज तिच्या घरी वाचन करत होतो. थोडे पाठांतर झाल्यावर अनेक वेळा संहिता वाचताना अडचण यायची. ती म्हणाली, ''हे बघ मन्या! मी जरी तुझी ताई असले तरी या संहितेप्रमाणे मी तुझ्या बायकोचा रोल करत आहे. तरी भूमिकेत शीर.''

''अगं मला संकोच होतो...''

''मन्या, तू संकोच करत बसला तर भूमिकेला न्याय देऊ शकणार नाही. तुला अभिनयाची आवड आहे ना? उद्यापासून स्टँडिंग प्रॅक्टिस करणार आहोत.''

''ताई, मी उद्यापासून नीट काम करेन. खरं म्हणजे मला अभिनय क्षेत्रातच करियर करायचे आहे.''

दुसऱ्या दिवशीपासून आमची स्टँडिंग प्रॅक्टिस सुरू झाली. अनेक वेळा बायकोच्या भूमिकेत ताई माझा हात धरायची. मला गांगरलेला बघून ती रागवायची. मन्या, हे काय चाललंय तुझं? मी मागच्या वेळेस हिंदी नाटकात तुला अक्काच्या नवऱ्याची भूमिका करताना बघितले आहे. तेव्हा तू गांगरत नव्हतास; मग आत्ताच काय झाले?

''ते म्हणजे?... थोडी लाज वाटते.''

''हे बघ यात लाजायचे काय? अक्का किंवा मी असो किंवा तिसरी कोणी बाई असो- तू नवऱ्याच्या भूमिकेला न्याय दे. तू चांगले काम करतोस. तेव्हा संकोच सोड. जर जमले तर आपल्या नाटकाच्या वेळी माझ्या एका ओळखीच्या दिग्दर्शकाला बोलवेन म्हणजे ते तुला अभिनय क्षेत्राकडे वळवण्यासाठी मार्गदर्शन करतील.''

'''ताई, प्रॉमिस! यापुढे तुला तक्रार करण्याची संधी मी देणार नाही.''

''बस, मग आपले नाटक चांगले होणार असा मला विश्वास आहे.''

हळूहळू आमचे सूर चांगले जमले. एकदा तालीम करताना ताईचे यजमान अनुरागदादा आले. मी उभा राहिलो.

''अरे मन्या, उभे राहण्याची गरज नाही. चालू दे तुमची तालीम... छान नाटक होणार आहे. आनंदी, तुम्ही नुसती प्रॅक्टिस करता... या मन्याला चहा पाजत नाही का?''

''अरे अनुराग, मन्याला मी अनेकवेळा आग्रह करते चहासाठी; पण नेहमी नाहीच म्हणतो.''

''हे बघ मन्या, इथे नाही म्हणायचे नाही. हे तुझं दुसरं घर आहे असं समज. आनंदी आण चहा-बिस्किट.''

आनंदीताई चहा आणायला गेल्यावर मन्याला आनंदी सांगत होती, की ''तुला अभिनय क्षेत्रात करियर करायचे आहे. मग निर्धास्त रहा... आम्ही दोघं त्यासाठी तुला हवी ती मदत करू...''

''थँक्स दादा...''

''ए मन्या, आम्हाला औपचारिकता नकोय. थँक्सचे काय? तू पुढे मस्त काम करावे हीच इच्छा...

''चहापान झाल्यावर मी घरी आलो, रमाकांत... अशी आमची तालीम जोरात होती. दोनचार दिवसात नाटक सादर होणार होते...''

''मन्या, खरंच तू लकी आहेस. तुला अनुराग-आनंदीसारखी मदत करणारी माणसं भेटली. बरं पुढे काय झालं मनोहर?''

''काय सांगू तुला? सगळं काही नीट होत असताना आमच्या नाटकाला कोणाची दृष्ट लागली हे समजत नाही.''

''का काय झालं?''

''रमाकांत, परवा नाटक होणार होते म्हणून मी आणि आनंदीताई आज शेवटची तालीम करणार होतो. मी सकाळी कामावर गेलो; पण न जाणे का मला आज अस्वस्थ वाटत होते. मी घरी कामावरून आलो तर आनंदीताईच्या घरासमोर खूप मोठी गर्दी होती. मी घाईने घरात शिरलो आणि आईला विचारले, ''आई... ताईच्या घरासमोर एवढी गर्दी का झालीय?''

''अरे, मन्या काय सांगू? कसं सांगू?''

''काय झालंय आई?''

''अरे मन्या, आज मोठी दुर्घटना घडली... आनंदीचा ॲक्सिडेंट झालाय! घरचा गॅस संपल्यामुळे ती स्टोव्हवर स्वयंपाक करताना सत्तर टक्के भाजली. तिला आता मोठ्या शहरात नेलंय...''

''मला काहीच सुचेनासे झाले. मी ओरडलो बापरे! हे काय अघटित घडले... देवा... माझ्या ताईचे रक्षण कर रे! आई, ताईची काही बातमी?

''मन्या, आनंदीची प्रकृती फार गंभीर आहे. सत्तर टक्के भाजल्याने तिच्या जिवाला धोका आहे हे कळले...''

''अरे मनोहर, फारच विपरित घडले रे... जस्ट शॉकिंग.''

''रमाकांत, आईचे बोल ऐकल्यावर रडून रडून माझे डोळे सुजले... माझ्या दु:खाला सीमाच राहिली नाही.''

रमाकांत, मी देवासमोर ताईसाठी साकडे घातले. पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. दुसऱ्या दिवशी वाईट बातमी आली. ताईचे दु:खद निधन झाले होते.

''मनोहर, एक प्रश्न विचारतो, ताईच्या दुर्घटनेची माहिती तुला ऑफीसमध्ये कशी कोणी कळवली नाही म्हणजे तुला निदान तिला बघता आले असते...''

''अरे रमाकांत, त्या काळी आमच्या आळीत कोणाकडे फोनच नव्हते. आणि ही घटना इतकी अनपेक्षितपणे घडली की कोणाला मला कळवायला सुचलेच नाही. माझे दुर्दैव आणखीन काय. मला ताईचे शेवटचे दर्शनदेखील घेता आले नाही हा माझ्यासाठी फार मोठा आघात होता...''

''मन्या, पुढे अनुराग आणि पोराचे काय झाले?''

''रमाकांत... आनंदीताईचे शेवटच्या विधी त्यांच्या गावाकडे झाले आणि काही समजायच्या आत अनुरागदादा आमचे गाव सोडून गेले.''

''अनुरागदादाशी नंतर काही कॉन्टॅक्ट नाही झाला का?''

''नाही! फक्त नंतर हे समजले की आनंदीताईने मृत्यूपूर्वी आपल्या लहान बहिणीकडून वचन घेतले की तिच्या मृत्यूनंतर ताईच्या मुलांची आबाळ होऊ नये म्हणून तिने अनुराग दादाशी लग्न करावे. बहिणीने हे वचन पाळले. पण दादा आता कुठे असतो ह्याची माहिती नाही.''

''मनोहरने पुढे ते नाटक कधी केले नाही का?''

''नाही रे रमाकांत. ताई गेल्यावर आम्ही सर्व दु:खी होतो. त्यामुळे हे नाटकच काय पुढचे तीन-चार वर्ष कोणतेही नाटक सादर झाले नाही. रमाकांत, ताई गेल्यावर मी मनाने फार खचलो. एकदोन वर्षात तिने आम्हा सर्वांना आपल्या स्वभावामुळे जिंकले होते. ताईच्या अकाली निधनाने मी व्यक्तिगत रूपाने कोलमडलो. आणि अभिनय, करियर करण्याच्या इच्छेला फार मोठा धक्का बसला. जीवनाची दिशा बदलून गेली.

''मनोहर, खरंच तुझ्या आयुष्यात ही घटना फार दुर्दैवी होती. पण काळ कुठे थांबतो रे! मग पुढे काय झाले?''

''रमाकांत, देवाने मनुष्याला विस्मरणाची देणगी दिली आहे. त्यामुळे चार-पाच वर्षानंतर मी परत छोट्या-मोठ्या नाटकात काम केले. पण आता वाटचाल वेगळीकडे झाली. अभिनय मागे पडला, आणि प्रपंचात गुरफटलो. आणि सेवानिवृत्तीनंतर तुमच्या गावात रहाण्यास आलो. आणि योग म्हणून तुझ्याशी ओळख-मैत्री झाली. मी तुला सॉरी म्हणायला हवे. उगाच तुमच्या आनंदात मी माझ्या आठवणी उगाळत बसलो.''

''अरे, मनोहर क्षमा कसली मागतोस? तुला तुझे मन माझ्याजवळ उलगडता आले हे महत्त्वाचे आहेच ना? मी तुझे

दु:ख समजू शकलो. एक भावनाप्रधान मित्र मिळाला याचा आनंद आहेच ना?''

''रमाकांत हो खरंच आहे. तुझ्याजवळ मला माझ्या मनातले संचित दु:ख मोकळे करता आले. यालाच खरी मैत्री म्हणता येईल. आनंदीताई मला कायम स्मरणात राहणार. माझे करियर अभिनय क्षेत्रात नाही वाढू शकले तरी ताई अकाली गेल्याचे मला जास्त दु:ख आहे. असो, आज ती जिथे कुठे असेल तिथे सुखी रहावी. माझे स्वप्न भंग झाले असले तरी ताईसोबत घालवलेले आनंदाचे क्षण नेहमीच माझ्या सोबत राहणार. आज ती जरी या जगात नसली तरी तिचा आशीर्वाद माझ्या पाठीशी असणारच.''

''बरं मनोहर! आपण निघूयात... पण काही झाले तरी तू आमच्या सोसायटीची एकांकिका 'नावात काय आहे?' बघायला अवश्य ये...''

''हो! हो! रमाकांत, मी येणारच. ज्या नावामुळे माझ्या जीवनातल्या आठवणी जाग्या झाल्या त्या नाटकाला मी येणारच. बरं मी निघतो.''

रमाकांतचा निरोप घेऊन मी माझ्या घराकडे वळलो.

❑

# संस्कार

माणूस होण्याचे संस्कार माणसावर गेली चाळीस लाख वर्षं होत आहेत.

या सगळ्या काळात; माणसानं प्रेम, निष्ठा, विश्वास, श्रद्धा, द्वेष, प्रतारणा, विश्वासघात, संशय या गोष्टी शोधून काढल्या आणि त्यातल्या चांगल्या कोणत्या व वाईट कोणत्या याचेही संस्कार माणसावर केले. यातला माणसावर केला जाणारा मुख्य संस्कार असा आहे की, माणसानं दुसऱ्यावर प्रेम करावं आणि ते आयुष्यभर सलग, सतत करावं.

या संस्काराच्या बाबतीत एक गंमत होते. माणसानं माणसावर आयुष्यभर सलग आणि सतत प्रेम करावं, हा संस्कार माणसाचा अतिशय आवडता आहे आणि कोणत्याही माणसाचा या संस्काराला अजिबात विरोध नाही. पण यातली एक बारीक गफलत अशी आहे की, आपल्या आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक माणसानं आपल्यावर आयुष्यभर सलग आणि सतत प्रेम करावं, अशी इच्छा प्रत्येक माणूस करतो, पण तो स्वतः दुसऱ्या माणसांवर तसं प्रेम करीलच याची हमी नसते. दुसऱ्या प्रत्येक माणसानं आपल्यावर कायम निष्ठा ठेवावी, अशी अपेक्षा माणूस करतो; पण आपण दुसऱ्यावर कायम निष्ठा ठेवावी, हे पाळायला मात्र तो विसरतो. संधी मिळेल तेव्हा तो निष्ठा मोडून खायला बघतो.

थोडक्यात, दुसऱ्यांनी प्रेम कसं करावं, याचा माणसावर पूर्ण संस्कार इथवरच्या चाळीस लाख वर्षांच्या आयुष्यात व्यवस्थित झालेला आहे; पण आपण दुसऱ्यावर प्रेम कसं करावं, याचं माणसाचं प्रशिक्षण अजून अपुरं आहे. ते पूर्णत्वाला जायला माणसानं पुढची चाळीस लाख वर्षं घेऊ नयेत, म्हणजे मिळवली.

**– धीरज पांगारकर**
मोबा. : ८४८४८०५७५३

# महाराजांची 'पारदर्शक' महावस्त्रे

मूळ लेखक : **हॅन्स अण्डरसन**
मराठी अनुवाद : **रवींद्र गुर्जर**

फार जुन्या काळातील ही गोष्ट आहे. एका देशाच्या महाराजांना सतत नवे कपडे घेत राहणं इतकं आवडायचं, की आपल्याजवळचे सगळे पैसे ते त्यावरच खर्च करत. त्यांना आपल्या ना सैनिकांची, ना प्रजेची काळजी होती. जंगलातून फिरायला त्यांना आवडायचं नाही. फक्त आपले नवे कपडे घालून मिरवायचं हीच त्यांची आवड होती. दिवसाच्या दर तासासाठी त्यांच्याकडे नवा वेश, नवे कपडे होते. एखाद्या राजाबद्दल जसं म्हणतात की, 'महाराज दरबारात सरदारांबरोबर आहेत;' तसं या आपल्या महाराजांबद्दल म्हणत की : 'ते आपल्या वस्त्र-भवनात आहेत.'

त्या राजधानीच्या शहरात सदैव आनंदी-उत्साही वातावरण असायचं. रोज बाहेरचे शेकडो लोक तिथे भेट द्यायला यायचे. एकदा लोकांची फसवणूक करणारे दोन ठक शहरात दाखल झाले. आपण विणकर आणि उत्तम शिंपी असल्याची बतावणी त्यांनी केली. कल्पनातीत सुंदर कपडे शिवण्याची कला त्यांच्यात होती, असंही सांगितलं. त्यांचे नुसते रंग आणि अद्यावत शिलाईच उत्तम होती असं नाही, तर त्यांचं वैशिष्ट्य असं होतं की मूर्ख किंवा ज्यांची योग्य लायकी नाही, अशांना ते कपडे दिसतच नसत.

'म्हणजे ते कपडे अप्रतिम, अतिसुंदर असले पाहिजेत,' महाराजांनी विचार केला. 'ते घातले की माझ्या राज्यातील कोणते अधिकारी त्यांच्या पदाला योग्य नाहीत, ते सुद्धा कळेल. म्हणजे बुद्धिवान आणि मूर्ख लोकांची योग्य पारख होईल. खरंच! मला त्यांच्याकडे काही कपड्यांची मागणी केलीच पाहिजे.'

त्यांनी त्या दोन बदमाषांना भरपूर पैसे देऊन ठेवले; म्हणजे त्यांना ताबडतोब कामाला लागता येणार होतं.

त्या दोघांनी लगेच सूत-कापडाच्या दोन गिरण्या चालू केल्या. अर्थात, प्रत्यक्ष ते काही करणार नव्हते तर नुसतं नाटक! त्यांनी ताबडतोब रेशमी धागे आणि शुद्ध सोन्याच्या दोऱ्यांची मागणी केली. ते सगळं त्यांनी आपल्या मोठ्या पिशव्यांमध्ये भरलं, आणि रिकाम्या गिरण्यांमधे काम चालू असल्याचा आभास निर्माण केला. खास महाराजांसाठी गुप्त कपडे-निर्मिती असल्यामुळे कुणालाही तिथे प्रवेश नव्हता.

'विणकर शिंपी कसं काम करतात, ते बघायला पाहिजे,' महाराजांनी विचार केला; पण मूर्ख माणसांना ते दिसणार नव्हतं. त्यांना स्वत:बद्दल शंका नव्हती, पण स्वत: आपण जाण्यापेक्षा कोणाला तरी तिकडे पाठवणं योग्य होईल, असं त्यांना वाटलं. त्या कपड्यांची 'खासियत' शहरातल्या सगळ्या जनतेला ठाऊक होती. आपला शेजारी किती आणि कसा मूर्ख ठरेल, याची प्रत्येक जण वाट बघत होता.

'माझ्या एका जुन्या प्रामाणिक मंत्र्याला मी तिकडे पाठवतो,' राजानं ठरवलं. 'कपडे कसे बनत आहेत, हे बघायला तोच सर्वात योग्य आहे. तो हुशार आहे, आणि त्याच्याइतकं उत्तम काम दुसरं कोणीही करत नाही.'

म्हणून मग तो प्रौढ हुशार मंत्री दोन ठकसेनांच्या रिकाम्या गिरण्यांकडे गेला.

'अरे बापरे! हे काय?' तो मंत्री मनात म्हणाला. त्याचे डोळे आश्चर्यानं विस्फारले. पण प्रत्यक्ष काहीही न बोलण्याची दक्षता त्यानं घेतली.

त्या दोन चोरांनी मंत्र्याला अधिक जवळ यायला सांगितलं. कपड्यांची शिलाई, कलाकुसर आणि रंग हे सगळं चांगलं होतं का वाईट, हे त्याला विचारलं. मंत्री डोळे फाडफाडून बघत होता; पण समोर काही असेल तर दिसेल ना! बिचाऱ्याची अवस्था वाईट झाली.

'देवा रे!' तो मनात म्हणाला. 'म्हणजे मी मूर्ख आहे की काय? मला कधीच तसं वाटलं नव्हतं, आणि लोकांनाही ते कळता कामा नये. माझ्या पदाला मी योग्य नाही का? मला काहीच दिसलं नाही, हे सांगण्याची चूक मी करता कामा नये.'

'महाशय, तुम्ही कपड्यांबद्दल काहीच बोलला नाहीत,' शिवण्याचं नाटक करणारा एक चोर म्हणाला.

'वा, फारच सुंदर! अगदी कौतुकाला पात्र आहेत!' मंत्री आपल्या चष्म्यामधून मोकळ्या जागेकडे बघत म्हणाला. 'नव्या प्रकारची शिलाई आणि रंग – दोन्ही! मला ते खूप आवडल्याचं महाराजांना मी नक्की सांगीन.'

'हे ऐकून आम्हाला खूप आनंद झाला,' दोन्ही ठक म्हणाले. मग त्यांनी स्वत: त्या कपड्यांचं वर्णन केलं. मंत्री ते सगळं लक्षपूर्वक ऐकत होता; म्हणजे महाराजांना तेच सगळं सांगता येणार होतं.

नंतर चोरांनी आणखी पैसे आणि सोन्याची मागणी केली. कपडे चांगले सजवण्यासाठी त्यांची गरज होती. पोकळ हवेत मागयंत्र चालवायचं आणि कपडे शिलाईचं नाटक चालूच होतं. राजाकडून येणाऱ्या सगळ्या गोष्टी त्यांच्याच खिशात जाणार होत्या.

महाराजांनी लवकरच दुसऱ्या एका विश्वासू अधिकाऱ्याला तिकडे पाठवलं. कपडे कसे बनत आहेत आणि कधी तयार होतील, हे 'शिंप्यांना' विचारायचं होतं. त्याही माणसाची स्थिती मंत्र्यासारखीच झाली. तो डोळे ताणून बघत राहिला; पण रिकाम्या जागेशिवाय त्याला काहीच दिसलं नाही.

'कपडे सुंदर बनले आहेत ना?' दोन्ही चोरांनी विचारलं. त्यांनी पूर्वीसारखं त्यांचं वर्णन केलं.

'मी मूर्ख नाही, हे मला ठाऊक आहे,' राजाचा माणूस मनात बोलला. 'माझ्या पदाला मी नालायक आहे का? मला आश्चर्य वाटतं! पण हे कुणाला कळता कामा नये.' म्हणून मग त्यानं न दिसणाऱ्या कपड्यांचं भरपूर कौतुक केलं. नव्या प्रकारची शिलाई, रंगसंगती, कल्पकता – सर्व काही उत्तम! 'अत्यंत आकर्षक आणि नाविन्यपूर्ण!' त्यानं महाराजांना सांगितलं. त्या उत्कृष्ट कपड्यांबद्दल सगळ्या शहरभर चर्चा सुरू झाली.

आता महाराजांना असं वाटलं की, शिलाईचं काम चालू असताना स्वत:च एकदा ते बघावं. मग, राजदरबारातल्या निवडक लोकांसह ते तिकडे रवाना झाले. आधी त्या जागी जाऊन आलेले दोन विश्वासू अधिकारीही सोबत होतेच. दोघे ठकसेन रिकाम्या, प्रत्यक्ष नसलेल्या यंत्रांवर मन लावून, एकाग्रपणे काम करत होते.

'खरोखर अद्वितीय आहेत,' दोन्ही विश्वासू अधिकारी म्हणाले. 'बघा, महाराज! काय कलाकुसर आहे! काय रंग आहेत!' त्यांनी अदृश्य भागांकडे खूण केली. इतरांना ते दिसत असणार, असं त्यांना वाटत होतं.

'काय?' महाराज विचार करू लागले. 'मला तर काहीसुद्धा दिसत नाहीये! ही भयानक गोष्ट आहे! म्हणजे मी मूर्ख आहे काय? राज्य सांभाळायला मी योग्य नाही का? यापेक्षा वाईट गोष्ट काय असेल!'

'होय, अतिशय सुंदर!' महाराज, वरकरणी म्हणाले. 'मला अतिशय पसंत पडले आहेत!' समाधानानं मान डोलावून ते मोकळ्या, पोकळ हवेकडे पाहू लागले. आपल्याला काहीच दिसत नाही, ही गोष्ट ते सांगूच शकत नव्हते.

हजर असलेल्या सगळ्यांनाही काहीच दिसत नव्हतं; पण ते बोलणार कसं? उलट, एकमुखानं ते म्हणाले, 'किती सुंदर आहेत हे, महाराज!' लवकरच होणाऱ्या एका मोठ्या महोत्सवात त्यांनी तो घालावा, असा आग्रह सर्वांनी धरला. 'ही वस्त्रं महान आहेत! सर्वांगसुंदर आहेत! फारच अप्रतिम!' महिने अन् महिने जात होते. शिलाई सुरूच होती. महाराजांनी दोन ठकसेनांना सरदारकी बहाल केली, आणि 'सुसंस्कृत विणकर' अशी पदवीही दिली.

महोत्सवाच्या आदल्या पूर्ण रात्रभर ते दोन चोर कामाचं जोरदार नाटक करत राहिले. त्यांनी १६ मोठ्या मेणबत्त्या जाळल्या. महाराजांचे नवे कपडे पूर्ण करण्यासाठी ते किती तत्पर होते, हेच त्यांना दाखवायचं होतं. (खोट्या) मोठ्या कात्रीनं त्यांची 'कापाकाप' सुरू होती, आणि धागा नसलेल्या सुईनं ते शिवत बसले होते. 'आता महाराजांचे कपडे झाले तयार!' त्यांनी जाहीर केलं.

महाराज निवडक सरदारांना घेऊन स्वत: नवे कपडे आणायला गेले. एका चोरानं, हातात काही धरल्याप्रमाणे आपला हात उंच केला. 'ही बघा नवी तुमान!' दुसरा म्हणाला, 'हा सुंदर झगा आणि त्यावरचा कोट!' पुढे ते म्हणाले: 'हे कपडे कोळ्याच्या जाळीप्रमाणे अगदी हलके आहेत. एखाद्याला वाटेल की आपण अंगात काहीच घातलेलं नाही; पण तेच तर त्याचं सौंदर्य आणि वैशिष्ट्य आहे.'

'खरं आहे!' सगळे सरदार म्हणाले. त्यांना दिसत तर काहीच नव्हतं; पण ते बोलणार कसं!

'महाराज, आपण कृपया आपल्या अंगातील कपडे काढण्याची मेहेरबानी कराल का?' ठक म्हणाले, 'म्हणजे आपण नवे कपडे आत्ताच घालून बघू.' समोर एक मोठा आरसा होताच.

महाराजांनी (चड्डी सोडून) अंगातले सगळे कपडे काढून टाकले. फसव्या चोरांनी त्यांना एक एक खोटं वस्त्र द्यायला सुरुवात केली. कमरेभोवती पट्टा आवळल्याचं नाटक केलं. महाराज आरशासमोर गोल गोल फिरून स्वत:ला न्याहाळू लागले.

'राजेसाहेब नव्या कपड्यांमधे किती छान दिसत आहेत! त्यांच्या अंगावर अगदी उत्तम बसले आहे!' सगळे दरबारी लोक मोठ्यानं म्हणू लागले. 'काय शिलाई, आधुनिक वस्त्रे, रंग! इतके दिमाखदार कपडे आम्ही आजवर पाहिलेले नाहीत!'

महोत्सवाचा प्रमुख म्हणाला, 'बाहेर मंडपात आपली प्रजा महाराजांची प्रतीक्षा करत आहे.'

'ठीक! मी तयारच आहे,' महाराज म्हणाले. 'कपडे छान बनले आहेत ना?' पुन्हा एकदा त्यांनी आरशाभोवती एक गिरकी मारली. नंतर सेवकांनी त्यांच्या डोक्यावर छत्र धरलं, आणि सगळा लवाजमा बाहेर आला. कोणालाच राजाच्या अंगावर वस्त्रे दिसत नव्हती; पण ते बोलायचं धाडस कोण करणार?

संपूर्ण शहरात मिरवणूक काढण्यात आली. महाराज रथामधे मोठ्या ऐटीत बसले होते. रस्त्यांवर उभे असलेले आणि घरांच्या खिडक्यांमधून बघणारे लोक म्हणत होते : 'नव्या महावस्त्रांमधे महाराज किती शोभून दिसत आहेत. किती देखणी मिरवणूक!' राजाच्या अंगात एकही वस्त्र नाही असं म्हटलं तर तो मूर्ख होता आणि राजगादीला लायक नव्हता, असा अर्थ होणार होता. म्हणजे प्राणाशी गाठ! तो कोण पत्करेल!

'इतकी अप्रतिम वस्त्रं महाराजांनी यापूर्वी कधीच घातलेली नव्हती!'

'पण त्यांनी तर अंगात काहीच घातलेलं नाही,' एक लहान मूल म्हणालं.

'बघा, हे निष्पाप पोरगं काय म्हणतंय!' त्या बाळाचे वडील म्हणाले. प्रत्येक जण दुसऱ्याच्या कानात सांगू लागला. 'त्यांनी काहीच घातलेलं नाही. बाळ, म्हणालं की महाराजांनी अंगात एकही वस्त्र घातलेलं नाही.'

'खरोखर, त्यांनी काहीच घातलेलं नाही,' सगळे लोक ओरडू लागले.

महाराजांना खूपच मनस्ताप झाला, कारण खरी परिस्थिती त्यांच्या लक्षात आली होती. पण ते मनात म्हणाले, 'ही मिरवणूक तर पूर्ण केलीच पाहिजे!' म्हणून मग ते अधिकच ताठ बसले आणि रथ पुढे जात राहिला.

एव्हाना त्या दोन ठकसेनांनी लुबाडलेल्या सगळ्या गोष्टी घेऊन पलायन केलेलं होतं. ❑

(संपर्क : ९८२३३२३३७०)


**'ग्रंथ भारती दीपावली २०२१'ला हार्दिक शुभेच्छा!**

*ग्रंथसखा* *श्यामसुंदर जोशी*

१०, अर्जुनसागर, तेलवणे टॉवरसमोर, कुळगाव, बदलापूर (पूर्व) पिन ४२१५०३.
भ्रमणध्वनी : ९३२०० ३४१५६ ई-मेल : egrnathsakha@gmail.com

# वाटणी

मूळ इंग्लिश कथा : The Division
लेखक : **श्री. सुशांत सुप्रिय**
मराठी अनुवाद : **मंजुषा मुळे**

माझं शरीर रस्त्यात पडलेलं आहे. माझ्या कपाळावर जखमेच्या खुणा आहेत... माझा शर्ट रक्ताने माखलेला होता. माझ्याभोवती खूप गर्दी जमलेली होती... अतिशय उत्सुक झालेली, उत्साहित गर्दी. अगदी काहीच मिनिटात गर्दी दोन गटात विभागली गेली. एक गट असा दावा करत होता की मी हिन्दू होतो, आणि असं सांगताना त्या गटातले लोक केशरी झेंडे फडकवत होते. दुसऱ्या गटाचं असं म्हणणं होतं, की मी मुस्लिम होतो, आणि ते हिरवे झेंडे फडकवत होते. एक गट गर्जना केल्यासारखा ओरडत होता - ''या मुस्लिमांनी याला मारलंय. हा हिंदू आहे, याचे दहन केले जाईल. याच्या या मृतदेहाचा ताबा घेण्याचा हक्क आम्हाला आहे.'' यावर दुसऱ्या गटाने मोठ्याने ओरडत म्हटलं, ''मुळीच नाही. या अविश्वासू नास्तिक माणसांनीच याला मारलंय. हा आमचा मुस्लिम बांधव आहे. याचे दफनच केले जाईल. याच्या शरीरावर आमचा कायदेशीर हक्क आहे. आणि मग 'अल्ला हो अकबर' आणि 'जय श्रीराम' या दोन्ही आरोळ्या हवेत घुमायला लागल्या.

मी तिथे जवळपासच शांतपणे उभा होतो. मी मेलो होतो का? आरडाओरडा करणारे ते दोन्ही गट तर तसाच दावा करत होते.

मी म्हटलं, ''भावांनो, जरी मी मेलो असलो, तरी तुम्ही आधी मला हॉस्पिटलमध्ये घेऊन जा. निदान माझं पोस्टमॉर्टेम तरी करून घ्या. माझा अंत कसा झाला, एवढं तरी समजायला हवं. जमावाने लगेच उत्तर दिलं, ''अजिबात नाही. आम्ही तुला हॉस्पिटलमध्ये नेऊ शकत नाही. ही पोलीस केस आहे. आम्हाला कोर्टात उगीचच असंख्य फेऱ्या माराव्या लागतील.

पुन्हा 'जय श्रीराम' आणि 'अल्ला हो अकबर' या आरोळ्या सुरू झाल्या. आता तो जमाव हिंसक व्हायला लागला होता. घाबरून मी जवळच्याच एका झाडावर चढून बसलो. आता त्या गर्दीचा स्वत:वरचा ताबा सुटत चालला होता. या ठिकाणी ते का जमले होते, हेच बहुधा सगळे विसरले होते. आता त्यातल्या कुणावरच विश्वास ठेवण्यात अर्थ नव्हता. मेलेल्या माणसाला पुन्हा मारण्यापासून त्यांना कोण थांबवू शकणार होतं?

मी एका विचित्र पेचात सापडलो होतो. रस्त्यात पडलेला तो मृतदेह नि:संशय माझाच होता. तो देह जाळायचा की पुरायचा, हे ठरवण्याआधी, त्यांनी मला एकदा तरी विचारायला हवं होतं. पण तो जमाव माझं काहीच ऐकायला तयार नव्हता.

मी अगदी मनापासून त्यांच्याकडे अक्षरश: याचना केली की, ''भावांनो, माझ्यासारख्या क्षुल्लक माणसावरून, तुम्ही तुमच्या सांप्रदायिक सद्भावनांमध्ये तेढ का निर्माण करताय? त्या भावनांना धक्का लागू देऊ नका. त्या सद्भावना सांभाळा ना... सगळे एकत्र बसून चर्चा करा, आणि मला जाळायचं की पुरायचं याचा शांतपणे आणि समजूतदारपणे निर्णय घ्या. तुम्ही जर याबाबत कुठलाच निर्णय घेऊ शकला नाहीत, तर मग हा प्रश्न सोडवण्यासाठी कोर्टात जा.

यावर जमाव म्हणाला, ''कोर्ट न्याय देण्यासाठी फार वेळ लावतं. काही केसेस तर कधीकधी पन्नास वर्षांहूनही जास्त काळ रखडतात. खालच्या कोर्टाने दिलेल्या निकालाला आधी हायकोर्टात आव्हान दिलं जातं. मग त्यानंतर ती केस सुप्रीम कोर्टात दाखल केली जाते. तोपर्यंत तुझ्या या मृतदेहाची काय अवस्था होईल?''

मी म्हणालो, ''भावांनो, तुमच्यातली कटुता आणि रक्तपात, हे सगळं टाळण्यासाठी, तुमचा अंतिम निर्णय होईपर्यंत मी 'ममी' बनायला तयार आहे.''

पण त्या जमावाला बहुतेक रक्ताची तहान लागली होती. इतक्या जास्त वेळ थांबायला कुणीच तयार नव्हतं.

मग मी पुन्हा हिम्मत करून म्हटलं, '' नाहीतर तुम्ही असं करा ना... नाणं उडवून ठरवा काय करायचं ते... जे जिंकतील, ते त्यांच्या धार्मिक विचारधारेनुसार, मला जाळतील किंवा पुरतील.

लोकांनी ताबडतोब प्रत्युत्तर दिलं, ''आम्ही सर्वांनी 'शोले' सिनेमा पाहिलेला आहे. तशी खोडसाळपणाने केलेली चलाखी आम्हाला मान्य नाही.''

केवढी मोठी समस्या निर्माण झाली होती ही... 'माझा देह असा रस्त्यात पडलेला आहे... त्याच्याभोवती धर्मांध लोकांची गर्दी जमा झालेली आहे... मी स्वत: झाडावर चढून बसलो आहे... आयुष्यात पहिल्यांदाच, मी माझा अशा अवस्थेतला देह बघतो आहे... माझ्या स्वत:च्याच देहाची मला कीव वाटत असल्याचं माझ्या लक्षात आलं होतं... पण त्याहीपेक्षा जास्त कीव मला या गर्दीची वाटते आहे. माझ्या मृतदेहाचा ताबा मिळवण्यासाठी हे बिचारे लोक इतरांना मारायला, किंवा अगदी स्वत: मरायलाही तयार झाले होते.

इतक्यात, थोडासा शिक्षित वाटणाऱ्या एका दंगेखोराने, मी बसलो होतो त्या झाडाकडे बोट दाखवले, आणि तो इंग्लिशमध्ये ओरडायला लागला, ''अरे तो पहा... मूर्ख कुठला... धरा धरा... मारून टाका त्याला...'' आणि त्याचं ओरडणं ऐकून इतर कितीतरी जण, माझा मृतदेह तसाच ठेवून त्या झाडाखाली गोळा झाले. भीती वाटून मी आणखी वरच्या फांदीवर चढून बसलो.

ते दंगेखोर माझ्याकडे पाहून ओरडायला लागले, ''तू कोण आहेस ते पटकन् सांग आम्हाला, नाहीतर आम्ही तुला पुन्हा एकदा मारून टाकू.''

त्याही परिस्थितीत नकळत मला जरासं हसूच आलं. काय विचित्र माणसं होती ती! आधीच मेलेल्या माणसाला ते पुन्हा मारून टाकू इच्छित होते. मी खूप विचार केला. पण माझ्या आयुष्याची शपथ घेऊन सांगतो, ''मी हिन्दू होतो का मुस्लिम होतो, हे काही केल्या मला आत्ता आठवत नव्हतं. पण मग ज्या लोकांना स्वत:चा धर्म लक्षातच नसतो, किंवा माहितीच नसतो, अशा लोकांचा धर्म कुठला असतो? त्यांची नावे काय असतात?... राम... रहीम... सिंग... डेव्हिड...?''

आता गर्दीचा स्वत:वरचा ताबा सुटत चालला होता. दोन्ही बाजूचे लोक आता हातातले त्रिशूळ आणि तलवारी सरसावून उभे होते. 'जय श्रीराम' आणि 'अल्ला हो अकबर' या घोषणा पुन्हा आणखी जोमाने हवेत घुमायला लागल्या.

दंगल थोपवायची म्हणून मी पुन्हा एकदा त्या गर्दीला विनंती केली : ''भावांनो, कृपा करून शांत व्हा. तुम्हाला जर कुठलाच तोडगा काढता येत नसेल, तर एक काम करा – कृपया माझ्या देहाचे दोन भाग करा. अर्धा भाग हिंदूंनी घ्यावा आणि तो जाळून टाकावा. दुसरा अर्धा भाग मुस्लिमांनी घ्यावा, आणि तो पुरून टाकावा.

मला अतिशय न्यायप्रिय राजा विक्रमादित्य याची एक प्रसिद्ध गोष्ट आठवली. आणि मला खात्री वाटायला लागली की, त्यातला एक गट आता नक्की माघार घेईल, आणि माझ्या पवित्र देहाची विटंबना होणार नाही.

...पण बहुतेक असं काही घडणार नव्हतं. हातात विळे, कोयते, तलवारी, चाकू असं काय काय घेऊन, माझ्या शरिराचे तुकडे करायला सज्ज झालेली गर्दी पुढे पुढे यायला लागली. मी त्या झाडाच्या सर्वात वरच्या फांदीवर बसलो होतो, तरीही थरथर कापायला लागलो. शेवटी काहीही झालं, तरी ज्या शरीराचे असे तोडून वेगवेगळे भाग केले जाणार होते, आणि त्याची वाटणी केली जाणार होती, ते शरीर माझं होतं.

कुठल्या प्रकारची माणसं होती ही, जी मृतदेहाचे दोन भाग करण्याचा निश्चय करून उभी होती...? त्या माणसांच्या गर्दीकडे मी अगदी बारकाईने निरखून पाहिलं. दोन्ही बाजूच्या माणसांचे चेहेरे तर अगदी एकाच प्रकारचे होते. हातात केशरी झेंडे घेतलेल्या बाजूला ज्या धर्मांध मुद्रा दिसत होत्या, अगदी तशाच मुद्रा, हिरवे झेंडे हातात उंच घेऊन उभ्या असलेल्या दुसऱ्या बाजूलाही दिसत होत्या. दोन्हीकडे धोक्याची सूचना देणारे डोळे तसेच... चेहऱ्यावरचं विकृत हास्यही अगदी एकसारखं... आणि हातातल्या शस्त्राची धार तपासणारे हातही तसेच... हे पाहताना मला असं वाटत होतं की, त्यांना उद्देशून आपल्याला 'स्टॅच्यू'

असं म्हणता यायला हवं होतं. मग त्या सगळ्या दंगलखोरांचे पुतळे बनतील, आणि मग आपल्याला त्यांना समुद्रात बुडवून टाकता येईल.

...तो जमाव माझे तुकडे करायला अगदी उतावीळ झाला होता. इतक्यात त्या गर्दीतून कुणीतरी मोठ्याने ओरडलं, ''अरे, तुम्ही आधी फक्त त्याची पॅन्ट ओढून काढा. मग तो हिन्दू आहे की मुस्लिम आहे, हे लगेच स्पष्ट होईल.''

हा तर अगदी टोकाचा अपमान होता माझा. लगेच कितीतरी हात माझी पॅन्ट खाली ओढायला लागले. आता मात्र मी आणखी शांत बसू शकत नव्हतो. मी झाडावरून खाली उडी मारली, आणि मदतीसाठी आरडाओरडा करायला सुरुवात केली.

पण मी इतक्या मोठमोठ्याने मारत असलेल्या हाकांकडे कुणीच लक्ष दिलं नाही. जमावाने माझे सगळे कपडे ओढून काढून टाकले, आणि माझा देह तिथे पडलेला होता. संपूर्ण नग्नावस्थेत! मी शरमेने माझे डोळे घट्ट मिटून घेतले.

''अरे देवा शिवशंकरा... आम्हाला सैतानापासून वाचव देवा...

अचानकच त्या गर्दीतून, अगदी सुसंवादी वाटावे असे आनंदोद्गार स्पष्ट ऐकू यायला लागले. मी डोळे उघडले, आणि क्षणार्धात मला सगळं काही स्पष्टपणे लक्षात आलं- मी कोण होतो हे झटकन् मला आठवलं... काही दंगलखोर, हिजड्यांबद्दल अगदी खालच्या पातळीवरचे विनोद करत होते. काहींनी अगदी तालात टाळ्या वाजवत... 'हाय... हाय...' असा मोठमोठ्याने जणू जपच सुरू केला... ''अरे हा तर 'तो' ही नाही आणि 'ती' ही नाही... तृतीयपुरुषी आहे. असा फाजील विनोद करत ते हसायला लागले.

पण आता त्या जमावातला तणाव आणि गोंधळ मात्र कमी झाला होता. आणि मी सुटकेचा निःश्वास टाकला.

हळूहळू माणसांची ती गर्दी पांगायला लागली. केशरी झेंडावाले एका दिशेने गेले, आणि हिरवा झेंडावाले दुसऱ्या दिशेने गेले... म्हणजे आता माझी वाटणी होणार नव्हती तर... आजचा दिवस त्रिशूळ, चाकू, तलवारी यांचा नव्हताच. आता मी माझ्या नग्न देहासोबत एकटाच उरलो होतो... आणि मी 'त्या'ला प्रार्थना केली, ''देवा, सगळ्या सांप्रदायिक दंगलींचं जर या मार्गाने निराकरण होणार असेल, तर प्लीज प्रत्येकाला ते कर तृतीयपुरुषी-नपुंसक...''

❑



# तो परत आला होता?

मूळ कथा : **फ़र्नांडो सोरेंटीनो**
हिंदी अनुवाद : वापसी अनुवादक : **सुशांत सुप्रिय**
मराठी अनुवादक : **उज्ज्वला केळकर**

१९६५मध्ये मी २३ वर्षाचा होतो. भाषा आणि साहित्य या विषयाचा शिक्षक होण्यासाठी मी शिकत होतो. त्या वर्षी, वसंताचा गंध सप्टेंबरमध्येच हवेत दरवळू लागला होता. एका सकाळी, खरंतर पहाटेच म्हटलं पाहिजे, मी माझ्या खोलीत अभ्यास करत होतो. आमची बहुमजली इमारत होती आणि मी सहाव्या मजल्यावर राहात होतो. मी थोडासा आळसावलो होतो आणि थोड्या थोड्या वेळाने खिडकीतून बाहेर बघत होतो. तिथून मला आमची गल्ली दिसत होती. आणि रस्त्यावरच्या फूटपाथच्या बगलेत मला म्हाताऱ्या डॉन सिज़ेरियोचा बगीचा दिसत होता. त्यात भरपूर खत घातलेलं होतं. त्याचं घर गल्लीच्या कोपऱ्यावर तिरकं असं होतं. त्यामुळे ते कसल्यातरी अनियमित आकाराचं पंचकोनी असं काहीतरी दिसत होतं.

डॉन सिज़ेरियोच्या घराच्या बगलेत बर्नेस्कोनी परिवाराचं सुंदर घर होतं. ते सगळे अतिशय चांगले, उदार, हवेहवेसे वाटणारे लोक होते. त्याला तीन मुली होत्या आणि मी, त्यांची सगळ्यात मोठी मुलगी एड्रियाना हिच्यावर प्रेम करत होतो. अधूनमधून मी त्यांच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्याकडे बघत होतो. अर्थात इतक्या सकाळी सकाळी एड्रियाना दिसण्याची शक्यता नव्हतीच.

गल्लीत आता कोणीच नव्हतं, त्यामुळे माझं लक्ष आपोआप त्या माणसाकडे गेलं. घराच्या पुढच्या रस्त्यावर तो दिसत होता. तो आमच्या सोसायटीकडेच येत होता. हा रस्ता डॉन सिज़ेरियो आणि बर्नेस्कोनीच्या घराच्या समोरून जात होता. माझं त्याच्याकडे आपसूकच लक्ष गेलं. तो कुणीतरी भिकारी किंवा भटक्या असावा. इंद्रधनुष्याच्या रंगांच्या चिंध्यात तो लपेटलेला होता.

तो दाढीवाला माणूस अतिशय अशक्त आणि दुबळा दिसत होता. त्याने एक मोडकीतोडकी कडब्याची टोपी घातली होती. उकडत असतानाही त्याने धूसर रंगाचा एक फाटका ओव्हरकोट घातला होता. त्याचबरोबर त्याच्याकडे एक घाणेरडी झोळी होती. माझा अंदाज होता, की त्या झोळीत भीक म्हणून मिळालेल्या गोष्टी किंवा इकडेतिकडे मिळालेल्या खाण्याच्या वस्तू तो ठेवत असणार.

मी त्याच्याकडे बघत होतो. तो भिकारी डॉन सिज़ेरियोच्या घराच्या समोर थांबला आणि लोखंडी कुंपणातून त्याने घरमालकाला काहीतरी भीक देण्याचा आग्रह केला. म्हातारा डॉन सिज़ेरियो एक कंजूष माणूस होता. त्यांचे एकूणच व्यक्तिमत्त्व अप्रिय, तिरस्कार निर्माण करणारं होतं. भिकाऱ्याकडे न बघता, त्यांनी हातानेच त्याला निघून जाण्याची खूण केली. भिकारी मंद आवाजात त्याला सतत काहीतरी देण्याविषयी आर्जव करत होता. इतक्यात मी त्या म्हाताऱ्या माणसाच्या ओरडण्याचा आवाज स्पष्ट ऐकला, 'मला त्रास देऊ नको. चालता हो इथून...'

तरीही तो भिकारी सारखा आग्रह करत राहिला. तो दगडाच्या तीन पायऱ्या चढला आणि ते लोखंडी फाटक उघडण्याचा प्रयत्न करू लागला. डॉन सिज़ेरियोच्या सहनशक्तीचा आता अंत झाला. ते पुढे झाले आणि त्यांनी त्या भिकाऱ्याला जोरात धक्का दिला. भिकारी ओल्या पायरीवरून घसरला. त्याने फाटकाची लोखंडी सळी पकडण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

नंतर धडाम असा जोरदार आवाज आला. तो फरशीवर उताणा पडला. त्याचे पाय आकाशाकडे उठलेले मला दिसले. त्या क्षणार्धात दगडाच्या पहिल्या पायरीला धडकून, त्याचं डोकं फुटल्याचा आवाज मी ऐकला. डॉन सिज़ेरियो पळत पळत बाहेर आला. जमिनीवर पडलेल्या भिकाऱ्यावर तो झुकला. त्याच्या हृदयाची धडधड ऐकण्याचा त्याने प्रयत्न केला. ती त्याला ऐकू आली नाही. मग डॉन सिज़ेरियो घाबरला. त्याने हाताच्या पंजाने त्या भिकाऱ्याला पकडून दुसऱ्या टोकाला दगडांजवळ ओढत नेले. मग घरात जाऊन घराचे दार लावून टाकले. त्याच्या अनैतिक अपराधाचा कोणी साक्षी नाही, याबद्दल तो आश्वस्त होता. पण साक्षीदार मी होतो. लवकरच त्या बाजूने जाणारा एक माणूस त्या शवाजवळ थांबला. मग हळूहळू अनेक लोक तिथे जमा झाले. आणि तोपर्यंत पोलीसही तिथे पोचले. त्या मृत भिकाऱ्याला ॲम्ब्युलन्समध्ये घालून घेऊन गेले. ही गोष्ट इथेच संपली आणि यावर नंतर कुणीही काहीही बोलले नाही.

माझ्याबद्दल बोलायचं झालं, तर या घटनेबद्दल मी अतिशय सावध होतो आणि मी माझं तोंड कधीही उघडलं नाही. कदाचित माझं वागणं चुकीचं असू शकेल; पण त्या म्हाताऱ्यावर दोषारोप ठेवून मला काय मिळणार होतं? त्याने माझं कधीच काही बिघडवलेलं नव्हतं. दुसरी गोष्ट म्हणजे त्याचा इरादा त्या भिकाऱ्याला जीवे मारण्याचा मुळीच नव्हता. त्यामुळे आयुष्याच्या संध्याकाळी त्याला कोर्टात चकरा मारायला लागण्याचे कष्ट पडावेत, हे मला उचित वाटलं नाही. मला वाटलं, त्याला त्याच्या अंतरात्म्याचा आवाज ऐकत एकटंच सोडावं.

हळूहळू ती घटना मी विसरून गेलो. पण जेव्हा जेव्हा मी डॉन सिज़ेरियोला बघतो, तेव्हा तेव्हा मला अजब अशी अनुभूती येते. त्याला ही गोष्ट माहीत नाही, की या साऱ्या दुनियेत मी असा एकमेव माणूस आहे, की जो त्याचं भयानक रहस्य जाणून आहे. तेव्हापासून का कुणास ठाऊक, मी त्याच्यापासून दूर राहायला लागलो आणि त्याच्याशी बोलण्याची मी कधीच हिंमत केली नाही.

१९६९मध्ये मी २६ वर्षाचा झालो. मी एव्हाना स्पॅनिश भाषा आणि साहित्य यात डिग्री मिळवली होती. एड्रियाना बर्नेस्कोनीने माझ्याशी नाही, अन्य कुणाशी विवाह केला होता. ती व्यक्ती तिच्या योग्य होती की नाही, मी प्रेम करत होतो, तेवढंच प्रेम तीही व्यक्ती तिच्यावर करत होती की नाही, कुणास ठाऊक? त्या वेळी एड्रियाना गर्भवती होती आणि तिने केव्हाही बाळाला जन्म दिला असता. ती आताही पहिल्यासारखी त्याच सुंदर घरात राहात होती आणि दररोज, पहिल्यापेक्षा जास्तच सुंदर दिसत होती. सकाळी लवकर मी काही मुलांना व्याकरण शिकवून येणाऱ्या परीक्षेसाठी त्यांची तयारी करून घेत होतो. सवयीनुसार मी रस्त्याच्या पलीकडे एक उदास दृष्टिक्षेप टाकत असायचो.

त्या दिवशी अचानक माझं काळीज जोरजोराने धडधडू लागलं. मला वाटलं, मला दृष्टिभ्रम झालाय. तीन-चार वर्षापूर्वीचा तो भिकारी, ज्याला डॉन सिज़ेरियोने धक्का देऊन मारून टाकलं होतं, तो त्याच रस्त्यावरून चालत येत होता. त्याच चिंध्यात लपेटलेला. एक फाटका ओव्हरकोट त्याच्या अंगावर होता. कडब्याने बनवलेली एक मोडकी-तुटकी टोपी त्याच्या डोक्यावर होती आणि त्याच्या हातात एक घाणेरडी झोळी होती.

आपल्या विद्यार्थ्यांना विसरून मी खिडकीशी पोचलो. त्याची गती मंद झाली. तो आपल्या अपेक्षित इमारतीशी पोचणारच होता.

'अरे, तो मृत भिकारी पुन्हा जिवंत झाला-' मी विचार करू लागलो. 'डॉन सिज़ेरियोचा बदला घेण्यासाठी आला की काय?' पण तो डॉन सिज़ेरियोच्या फाटकापासून पुढे गेला. मग तो, एड्रियाना बर्नेस्कोनीच्या घरासमोरच्या फाटकाशी थांबला. मग तो फाटक उघडून आत गेला.

'मी आलोच इतक्यात...' असं माझ्या विद्यार्थ्यांना सांगून मी लिफ्टने खाली आलो. गल्ली पार करून सरळ एड्रियानाच्या घरापर्यंत गेलो.

तिची आई दरवाजाशी उभी होती. ती म्हणाली, ''अरे तू...?''

ती माझ्याकडे नेहमीच अनुकूल दृष्टीने बघत आलीय. तिने मला मिठीत घेऊन माझ्या गालावर ओठ टेकले. मला काहीच कळलं नाही. अखेर काय झालंय काय? मग मला कळलं, आत्ता आत्ताच एड्रियाना आई बनलीय. त्यामुळे सगळे अतिशय

खूश आणि उत्तेजित झाले होते. माझ्या विजयी प्रतिद्वंद्वीचा हात हातात हात घेऊन त्याचे अभिनंदन करण्याशिवाय मी काय करू शकत होतो?

मला कळत नव्हतं की मी ही गोष्ट त्यांना विचारू की गप्प बसू? मग मला या प्रश्नाचं उत्तर सापडलं. मी खोट्या औदासिन्याने म्हटलं, ''मी घंटा न वाजवताच आत आलो; कारण मी एक घाणेरडी मोठीशी झोळी घेतलेल्या भिकाऱ्याला आपल्या घरात गुपचूप येताना पाहिलं आणि मला वाटलं, चोरी करण्याच्या उद्देशाने तो आत आलाय.''

ते सगळे माझ्याकडे हैराण होऊन बघू लागले. ''भिकारी? झोळी? चोरी करण्यासाठी? त्यांना कळतच नव्हतं. कितीतरी वेळापासून ते इथे बैठकीच्या खोलीतच होते आणि त्यांना तसा कुणी भिकारी दिसला नव्हता.

''मग माझ्याकडून नक्कीच काहीतरी चूक झालेली असणार.'' मी म्हटलं. मग ते मला एड्रियाना आणि नवजात शिशु असलेल्या खोलीत घेऊन गेले. अशा स्थितीत मला काय बोलावं हे कळेना. मी तिला शुभेच्छा दिल्या आणि बाळाकडे नीट पाहिलं. मी विचारलं, ''बाळाचं नाव काय ठेवणार?'' त्यांनी सांगितलं, ''त्याच्या वडलांच्या नावावरून गुस्तावो ठेवण्याचं नक्की केलंय.'' त्याचं नाव फर्नांडो ठेवलं असतं, तर मला जास्त बरं वाटलं असतं; पण मी गप्प बसलो.

घरी आल्यावर मला निश्चितपणे वाटू लागलं की हा तोच भिकारी आहे, ज्याला म्हाताऱ्या डॉन सिज़ेरियोने धक्का देऊन मारलं होतं. तो बदला घेण्यासाठी नाही, तर एड्रियानाच्या मुलाच्या रूपात जन्म घेण्यासाठी परतला होता. पण दोन-तीन दिवसानंतर मला माझी कल्पना हास्यास्पद वाटू लागली आणि हळूहळू मी ती गोष्ट जवळजवळ विसरूनच गेलो. ती घटना मी पूर्णपणे विसरून गेलो असतो; पण...

१९७९ मध्ये एक अशी घटना घडली, की त्यामुळे १९६९ मध्ये घडलेल्या घटनेची आठवण झाली.

दहा वर्षं होऊन गेली. काळ पुढे पुढे जात होता. मी खोलीतल्या खिडकीजवळ बसून एक पुस्तक चाळत होतो. थोड्या वेळाने मी सवयीनुसार खिडकीतून बाहेर इकडे-तिकडे पाहिले. एड्रियानाचा मुलगा गुस्तावो आपल्या घराच्या गच्चीवर खेळत होता. तो जे खेळत होता, ते त्याच्या वयाच्या दृष्टीने अगदी पोरकट असे होते. मला वाटलं, आपल्या वडिलांकडून त्याने वारशात मंदबुद्धी प्राप्त केलीय. तो जर माझा मुलगा असता, तर यापेक्षा निश्चितपणे चांगला खेळ निवडून खेळला असता आणि आपले मनोरंजन केले असते.

गुस्तावोने दोन्ही घरांच्या मधे जी कॉमन भिंत होती, त्यावर काही रिकामे डबे ठेवले होते. आपल्या गच्चीवर उभा राहून दगड मारून तो ते पडण्याचा प्रयत्न करत होता. हे सगळे डबे आणि दगड, त्यांचे शेजारी डॉन सिज़ेरियो यांच्या बागेत पडत होते. मला वाटलं, म्हातारा डॉन सिज़ेरियो याने आपली फुले आणि फुलझाडे या दगडांमुळे नष्ट झालेली पाहिली, तर त्यांना नक्कीच हार्ट अ‍ॅटॅक येईल.

अगदी याच वेळी डॉन सिज़ेरियो आपल्या घरातून बाहेर पडला. तो चांगलाच म्हातारा झाला होता. अतिशय लडखडत चालत होता. अगदी सावधपणे एक पाय, मग दुसरा पाय खाली ठेवत तो चालत होता. घाबरत घाबरत तो लोखंडी दरवाजापर्यंत पोचला. दरवाजा उघडून तो हळूहळू त्याच्या पुढच्या दगडी पायऱ्या उतरू लागला

म्हातारा बागेत आला. अगदी त्याच वेळी गुस्तावोने शेवटचा डबा दगड मारून खाली पाडला. म्हातारा पायऱ्या उतरत होता. गुस्तावोने त्याला पाहिले नव्हते. डबा जोराचा आवाज करत म्हाताऱ्या डॉन सिज़ेरियोच्या बागेत पडला. डब्याच्या जोरदार आवाजाने तो एकदम चमकला. मागे वळून बघण्याचा प्रयत्न करताना तो घसरला आणि पहिल्या दगडी पायरीवर त्याचं डोकं आदळलं आणि फुटलं.

मी हे सारं बघितलं पण म्हाताऱ्याने मुलाला बघितलं नव्हतं की मुलाने म्हाताऱ्याला. एव्हाना काही कारणाने मुलाचं मन खेळावरून उडालं आणि तो तिथून निघून गेला. काही क्षणात खूपसे लोक म्हाताऱ्या डॉन सिज़ेरियोच्या प्रेताभोवती जमा झाले. चुकून पाय घसरल्याने म्हाताऱ्या डॉन सिज़ेरियोचा मृत्यू झाला, असं जाहीर झालं.

दुसऱ्या दिवशी मी पहाटेच उठलो आणि खिडकीजवळच्या खुर्चीवर स्थानापन्न झालो. डॉन सिज़ेरियोच्या पंचकोनी घरामध्ये रात्रभर आणि सकाळी लोक बसून घरच्या लोकांचं सांत्वन करत होते. अजूनही बरेचसे लोक त्या घराच्या बाहेर उभं राहून सिगरेट पीत होते व आपापसात बोलत होते.

एड्रियाना बर्नेस्कोनीच्या घरातून, तोच चिंध्या लपेटलेला म्हातारा भिकारी बाहेर पडला. त्याच्या अंगावर एक फाटलेला ओव्हरकोट होता. त्याने कडब्याने बनवलेली एक मोडकी-तुटकी टोपी घातली होती आणि हातात एक मोठीशी घाणेरडी झोळी होती. लोक घृणा आणि भीती यामुळे बाजूला सरकले. तो बायका पुरुषांची गर्दी चिरत पुढे निघाला. ज्या बाजूने तो आधी दोन वेळा आला होता, त्याच दिशेला हळूहळू चालत तो दूर जाऊन अदृश्य झाला.

दुपारी मला कळलं गुस्तावो सकाळपासून आपल्या बिछान्यात नाहीये. हे ऐकून मला वाईट वाटलं; पण फारसं आश्चर्य वाटलं नाही. बर्नेस्कोनी परिवाराने गुस्तावोला शोधण्याचा खूप प्रयत्न केला. त्यांचा शोध आशेच्या जिद्दीवर अजूनही चालू आहे. मला मात्र त्यांनी शोध थांबवावा, असं सांगण्याची हिंमत कधीच झाली नाही.

❑



# वूड्सटाऊन

मूळ लेखक : **अल्फोन्स डॉडे**
अनुवाद : **डॉ. सुषमा अननल पाटणेकर**
साहाय्य : **सौ. मेधा मराठे**

अल्फोन्स डॉडे, (१८४०-१८९७), फ्रेंच लघुकथा लेखक आणि कादंबरीकार, मुख्यतः दक्षिण फ्रान्सच्या जीवनातील भावनिक कथांचे लेखक म्हणून ओळखले जातात. ही एक पर्यावरणाच्या संदर्भातील काल्पनिक पण दूरदर्शी कथा आहे.

**होते एक वूड्सटाऊन.**

नवे शहर वसवण्यासाठी ह्याहून सुंदर जागा मिळणे शक्य नव्हते. कितीतरी शतकं माणसांच्या नजरा चुकवून ते घनदाट अरण्य जणूकाही भूगर्भात मुळे रुतून उभे होते. चहुबाजूंच्या हिरव्यागार टेकड्यांमधून ते शहर खाली नदीकिनारच्या नव्या बंदरापर्यंत पसरणार होते.

लाकूडतोडे व सुतार कामाला लागले; परंतु असं जंगल कुणीही, कधीही पाहिलं नव्हतं. ते सर्व आपल्या वेलीं व मुळांसह जमिनीला बिलगून होतं, एका टोकाला घाव घातला तर दुसऱ्या टोकाला अंकुर फुटे, जखमांपासून स्वतःला पुनरुज्जीवित करत प्रत्येक घावातून नवी फूट सुरू होई. गल्ली व रस्त्यांची आखणी होते न होते तोवर ती नव्या फुटींनी भरली जाई. वेलींचा वाढवेग भिंतीच्या बांधकामांपेक्षा जास्त होता, परिणामी वेलींच्या मुळांमुळे भिंती कोसळत.

धारदार कुऱ्हाडींना त्या जाड मुळांनी दमदार टक्कर दिली, शेवटी ठेकेदारांना आगीचा उपयोग करण्याशिवाय दुसरा मार्ग राहिला नाही, त्यांनी जंगल जाळणे सुरू केले. रात्रंदिवस दाट गुदमरणाऱ्या धुराने जंगल भरले, उंच झाडे मशालीसारखी पेटत होती. जंगलाने पुन्हा निकराने लढा देण्याचा प्रयत्न केला. आपल्या रसाच्या प्रवाहाने व पानांच्या ओलसरपणाने आग मंद केली. तेवढ्यात मृत्यूच्या दुसऱ्या रूपाने हिवाळा आला. आधीच जळून कोळ झालेल्या झाडांच्या खोडांवर आणि मुळांवर बर्फाने आणखीनच घाव घातले. आता शहराचं बांधकाम सुरू होणे शक्य होते.

लवकरच केवळ लाकूड वापरून निर्माण केलेले एक विशाल अमेरिकन शहर उभे राहिले; रेड रिव्हरच्या किनाऱ्यावर पसरलेले आकर्षक शहर. शहराच्या चौकांमधून चोहीकडे रुंद रस्ते, बाजूला झाडे. स्टॉक मार्केट, हॉल, चर्च, शाळा आणि जहाजांच्या सर्व अवजारांच्या शेड, कस्टम, गोद्या, गोदामे, सगळं काही व्यवस्थित योजनेनुसार बसवले होते. लाकडाचे शहर, वुड्सटाऊन - असे नाव दिले गेले. नव्याने उभारलेल्या शहरात लोकांची वस्ती पटकन झाली. रहिवासी आपले शहर अभिमानाने अतिशय काळजीपूर्वक स्वच्छ ठेवत. गाव उत्साहाने गजबजलं होतं. पण ह्या गर्दीने भरलेल्या रस्त्यांकडे आणि बोटींनी भरलेल्या बंदराकडे, शहराच्या भोवती असलेल्या टेकड्यांवरून कुणीतरी गूढ, तीक्ष्ण नजरेने पाहात उभं होतं. ते जंगल बघत होतं, वाट पाहात होतं.

त्या नदीच्या काठावर असलेल्या उद्धट शहराकडे ते नजर रोखून होते. त्यासाठीच तीन मैलावरची त्याची जिवलग विशाल राने तोडली गेली होती. संपूर्ण वुड्सटाऊन त्याच्याच जिवावर बांधलं गेलं होतं. तेथे बंदरात दिसणाऱ्या उंच डोलकाठ्या, दूरच्या उपनगराच्या शेवटच्या घरांपर्यंत एकमेकांकडे झुकलेली असंख्य छप्परे, त्याच्या भव्यतेतूनच घेतले होते; इतकं की सर्व श्रमाची औजारं व फर्निचरही, त्यातील झाडांच्या लाकडातूनच बनवले होते. त्या लुटारू शहराविरुद्ध त्याच्या मनात आत्यंतिक राग, द्वेष, असूया होती!

इथं शहरात लोकांचे दिवस आनंदात, उत्साहात जात होते. कुठेतरी, काहीतरी ठीक नाही आहे, हे कुणाच्याही लक्षात

आले नाही. वुड्सटाऊनच्या लोकांना कधीकधी त्यांच्या छतांतून व कधीकधी फर्निचरमध्ये एक दबलेला, तडकण्याचा आवाज येई. अधूनमधून एखाद्या भिंतीला तडा जाई; दुकानाचे काउंटर्स खाड्कन फुटत. परंतु नवीन लाकडाचे असे होणे साहजिकच असं समजून कोणीही या घटनांना फारसे महत्त्व दिले नाही. मग वसंत आला – जरा लवकरच – एक आक्रमक वसंतऋतू – झाडांचा सळसळणारा रस जणूकाही जमिनीखालून वाहत होता, अदृश्य आणि सजीव शक्तींनी उंचसखल झालेली जमीन थरथर कापू लागली. प्रत्येक घरात, फर्निचर, भिंती फुगल्या आणि जमिनीला खालून बीळ काढल्यासारखा फुगवटा येऊ लागला. दरवाजे, खिडक्यांची उघडबंद करणे अशक्य होऊ लागले. आर्द्रता आहे, दमटपणाने होत असेल, उन्हाळा आला, ठीक होणार, असं सगळे म्हणाले.

अचानक एका रात्री समुद्राच्या दिशेकडून एक मोठे वादळ आले. विजा कडकडल्या, ऊबदार पाऊस पडला. शहर आश्चर्यचकित होऊन जागे झाले. सर्व इमारतींची लाल छप्परे, चर्चचे मनोरे, घरांची छते, लाकडी पलंग ह्या सर्वांवर एक हिरव्या रंगाची छटा आली – एक पातळसा थर, नाजूक निकामासारखा. जवळून पाहताच, ज्यातून नवीन पालवी फुटत होती असे अनंत सूक्ष्म ते अंकुर होते. अवेळी झालेल्या पावसाची चर्चा झाली तरी चर्चेत चिंता नव्हती. पण मग संध्याकाळपर्यंत सर्व फर्निचर आणि भिंतींवर हिरव्या रंगाचे गुच्छ फुलू लागले, झपाट्याने वाढू लागले, त्यावर हात ठेवताच जणूकाही पंख थरथरत असल्यासारखे वाटे. ते जीव धरत आहे हे जाणवत होते.

दुसऱ्या दिवशी, सर्व अपार्टमेंट्स ग्रीन हाऊस (रोपवाटिका) सारखी दिसत होती. जिन्याच्या कठड्यांना बिलगून लतावेली पसरू लागल्या. अरुंद गल्ल्यांमध्ये, फांद्या एका छतावरून दुसऱ्या बाजूच्या छताला भिडू लागल्या, ज्यामुळे गजबजलेल्या शहराच्या रस्त्यांवर त्यांच्या सावल्या पडू लागल्या. हे चिंतेचे कारण होते. ह्या विलक्षण वनस्पतींच्या बाबतीत विद्वान चर्चा करत असताना, अन्य लोक त्या चमत्काराची वेगवेगळी रूपे पाहण्यासाठी बाहेर पडले. असहाय्य आणि आश्चर्यचकित लोकांच्या गोंधळलेल्या कुजबुजीने ह्या विचित्र घटनेचे आणखीनच गांभीर्य वाढले.

अचानक कोणीतरी ओरडले, जंगलाकडे पाहा आणि आम्ही वळून भयभीत नजरेने ते पाहिले. दोन दिवसात हिरवे अर्धवर्तुळ असलेले जंगल आमच्या खूपच जवळ आले होते. जंगल शहराला आपल्या मिठीत घेत आहे असे वाटू लागले. उपनगराच्या पहिल्या घरापासून काटेरी झुडपे व वेलींच्या रांगा पसरू लागल्या होत्या.

वुड्सटाउनला आता जाणीव झाली व भीती वाटू लागली. नदीकाठची आपली जागा जंगल आपल्या ताब्यात परत घेत होते; त्याची जी झाडे तोडली गेली होती, त्याच्यापासून जी विभक्त झाली होती, ज्यातून वेगवेगळ्या वस्तू बनवल्या गेल्या होत्या, ते सर्व वृक्ष आता स्वतःला पुनर्जीवनासाठी स्वतःला तयार करत होते. जंगलाच्या ह्या आक्रमणाचा प्रतिकार कसा करायचा ह्याचा तज्ज्ञ विचार करू लागले. आगीचा वापर केला तर संपूर्ण शहराला वेठीस धरले जाईल; कुऱ्हाड तर त्या अविरत जीवरसाच्या विरुद्ध काय करू शकणार; राक्षसी मुळे जमिनीच्या खाली हल्ला करत होती, उडणाऱ्या हजारो बिया जिथे पडत, तिथे वेगाने उगवण सुरू झाली होती.

माणसं आपल्या परीने प्रयत्न करू लागली. प्रत्येकाने धैर्याने विळे, कोयते, कुऱ्हाडी यांच्या साहाय्याने काम सुरू केले, फांद्या तोडून इथेतिथे मोठे ढिगारे बनवले. पण व्यर्थ! प्रत्येक तासाला जंगलामुळे होणारा गडबडगोंधळ वाढत होता. वेगाने वाढणाऱ्या वेलींनी उगवलेल्या कोंबांभोवती स्वतःला गुंतवून, वुड्सटाउनच्या रस्त्यांवर त्यांनी आक्रमण केले होते. जिथेतिथे कीटक व सरपटणारे प्राणी दिसू लागले. प्रत्येक कोपऱ्यात घरटी बनली, पंखांचा फडफडाट आणि लहान चोचींची चिवचिव ऐकू येऊ लागली. एका रात्रीत शहरातील सर्व पोटमाळे उबवलेल्या पावलांनी भरून गेले. आणि ह्या भयभीत करणाऱ्या वातावरणात जणू उपहासाने सर्व आकारांची रंगीबेरंगी फुलपाखरे फुलांच्या गुच्छांवर उडत राहिली होती, दूरदर्शी मधमाश्या आपल्यासाठी सुरक्षित आश्रयस्थाने शोधत होत्या. आपले दीर्घ अस्तित्व जणू सिद्ध करण्यासाठी झपाट्याने वाढलेल्या झाडांच्या पोकळीत आपली पोळी बनवीत होत्या.

झाडाझुडपांच्या हालचालीत कुऱ्हाड व खुरपी ह्यांचे आवाज अस्पष्टपणे ऐकू येत होते. चौथ्या दिवसानंतर मात्र काम करणे अशक्य झाले. गवत खूपच उंच व दाट झाले. वेली

लाकूडतोड्यांच्या हातांना बिलगू लागल्या, त्यांच्या हालचालीत अडथळा बनल्या. याशिवाय घरं पण राहण्यायोग्य राहिली नाही; पानांच्या ढिगांखाली टेबले, खुर्च्या, पलंग वेडेवाकडे झाले. महागनी झाडांच्या खडबडीत खोडांनी, युक्काच्या टोकदार पानांनी छतं छेदली गेली, कोसळली आणि छतांच्या जागी झाडांचे प्रचंड डौलदार शेंडे दिसू लागले. आता सगळं संपलं होतं. तिथून पलायन करण्याची वेळ आली होती.

झाडांच्या आणि फांद्यांच्या हळूहळू गुरफटत जाणाऱ्या जाळीतून, वुड्सटाउनचे भयभीत लोक आपल्याकडची संपत्ती आणि मौल्यवान वस्तू घेऊन नदीकिनारी धावले. पण तिथवर पोहोचणे किती कठीण होते! गोदीच नाहीशी झाली होती. राक्षसी वेळूने सर्व भीषण केले होते. लाकडांच्या अड्ड्यांच्या जागी देवदाराचे जंगल उभे होते. संपूर्ण बंदर फुलांनी भरले होते, बोटी हिरव्या बेटांप्रमाणे दिसू लागल्या होत्या. सुदैवाने तेथे आरमारी जहाजे असल्याने लोकांनी त्यात आश्रय घेतला. आणि तिथून त्यांनी एक अद्भुत कल्पनातीत असे दृश्य - जुने जंगल नवीन जंगलात पूर्णपणे विलीन होत असल्याचे- पाहिले.

बघताबघता झाडं एकमेकांत मिसळली. सूर्यप्रकाशाने भरलेल्या निळ्या आकाशाखाली नदीचा काठ हिरवागार दिसू लागला. शहर, छतं किंवा भिंती ह्यांचा कोणताही मागमूस राहिला नाही. अधूनमधून कोसळण्याचा आवाज, विध्वंस होताना शेवटचा प्रतिध्वनी किंवा निराश आणि असहाय्य लाकूडतोड्यांच्या कुऱ्हाडीचा आवाज, झाडांतून खोलवर घुमत होता आणि मग फक्त पांढऱ्या फुलपाखरांच्या थव्यांचे संथपणे गुणगुणणे गुंजत राहिले. दूरवर वुड्सटाउनचे विस्थापित गावकरी घेऊन समुद्रातून पळ काढणारे एक जहाज जाताना दिसत होते. त्याच्या शिडामध्ये तीन मोठी हिरवी झाडे उगवली होती.

हो, वुड्सटाउन नावाचं एक गाव... होतं.

❑


अशोक पिंपळापुरे

pbd पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स

भ्रमणध्वनी:
९४२२१०५४७३
९८८१४८९१७३
दूरभाष:
०७१२(०)२७२४३१८

२०६, राम मंदिर गल्ली, टिळक पुतळा, महाल, नागपूर ४४० ०३२

e-mail : pbdnagpur@gmail.com

शैक्षणिक पुस्तकांचे वितरक व लायब्ररी सप्लायर्स

# कंचन

मूळ कथा : **रवींद्रनाथ टागोर**
अनुवाद : **मेधा मराठे**

परदेशातून परत आल्यावर मी छोटा नागपूरमधील एका चंद्रवंशातील राजाच्या दरबारात नोकरी करू लागलो. त्याच काळात माझ्या देशव्यापी कीर्तीच्या पटलावर एक चिमुकली कथा उमलली. या दिवसात पळसाच्या लाल रंगाने आकाश सुशोभित झालं होतं. शाल वृक्षांच्या फांद्यांवर मंजिऱ्या डुलत होत्या. मधमाशांचे घोळके गुंऽ गुंऽऽ करत फिरत होते. व्यापारी लोकांचा लाख गोळा करण्याचा तो काळ होता. बोरं आणि तुतीच्या पानांवरून रेशमाचे किडे गोळा केले जात होते. संथाळ आदिवासी मध गोळा करत होते. पायातील पैंजणांचा व्हावा तसा रुमझुम नाद करत तिथूनच नदी वाहत होती. मी मोठ्या प्रेमाने या नदीचे नाव ठेवलं होतं– तनिका. त्या वेळचं वातावरण अनोख्या आवेगाने भारलं होतं. माझ्या मनावरही त्याचा प्रभाव पडला होता. त्यामुळे कामाचा वेग मंदावला होता, म्हणून माझ्यावरच मी चिडलो होतो. दिवस मावळत होता. एके ठिकाणी मध्ये मोकळी जमीन सोडून नदीचे दोन वेगवेगळे प्रवाह झाले आहेत. त्या वाळूच्या उंचवट्यावर बगळे ओळीने स्तब्धपणे बसले होते. रंगीबेरंगी दगडगोट्यांनी भरलेली थैली घेऊन मी घरी निघालो होतो. त्यांची प्रयोगशाळेत परीक्षा करण्याचा माझा विचार होता. निर्मनुष्य रानात एकट्या माणसाचा वेळ जाणं कठीण असतं. म्हणून संध्याकाळनंतरचा वेळ हे प्रयोग करण्यासाठी मी निश्चित केला आहे. 'डायनोमा' लावून विजेच्या प्रकाशात मी कामाला बसतो. वेगवेगळ्या प्रकारची रासायनिक मूलद्रव्ये, मायक्रोस्कोप आणि तराजूही बरोबर असतो. अशा प्रकारे काम करता करता कधी कधी मध्यरात्र होते. आज बरीच शोधाशोध केल्यावर मला मँगनिज असल्याची खूण मिळाल्यासारखं वाटलं. म्हणून मी विशेष उत्साहात परतत होतो. अशा त्या वातावरणात कावळे काव काव करत डोक्यावरून उडत आपल्या घरट्यांकडे जात होते. त्याच वेळी माझ्यासमोर एक विघ्नं उभं राहिलं. त्या सुनसान मार्गातील एका उंचवट्यावर विशाल वृक्षांचा समूह रचना केल्यासारखा विशिष्ट आकारात उभा होता. त्यांच्या सावलीत बसलेली व्यक्ती केवळ एकाच बाजूने मला दिसत होती. त्याच वेळी ढगातून आश्चर्यकारक प्रकाश  फुटून बाहेर पडत होता. प्रकाशसावलीच्या वातावरणातील आकाशातला लालिमा जणू एखाद्या दिव्य स्त्रीच्या फडफडणाऱ्या पदरातून खाली उतरणाऱ्या स्वर्गाप्रमाणे विखुरला होता. त्या अलौकिक प्रकाशात ती कोमलांगी बसली होती. वृक्षाच्या खोडाला टेकून दोन्ही पाय छातीशी ओढून ती काहीतरी लिहिण्यात ती मग्न होती. वृक्षाच्या आड उभा राहून मी तिच्याकडे फक्त पाहात राहिलो. माझ्या हृदयात एक अनोखं चित्र उमटू लागलं. माझ्या निरंतर ज्ञानाच्या मार्गावर माझं हृदय कितीतरी वेळा फिरून फिरून अगदी दरवाजापर्यंत येऊन पोचलं होतं; परंतु मी नेहमीच त्यापासून चटकन दूर जात होतो. आज मात्र असं वाटलं की मी जणू जीवनातील सर्वोच्च संघर्षात अडकलोय. हे कसं घडलं ते मला कळलंच नाही. मी स्वतःला नेहमीच पर्वतासारखा समजत होतो. त्याच्या आतून एक झरा आपोआपच उगम पावला. त्या मुलीला सुद्धा मी तेथे उभा असल्याचा भास झाला असावा. तिनं लिहिणं बंद केलं; परंतु उठून उभी राहिली नाही. मला वाटलं की म्हणावं, 'क्षमा करा मला.' परंतु क्षमा कसली मागायची? मी असं कोणतं शिक्षा होण्याजोगं काम केलं होतं? असा विचार करत मी माझ्या घराकडे चालत निघालो. तोच माझी नजर खाली पडलेल्या लिफाफ्याच्या दोन तुकड्यांवर पडली. मी ते उचलून पाहिले.

नाव – भवतोष मुजुमदार, आय.सी.एस. मुक्काम – छपरा. त्या लेखनाची पद्धत बायकी होती. त्याला तिकीट चिकटविलेलं होतं, परंतु त्यावर पोस्टाचा शिक्का नव्हता. या फाटलेल्या

लिफाफ्यावर कोणत्यातरी दु:खान्त नाटकाची खूण उमटली आहे हे माझ्या चटकन लक्षात आलं. त्याच वेळी मी त्या लिफाफ्याचं रहस्य शोधून काढण्याचा संकल्पही सोडला. जिओलॉजीच्या अभ्यासाबरोबरच या रहस्याचा शोध घेणेसुद्धा आतल्या आत सुरू होतं. याच वेळी रेडियमचा अणू सापडेल अशी आशा मनात धरून मी संशोधनातही गुंतलेला होतो. त्याच वेळी मी फुलांनी डवरलेल्या शाल वृक्षांच्या प्रकाश सावलीत गुरफटलेल्या कंचनला पाहात होतो. यापूर्वीही बंगाली तरुणीला मी निरखलं होतं हे नक्की. परंतु अशा निर्जन एकांतातील वातावरणात कधी पाहण्याची वेळ आली नव्हती. इथे तिच्या सुंदर देहाच्या कोमलतेत रानफुलांनी आपल्या भाषेचा सूर एकरूप केला होता. परदेशी नाजूक तरुणी अनेक वेळा पाहिल्या होत्या. अनेक वेळा त्या चांगल्याही वाटल्या होत्या. परंतु अशा एखाद्या वंग तरुणीला असं पाहिलं की जिची माहिती संपूर्णपणे काढता येईल. तिला पाहून कळत नव्हतं की तिचा संबंध पुस्तकांशी आहे की नाही. खूप वर्षांपूर्वी लहानपणी मी कोणा एका श्रीमान बसू यांचं एक गाणं ऐकलं होतं आणि ऐकून ते विसरूनही गेलो होतो. पण आज का कोण जाणे, असं वाटलं की या रागाची सखी या बंगाली मुलीच्या रूपाने प्रकटली आहे आणि तीच माझ्या डोळ्यांसमोर साकार होऊन राहिली आहे. जिओलॉजी शास्त्राचा अभ्यास करताना वाचलं होतं की, पृथ्वीच्या आत लपलेली आगीसारखी सामग्री भूकंपाच्या हलण्याने अचानक वर येते. आज स्वतःच्या अर्धवट अंधारात लपलेली तशीच गरम वस्तू अचानक वरच्या प्रकाशात दिसली. कठोर वैज्ञानिक नवीन माधव यांच्या अंतरंगात अशा प्रकारच्या मानसिक आंदोलनाची मी कधी अपेक्षा केली नव्हती. रोज तिसऱ्या प्रहरी मी काम संपवून याच रस्त्याने परतत असे, तेव्हा ती माझ्याकडे विशिष्ट नजरेने बघत असे. त्या दृष्टीत काय सामावलेलं आहे, ते आजवर मला कळलं नव्हतं. कधीकधी चालता चालता मी मागे वळून पाहात असे तेव्हा असं वाटत होतं की कंचन माझ्या दृष्टिआड असणाऱ्या रस्त्याकडे बघत राहिली आहे आणि मी मागे वळून पाहिल्यावर लगेच आपली दृष्टी लिहीत असलेल्या कागदांकडे लावीत आहे. माझ्या विज्ञानी मनाला असं वाटलं की कोणाला तरी मिळवण्यासाठी ती इतकं कठोर व्रत करीत आहे की काय? भवतोष इंग्लंडहून परतल्यावर त्याची छपराला असिस्टंट मॅजिस्ट्रेटच्या पदावर नेमणूक झाली आहे. तो इंग्लंडला जाण्यापूर्वी इथेच त्या दोघांत गाढ प्रेमभावना निर्माण झाली होती; परंतु आता या पदावर नेमणूक झाल्यावर तेवढा बहर राहिला नव्हता. खरी गोष्ट काय आहे? माहिती काढल्यावरच त्याची कल्पना येईल. अशी माहिती काढणं माझ्यासाठी काही कठीण काम नव्हतं. माझे वर्गमित्र बंकिमबाबू विश्वविद्यालयात काम करत. त्यांना मी पत्र लिहिलं – बिहारच्या सिव्हिल सर्व्हिसमध्ये नोकरी करणारे कोणी श्री. भवतोष आहेत. माझ्या एका मित्राने आपल्या मुलीसाठी त्यांना निवडलं आहे. त्यांना त्यात माझी मदत हवी आहे. भवतोषकडे जाणारा मार्ग खडकाळ, कठीण तर नाही ना, मला माहिती काढून कळवली तर मी कृतज्ञ होईन. या सद्गृहस्थाचं लग्नाविषयी काय मत आहे त्याविषयीही कळवा. पत्राचे उत्तर आलं – रस्ता नुसताच खडकाळ नाही तर त्याहीपेक्षा अधिक कठीण आहे. लग्नाविषयी त्याची मतं ऐक. मी कॉलेजमध्ये असताना डॉ. अनिलकुमार यांचा विद्यार्थी होतो. त्यांची विद्वत्ता जेवढी मोठी तितकाच स्वभाव अगदी साधा होता. त्यांच्या नातीला पाहिलं तर वाटेल की त्यांच्या तपश्चर्येने संतुष्ट होऊन देवी सरस्वतीने त्यांना त्याचं फळ दिलं, एवढंच नव्हे तर तिच्या रूपाने साक्षात त्यांच्या मांडीवर ती खेळते आहे. तुझा तो राक्षस भवतोष त्यांच्या स्वर्गलोकात कुठून येऊन टपकला माहीत नाही. तो अतिशय बुद्धिवान आणि बोलण्यात एकदम चतुर आहे. प्रथम डॉक्टर-साहेब फसले आणि मग त्यांची नात. त्यांचं लग्न ठरलं होतं. भवतोष इंग्लंडहून परतण्याची तेवढीच वाट पाहायची होती. तिकडचा सगळा खर्च डॉक्टरसाहेबांनी केला होता. सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा पास होऊन भवतोष परत आला आणि इथल्या एका बड्या अधिकाऱ्याच्या मुलीशी त्यानं लग्न केलं. त्याच्या या कपटी वागण्यामुळे आणि खजील होऊन,चिडून डॉक्टर-साहेबांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला आणि आपल्या नातीला घेऊन कुठे गेले कोण जाणे. काही कळत नाही. हे पत्र वाचून परिस्थितीची पूर्ण कल्पना आली. त्याच वेळी निश्चय केला की तिला या लाजिरवाण्या आणि खिन्न अवस्थेतून बाहेर काढीन. सूर्य मावळायला थोडाच वेळ होता. संध्याकाळ सगळीकडे पसरून राहिली होती. कंचन घरी परतण्याची हीच वेळ होती. त्याच वेळी कोणी एक गावंढळ माणूस तिच्या हातातील लिहिलेले कागद जबरदस्तीने ओढून पळून चालला होता. मी त्याचा पाठलाग केला, ते कागद मिळवले आणि ते

कंचनला परत दिले. आपली संपत्ती पुन्हा मिळालेली पाहून आपल्या सौम्य नजरेने माझ्याकडे पाहात ती म्हणाली, ''माझ्या सुदैवाने आपण. मी म्हटलं, पळून चाललो होतो तर तो आला... म्हणजे? अर्थ सरळ आहे... मला नाही कळला अर्थ... म्हणजे त्याच्या मदतीमुळे तुमच्याशी पहिलं बोलणं झालं. या अगोदर कसं आणि काय बोलू असा विचार करीत होतो. परंतु तो तर एक... एक काय... चोर... चोर नव्हे, तो माझाच एक शिपाई होता... कंचनने आपल्या गर्द रंगाच्या साडीचा पदर पकडून तोंडावर धरला आणि ती खळखळून हसली. हसणं थांबल्यावर म्हणाली, हे खरं असतं तर मात्र मजा आली असती. ज्याच्याकडे चोरी झाली त्याची मजा... मग सोडवणूक करणाऱ्याचं काय? त्याला घरी नेऊन चहा पाजला असतात... बरं... मग या खोट्या उद्धारकर्त्याचं काय होईल? त्याला जे पाहिजे ते मिळालं. काय मिळालं? ओळख होण्याची सुरुवात... आणखी काय? एवढंच होय... मला वाटतं की... काय हवंय आपल्याला? ही गप्पांची सुरू झालेली फैरी आता संपू नये एवढेच. संपेल कशी? मग तुम्ही पहिल्यांदा बोलला असतात तर काय म्हटलं असतंत... मी एवढंच विचारलं असतं की रस्त्यांवर फिरून असे दगड निवडण्यात तुम्हाला पोरकटपणा वाटत नाही काय? मग का विचारलं नाहीत? भीती वाटली भीती? माझी? हो, तुम्ही मोठे ज्ञानी, विद्वान आहात, असं दादूकडून ऐकलं होतं. त्यांनी इंग्लंडमध्ये छापलेला आपला लेख वाचला होता. त्यांनी तो मला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, पण मला समजला नाही. तेवढ्यात आवाज ऐकू आला, कुठे आहेस ग दीदी, अंधार पडला. हल्लीचे दिवस बरे नाहीत. डॉक्टरसाहेब तिथे आल्यावर मी त्यांना वाकून नमस्कार केला. ते थोडे चकित झाले. मी माझी ओळख सांगितली. माझं नाव 'नवीन माधव सेनगुप्ता' आहे हे ऐकून वृद्ध डॉक्टरांचा चेहरा उजळला. म्हणाले, ''काय सांगता, तुम्ही डॉक्टर सेनगुप्ता आहात! तुम्ही तर अगदी लहान दिसता.'' मी उत्तर दिलं, ''मी अजून लहानच आहे, माझी छत्तीशी आत्ताच उलटली आहे. तुम्ही आमच्या घरी आलं पाहिजे दादू, हे त्यांना सांगायला नकोच. ते आधीच येण्याच्या तयारीत आहेत... मी मनातल्या मनात म्हणालो, घोटाळा झाला. असा कसा वात्रटपणा केला कंचनने. डॉक्टर उत्साहाने म्हणाले, ''तुम्हाला कदाचित इथे या जागी या वेळी निमंत्रण... नाही, मी असल्या गोष्टींचं महत्त्व मानत नाही. मला समजावण्यात तुमचा वेळ व्यर्थ वाया जाईल. वेळ, अहो, इथे वेळच वेळ आहे. बरं, आज आमच्याकडे जेवणाला या.'' मी त्यांचे आभार मानणार तोच कंचन म्हणाली, ''दादू, प्रत्येकाला निमंत्रण देऊन माझी पंचाईत करता. या जंगलात विलायती दुकान कुठे सापडणार?'' हे विलायती 'डिनर'खाणाऱ्यांच्या जमातीशी संबंधित आहेत. आपल्या नातीला फुकट बदनाम करताय तुम्ही! ''बरं... बरं, मग केव्हा तुम्हाला यायला जमेल ते सांगा.'' त्या वृद्ध गृहस्थानं विचारलं. ''मला काय, उद्यासुद्धा जमेल. परंतु उगीच कंचनदेवींना त्रास द्यायला नको वाटतं. मला संशोधनासाठी जंगलात जावं लागतं. तिथे निसर्गात जे काही मिळतं त्यावर मी जगतो.'' ''दादू! यांच्यावर विश्वास ठेवू नका. ते असंच सांगत राहतात.'' माझ्या मनात विचार आला. ''चमत्कारिक मुलगी आहे ही. मी जे म्हणतो ते मुळापासूनच कापून टाकते ती.'' अशा गप्पा करत करत आम्ही त्यांच्या घराच्या दिशेने पुढे पुढे चाललो होतो, तोच कंचन हट्टाने म्हणाली, ''आता आपण आपल्या घरी परतावं... का बरं? तुम्हाला घरापर्यंत सोडून यावं, असा माझा विचार होता. नको... नको, आम्ही आपले आपण जाऊ... अस्ताव्यस्त असलेलं घर पाहून उगीच टीका नको व्हायला. ते पाहून तुम्हाला मेमसाहेबांची आठवण व्हायची. नाइलाजानं मला थांबणं भाग पडलं. तरीही मी म्हणालो, ''उद्या तुमच्याकडे माझ्यासाठी हे निमंत्रण आहे, ते माझ्या नवीन नामकरणाचं निमित्त आहे. कारण उद्यापासून 'नवीन माधव'बरोबरचं 'डॉक्टर सेनगुप्ता' हे विशेषण नसेल.'' मग नामकरण का म्हणता! 'नामबदल' म्हणायला हवं. तुम्हाला आवडेल तसं म्हणा... त्यानंतर मी माझ्या मुक्कामाच्या ठिकाणी परतलो. त्या दिवशी संशोधनासाठी आणलेल्या वस्तूंची मी परीक्षा करू शकलो नाही. माझ्या डोक्यात कंचनविषयी विचार घोळत राहिले.

दुसऱ्या दिवशी 'तनिका'च्या तीरावर कंचनबरोबर आमची पिकनिक झाली. डॉक्टरसाहेबांनी लहान मुलाप्रमाणे विचारून टाकलं– नवीन, तू विवाहित आहेस काय? त्या अर्थपूर्ण प्रश्नाचं मी लगेच उत्तर देत म्हणालो, ''आतापर्यंत तरी अविवाहित आहे.'' कंचन कोणतंही बोलणं तसंच सोडत नाही. दादू, 'आत्तापर्यंत' हा शब्द केवळ वधूपक्षाचं सांत्वन करण्यासाठी

आहे. त्याचा खरा अर्थ तसा नाही. हे बोलणं खरं नाही, हे कसं काय ठरवलं? हे एक गणिती कोडं आहे; परंतु उच्च गणित म्हणून जे समजलं जातं ते हे नव्हे. पूर्वीच ऐकलं होतं की तुम्ही छत्तीस वर्षांचं मूल आहात. एवढ्या काळात निदान पाचसात वेळा तरी तुम्हाला सांगितलं गेलं असेल की 'बाळा, मी सून आणू इच्छिते'. तुम्ही सांगितलं असेल, 'तत्पूर्वी मला लोखंडी पेटीभर रुपये मिळवून आणायचे आहेत.' त्यानंतर पुढच्या दीर्घकाळात तुम्ही सगळं मिळवलंत, फारसं काही मिळवायचं उरलं नाही. शेवटी प्रांतीय सरकारी उच्च पद मिळाल्यावर आईनं पुन्हा विचारलं, ''बाळा, आता तरी विवाह करायला हवा. माझे आता किती दिवस उरलेत?'' तुम्ही उत्तर दिलंत, ''माझं जीवन म्हणजेच विज्ञान आहे. ते मी देशाला अर्पण करीन. मी आत्ता विवाह करणार नाही.'' हताश होऊन डोळ्यातलं पाणी पुसून त्या गप्प राहिल्या. तुमच्या ३६ वर्षांच्या आयुष्याचा हिशोब करण्यात मी काही चूक केली असेल तर सांगा. खरंच सांगा, संकोच करण्याची जरुरी नाही. कंचन पुढे म्हणाली, ''आपल्या देशात तुम्ही मुलींना जीवनसाथी या रूपात स्वीकारता. बाकी जगाचा याच्याशी काही संबंध नाही. परंतु परदेशात जे लोक विज्ञानतपस्वी आहेत त्यांना तरी उपयुक्त ठरणाऱ्या तपस्विनी मिळतातच. उदाहरणार्थ प्रा. क्युरी यांना मादाम क्युरी सहधर्मचारिणी म्हणून लाभल्या. तिकडे राहात असताना तशी कोणी नाही मिळाली वाटतं?'' कंचन असं म्हणाली आणि मला कॅथरीनची आठवण झाली. लंडनमध्ये राहत असताना आम्ही एकत्र काम केलं होतं. इतकं, की माझ्या एका संशोधन ग्रंथात माझ्या नावाबरोबर तिचंही नाव जोडलेलं होतं. कंचनचं हे बोलणं तर मान्य करावंच लागलं. कंचनने पुढे लगेच विचारलं, तिच्याबरोबर तुम्ही विवाह का नाही केला? ती विवाहासाठी तयार नव्हती? तिच्याकडूनच प्रस्ताव आला होता. मग? माझं नाव भारत आहे म्हणून... म्हणजे अशा स्नेहाचा फळ मिळावं अशी तुमच्यासारख्या साधकाची इच्छा नसते. मुलींच्या जीवनाचं सर्वोच्च ध्येय व्यक्तिगत असतं आणि तुमच्यासारख्या माणसांचं दुसरंच असतं. याचं उत्तर मी देऊ शकलो नाही. मी गप्प झालेला पाहून कंचन पुन्हा म्हणाली, ''बंगाली साहित्य तुम्ही फारसं वाचलेलं दिसत नाही. त्यात हेच दाखवलं आहे की पुरुषांना बांधून ठेवणं हे मुलींचे व्रत आहे आणि ते बंधन तोडून स्वर्गाचा मार्ग पकडणं हे पुरुषांचं व्रत आहे.'' कचसुद्धा देवयानीच्या उत्तेजनाची उपेक्षा करून निघून गेले. तुम्हीही आईचा आग्रह न मानता पुढे चालत राहिलात. दोन्ही एकच. स्त्रीचा असहाय्य आक्रोश सुरू असला तरी स्त्री आणि पुरुषांत हे प्राचीन काळापासून नेहमीच सुरू आहे. त्या आक्रोशाचा तुम्ही पुरुषांनी आपल्या पूजेचा नैवेद्य दाखवावा. नैवेद्य दाखवला जातो खरा, तरी देवता निरासक्तच राहते...

कंचन पुढे बोलू लागली, ''देवयानीने कचाला काय शाप दिला ठाऊक आहे नवीन बाबू?'' नाही. तुझ्या ज्ञानसाधनेच्या फळाचा तुला काही उपयोग होणार नाही. दुसऱ्यांना दान मात्र करू शकशील. मला मात्र ही गोष्ट आश्चर्यकारक वाटते. जर हा शाप कोणी एकाने आज परदेशी माणसांना दिला तर त्यांचं भलं झालं असतं. संपूर्ण विश्वाची ज्ञानसाधने आपलीच असल्यासारखं वागण्याने युरोपमध्ये लोक लालची, हावरट होतात आणि नाश पावतात. त्या दिवशी झालेल्या गप्पागोष्टी म्हणजे केवळ हास्यविनोद नव्हता. त्यात युद्धाचा संकेत होता. आता माझा कंचनशी संबंध सहजपणे येत होता, तरीही तिच्या समोर उभं राहून तिच्या अंतिम इच्छेचा थांग लागण्याचा उपाय मला शोधता आला नाही. हो, एक दिवस पिकनिकच्या वेळी छान संधी मिळाली. त्या वेळी डॉक्टरसाहेब शिवालयाच्या अवशेषांच्या पायरीवर बसून रसायनशास्त्राचं कोणतंतरी नवीन पुस्तक वाचत होते. एका काळ्या जंगली झाडाखाली बसलेली कंचन अचानक म्हणाली, ''या महाकालाच्या वनात एक गूढ प्राणशक्ती आहे. त्याची भीती वाटते मला. पडझड झालेल्या देवळाच्या भेगांतून एक पिंपळाचा अंकुर वर येतो आणि हळूहळू आपल्या मुळांनी त्याला घट्ट, वाईट अवस्थेत बांधून टाकतो. हेही असंच आहे. दादूच्या बाबतीत तसंच घडलं. तेच सांगत होते. मानवी वस्तीपासून दूर राहिल्याने माणसाचं आचरण दुर्बळ होतं आणि माणसावर प्राणी-स्वभावाचा परिणाम प्रखर होतो. मी उत्तर दिलं, 'एक सांगतो, माझ्या सांगण्याचा चांगल्या प्रकारे विचार करा. माझा विचार असा आहे की अशा वेळी माणसाचा स्वभाव आतून-बाहेरून एकत्व पावला पाहिजे. त्याच्या प्रभावाने मानव स्वभावधर्म पूर्णत्वाला जाईल. हे घडत नाही तोपर्यंत गूढ शक्तीकडून पराजय पत्करावा लागेलच. तुम्ही क्षुद्र गोष्टींचं

अवडंबर... हां, बोला, सांगा ना, संकोच नका करू. कंचनने लगेच उत्तर दिलं. तुम्हाला माहीत आहे की मी वैज्ञानिक आहे. म्हणून जे मी सांगीन ते व्यक्तिगत इच्छा न ठेवता सांगीन. तुम्ही एके काळी भवतोषवर प्रेम केलं होतं. आजही त्यांच्यावर तसंच... समजा, करत नाही... मग? मीच तुमचं मन तेथून विचलित केलं आहे. असेल. फक्त तुम्हीच नाही... या गूढ शक्तीने देखील. म्हणून या विचलनाला मी श्रद्धापूर्वक नाही पाहू शकत. असं का? फार पूर्वीपासून माणूस शक्तीमध्ये आपला आदर्श मानतो असं दिसतं. प्राणशक्तीची अंधता त्या आदर्शाला तोडते. तुमच्या प्रति माझं प्रेम हे या अंध शक्तीच्या आक्रमणाचं फळ आहे. स्त्री असूनही तुम्ही प्रेमावर असा अपवादात्मक असा हट्ट धरता? स्त्री आहे म्हणूनच असं सांगते. प्रेमाचा आदर्श म्हणजे आमच्यासाठी पूजेचं साधन. त्याला सतीत्व म्हणतात. ते आदर्श आहे. हे साधन वनाचा स्वभावधर्म नाही, मानवाचा आहे. या प्रदेशात इतके दिवस या आदर्शाची पूजा करत होते. हे सगळे आघात आणि फसवणुकीनंतरही मी त्या आदर्शाला जपू शकले तर माझं पावित्र्य नष्ट होणार नाही. भवतोषविषयी अजूनही श्रद्धा वाटते? नाही. त्याच्याकडे जाऊ इच्छिते? नाही. मग काय? काहीच नाही. मला समजलं नाही. तुम्हाला नाही समजणार. ज्ञान ही तुमची संपत्ती आहे. ती अत्युच्च शिखरावर असूनही व्यक्तिनिरपेक्ष आहे. स्त्रीची संपत्ती म्हणजे हृदयाची असते. ज्याला स्पर्श करता येतो ते बाह्य असतं, आणि तिची सर्व ती संपत्ती नाहिशी झाली तरी त्या प्रेमातील हृदयाची संपत्ती टिकून राहते, कारण ती व्यक्तीनिरपेक्ष असते. वादविवादात वेळ घालवू नका. मला थोड्याच दिवसांनी काही संशोधनाच्या कामासाठी दुसरीकडे जावं लागेल. परंतु... मग का नाही गेलात? तुमच्याशी... तेवढ्यात कंचनने हाक मारली, दादू... डॉक्टरसाहेब आपलं लिहिणं-वाचणं सोडून उठून आले आणि आपल्या स्नेहभरल्या मधुर स्वरात म्हणाले, काय ग दीदी? माणसातलं सत्य त्याच्या तपश्चर्येच्या अंतरंगातून व्यक्त होतं, प्राणीशास्त्राच्या अभ्यासातून समजणारं ते सत्य नाही, असं तुम्ही म्हणाला होतात ना? हो. अगदी बरोबर.

तर मग दादू, आज माझ्या आणि तुमच्या गोष्टींविषयी निर्णय करू या. गेले कित्येक दिवस डोक्यात उलटसुलट विचार घोळत आहेत. मी उठून उभा राहात विचारलं, मग, मी निघू? नाही, तुम्ही बसाना. दादू, आपलं पद पुन्हा रिक्त झालं आहे आणि सेक्रेटरीने आपल्याला पुन्हा निमंत्रित केलं आहे. हो, मग? तुम्हाला ते पद स्वीकारावं लागेल... लगेच तिकडे परत जावं लागेल. डॉक्टरसाहेब थक्क होऊन कंचनच्या तोंडाकडे बघत राहिले. कंचन बोलू लागली, आत्ता कळलं, तुम्हाला वाटतंय की माझं कसं काय होईल? जर अहंकार जास्त वाढला नसेल तर तुम्हाला की गोष्ट स्वीकारावीच लागेल की माझ्याशिवाय तुमचं एक दिवससुद्धा चालू शकणार नाही. मी नसेल तर २५ अश्विनला तुम्ही १५ ऑक्टोबर मानता. तुमच्या सहयोगी प्राध्यापकांना जेवायला बोलवता. त्या दिवशी लायब्ररीचे दार बंद करून कुठचं तरी 'निदारूण ईक्केशन' सोडवत बसता. नवीन बाबूंना वाटेल मी काहीतरी खोटी गोष्ट मोठी करून सांगते आहे. आज अशा वाईट गोष्टी... आता सगळ्या संपतील. तुम्ही माझ्याबरोबर पुन्हा आपल्या कामाला लागलात तर चुकलेली गाडी पुन्हा गाठता येईल. डॉक्टरसाहेब माझ्याकडे बघत म्हणाले, तुझा काय सल्ला आहे नवीन? मी क्षणभर स्तब्ध झालो आणि मग म्हणालो, कंचनदेवींपेक्षा अधिक योग्य कोणी नाही सांगू शकत. कंचनने उठून पदस्पर्श करून मला नमस्कार केला. मी संकोचून मागे सरकलो. कंचन म्हणाली, संकोच नका करू. तुमच्या तुलनेत मी कोणीच नाही, हे केव्हातरी स्पष्ट होईल. आज तुमचा इथेच शेवटचा निरोप घेते. जाण्यापूर्वी आता पुन्हा भेट होणार नाही. काय बोलतेस दीदी? डॉक्टर-साहेबांनी विचारलं, दादू... कंचन एवढंच बोलली. मी त्याच क्षणी डॉक्टरसाहेबांच्या पायांची धूळ मस्तकी लावली. त्यांनी मला मिठीत घेऊन म्हटलं, तुझ्या कीर्तीचा मार्ग प्रशस्त आहे, हे ठाऊक आहे मला नवीन. पुन्हा घरी परतून पहिलं रेकॉर्ड काढलं. ते पाहून मनात अचानक आनंद दाटून आला. मुक्ती कशाला म्हणतात ते समजलं. दिवसभराचं काम संपवून संध्याकाळी व्हरांड्यात आल्यावर लक्षात आलं - पक्षी पिंजऱ्यातून तर सुटला आहे, परंतु त्याच्या पायात साखळदंडाची एक कडी अजूनही अडकली आहे... ती हलता हलता वाजते आहे.

❑

# मराठी साहित्यिक आणि संशोधकांचे आश्रयस्थान..

# ग्रंथसखा वाचनालय

तेलवणे टॉवर्स, बदलापूर (पूर्व), जि. ठाणे.
मो.: ९३२००३४१५६



## आमचे संकल्प

- ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथे साहित्य-संस्कृती विषयक उपक्रमांसाठी सांस्कृतिक भवन उभारणे.
- ललित लेखकांसाठी कार्यशाळा. साहित्याचा आस्वाद कसा घ्यावा, हे शिकविणारे शिबिर.
- साहित्य जगतात घडणाऱ्या अनेक गोष्टींचे डॉक्युमेंटेशन.
- ख्रिस्ती मराठी साहित्य, जैन व बौद्ध वाङ्मयाच्या अभ्यासासाठी दालने.
- सेट व नेट परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन.

# ‘वाचनातून विकास’
# ग्रंथालय भारतीचा एक अभिनव उपक्रम : मा.ना.श्री. नितीनजी गडकरी यांचे मार्गदर्शन

‘देश वाचवायचा असेल तर, संस्कृती टिकली पाहिजे; जर संस्कृती टिकवायची असेल तर ग्रंथं जपले पाहिजेत.’ या वाक्यातून ग्रंथांचा अपार महिमा लक्षात येतो. मात्र, या ग्रंथाचे वाचनच केले गेले नाही तर? कुठल्याही ग्रंथाचा निर्मिती प्रवास हा अतिशय कठीण असतो. त्यासाठी लागणारी मेहनत, जिद्द आणि चिकाटी हे असाधारण असते. कारण या कार्यातून ग्रंथकाराच्या मनात समाज परिवर्तन किंवा समाज प्रबोधन करायचा ध्यास असतो, आणि त्यासाठी तो हवी ती मेहनत आणि कष्ट करायला तयार असतो. ग्रंथ नेहमीच प्रेरणा देतात, ज्ञान देतात आणि योग्य मार्ग दाखवितात. मात्र गरज आहे, ती त्या ग्रंथांना वाचण्याची, त्यातील भावार्थ समजण्याची आणि त्या विचारांना आचरणात आणण्याची. जर चांगले वाचन असेल तर वाचन संस्कृती वृद्धिंगत होईल आणि वाचन संस्कृतीचा विकास झाला तर सुशिक्षित समाज आणि प्रगत राष्ट्रनिर्मिती शक्य आहे. याच उद्देशाने गेल्या दशकभरापेक्षा जास्त कालावधीपासून ‘ग्रंथालय भारती’ समाजात कार्यरत आहे. बदलत्या आधुनिक युगात ‘ग्रंथालय भारती’ने सुद्धा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून वाचन संस्कृती वाढविण्याचा संकल्प केला आहे. याच संकल्पाची भव्य सुरुवात ‘ग्रंथालय भारती’ वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून केली आहे. ग्रंथालय भारतीच्या वतीने ‘वाचनातून विकास’ या विषयावर ऑनलाइन मार्गदर्शनाचे आयोजन केले. या मार्गदर्शन सत्रात भारताचे केंद्रीय रस्ते आणि भूपृष्ठ वाहतूक मंत्री मा.ना. श्री. नितीनजी गडकरी यांनी मार्गदर्शन केले.

‘वाचन’ या विषयावर सर्वच जण अतिशय प्रेरणादायी विचार लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करीत असतात. कारण वाचनातून ज्ञानाचा विकास होतो. चांगल्या पुस्तकांचा चांगलाच




मा.ना. श्री. नितीनजी गडकरी

परिणाम लोकांच्या मनावर होतो. पुस्तक आणि ते वाचून मिळणारे ज्ञान ही पॉवर आहे. पुस्तकामुळे ज्ञानाचा प्रसार, विकास होतो. वाचनातून झालेल्या संस्कारातून माणूस बदलतो. भारतीय संस्कृतीवर आधारित तसेच ऐतिहासिक पुस्तके जतन करून ती सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचायला पाहिजेत. शाळा, महाविद्यालयांच्या तसेच इतर सार्वजनिक कार्यक्रमात पुष्पगुच्छाच्या ऐवजी प्रमुख पाहुण्यांना पुस्तक भेट दिले गेले तर त्या पुस्तकांची खरेदी होईलच. ते वाचकांपर्यंत पोहोचले जाईल. अनेक पुस्तके मुलांपर्यंत, वाचकांपर्यंत पोहोचत नाही. नगरसेवक, महानगर पालिका, राज्यशासन यांच्या सहकार्याने प्रत्येक वॉर्डामध्ये अभ्यासिका, वाचनालये, वर्तमानपत्रांसोबतच डिजिटल लायब्ररी सुरू करायला पाहिजे. यासाठी समाजातून सहकार्य मिळायला हवे. घरी असलेल्या लग्न किंवा इतर कार्यक्रमाच्या निमित्ताने समाजातील लोकांनी किमान १०० पुस्तके तरी वाचनालयाला भेट म्हणून दिली पाहिजेत. वाचनसंस्कृती वाढीसाठी कार्यरत असलेल्या अनेक मान्यवरांच्या कार्याचे उदाहरण देऊन त्यांचा नामोल्लेख देखील त्यांनी आवर्जून केला. तसेच वाचनालयांनी आता नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून काळानुरूप बदल स्वीकारायला पाहिजे आणि वाचकांना डिजिटल लायब्ररी सेवा उपलब्ध करून द्यावी असे मत व्यक्त करून ग्रंथालय भारतीच्या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे देवगिरी प्रांताचे अध्यक्ष प्रा. लक्ष्मीकांत पाठक यांची देखील उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे केंद्रीय सहसचिव रवींद्र गोविंद पांडे यांनी केले. कार्यक्रमादरम्यान डॉ. जगदीश कुलकर्णी, श्री. रवींद्र गुर्जर, प्रा. विश्वास नेरकर, डॉ. सत्यनारायण बाहेती आणि प्रा.हितेश ब्रिजवासी यांनी 'ग्रंथालय भारती' अंतर्गत केलेले कार्य आणि आलेल्या अनुभवांचे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आणि आभार-प्रदर्शन प्रा. हितेश ब्रिजवासी यांनी केले. या आभासी कार्यक्रमाला विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक, ग्रंथपाल तसेच महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते, लेखक-प्रकाशक, ग्रंथालयांचे पदाधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची संकल्पना 'ग्रंथालय भारती' जळगाव जिल्हा सचिव यांनी मांडली असून त्यास केंद्रीय सहसचिव श्री. रवींद्रजी पांडे यांनी मोलाची साथ देऊन कार्यक्रमाचे नियोजन केले. तर कार्यक्रमास डॉ. हेमंत येवले, श्री. ताराचंद पाटील. श्री. अनिकेत वारूळकर, श्री. ईश्वर राणे, सौ. मंगला मोरे आदींनी तांत्रिक साहाय्य दिले.

❑


**'ग्रंथ भारती दीपावली २०२१'ला हार्दिक शुभेच्छा!**

# हिंद नगर वाचनालय

रहितमपूर, जि. सातारा

# देशभक्त : नाथ घाणेकर

प्रा. डॉ. सुरेश गायकवाड

‘बोले तैसा चाले’ अशा गुणांनी युक्त व्यक्तिमत्त्व म्हणजे नाथ घाणेकर. नाथ घाणेकर म्हणजे टिळक-आगरकर यांचे पाईक. गांधी विचारधारेचे अनुयायी. अहिंसा, सत्य, सहिष्णुता याबरोबरच प्रखर राष्ट्रनिष्ठा व राष्ट्रप्रेम त्यांच्या रोमारोमात वसत होते. समुच्या आदर्शांचे ते एक मूर्तिमंत उदाहरण होते. उत्तुंग इच्छाशक्ती, विवेकपूर्ण बुद्धी, खादी पेहराव आणि बोलण्या-वागण्यात सत्यनिष्ठा म्हणजे नाथ घाणेकर. शेतकरी, कष्टकरी, दीनदु:खी, हरिजन, गिरीजन, माताभगिनी यांच्याविषयी त्यांच्या मनामध्ये अपार कणव दाटलेली असे. त्यामुळे त्यांच्या हाकेला मदतीचा हात देण्यासाठी ते तत्परतेने धावून जात. त्यांच्या पिढीचे ते प्रवक्ते व कर्ते समाजसुधारक होते. हरिजन वस्तीमध्ये रात्रशाळा चालविणारे शिक्षक, राष्ट्रीय शाळेचे चालक व शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूलच्या व्यायामशाळेतील कोच, देशाभिमानी कार्यकर्त्यांचे संगठन करणारे काँग्रेसचे नेता, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सभासद, सातारा नगरपालिकेचे सेवापरायण नगरसेवक, मुळशी धरणग्रस्तांचे पालनहार व झुंजार सत्याग्रही. समाज मनाची स्पंदने टिपणारे, सहृदय साहित्यिक अशी विविध गुणवैशिष्ट्ये सामावून साकारलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे नाथ घाणेकर.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेसच्या नाकर्तेपणावर नावाजलेल्या व विविध पक्षांमध्ये दाखल झालेल्या दिग्गज नेत्यांप्रमाणेच नाथ घाणेकर बहुधा १९५० नंतर ‘कम्युनिस्ट’ प्रणालीकडे वळले. (भारतीय कम्युनिस्ट पार्टी) एकेकाळी काँग्रेसचे सातारा जिल्हाध्यक्ष असणारे नाथ ‘कम्युनिस्ट’ झाल्यामुळे समाजातील एका विशिष्ट वर्गाकडून ते दुर्लक्षित केले गेले. तसा त्यांच्यासाठी हा काळ कठीण होता. परंतु त्यांच्या ठायी असणाऱ्या तत्त्वनिष्ठेचे बोट धरून ते आपला पथ निर्धारपूर्वक चालवत राहिले. त्या दिवसांचे वर्णन त्यांनी एके ठिकाणी केले आहे.

‘मित्रांनी मज सोडले न उरले कोणी सगे सोयरे
नाही द्रव्य, न गेह, शेत न मला, कीर्ती न माझी उरे
ना शारीरिक, बुद्धिचे बल मला रोगी सदाचा पुरा
क्रांतीच्या परिदर्शनार्थ जगणे हा लागला धोसरा’

घाणेकरांच्या घरावरून पश्चिमेस जाणाऱ्या रस्त्यावर माझे घर आहे. जाता-येता अण्णांची (नाथ घाणेकर यांचे पुतणे) भेट व्हायची. एका भेटीत नाथ घाणेकरांचा विषय निघाला. त्या वेळी त्यांनी मला एक प्रसंग सांगितला तो असा. ‘सातारा येथील एका सार्वजनिक संस्थेच्या सभागृहाला लावण्यासाठी त्यांना नाथ घाणेकर यांचे तैलचित्र मागण्यात आले. एका सिद्धहस्त चित्रकारांकडून आण्णांनी नाथांचे तैलचित्र काढून घेतले. यासाठी एक महिन्याचा कालावधी व्यतीत झाला. सामाजिक संस्थेतील मासिक मीटिंगमध्ये एका संचालकाने मुद्दा मांडला. ‘नाथ घाणेकर कम्युनिस्ट होते, त्यांचे तैलचित्र या सभागृहात लावण्यास माझा विरोध आहे.’ आणखी काही संचालकांनी त्यांच्या सुरात सूर मिसळला आणि नाथ घाणेकरांचे तैलचित्र लावण्याचा ठराव फेटाळण्यात आला. आण्णा मला ही हकिकत सांगत असताना त्यांना जितका खेद वाटत होता, त्यापेक्षा त्यांना संताप अनावर झाल्याचे मला स्पष्ट जाणवत होते. पण बदलाची किंमत त्यांच्या पश्चात् नाथ घाणेकर यांना मोजावी लागली होती. ती घाणेकर कुटुंबीयासाठी क्लेशदायी होती. त्यांच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक कार्याला त्यांच्या एका निर्णयाने इतके विस्मृत केले. यामुळे मीही विस्मित झालो. आज पक्ष बदलला की मंत्रीपद बहाल केलं जातंय. हा काळाचा महिमाच म्हणावा लागेल, असे उगीचच माझ्या मनात येऊन गेले. आज आपण हे किती सहजतेने स्वीकारतो नाही का?

नाथ घाणेकर यांचे पूर्ण नाव पंढरीनाथ वामन घाणेकर. अनाथांचे वाली म्हणून लोक त्यांना ‘नाथ’ म्हणत असत. पंढरीनाथ या नावापेक्षा नाथ हे नाव रूढ व प्रिय झाले. दुसरे असे की आपल्याकडे जोडनावामधील नाव बोली व्यवहारामध्ये लोक घेत असतात, त्यानुसार पंढरीनाथ यामध्ये कोणी पंढरी म्हणेल. लोकांनी नाथ म्हणणे पसंत केले. पुणे जिल्ह्यातील

‘राजुरी’ हे त्यांचे मूळ गाव. सन १८८८मध्ये नाथांचा राजुरीत जन्म झाला. वकिली व्यवसायानिमित्त वामनराव सातारला स्थायिक झाले. नाथांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सातारा येथे झाले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी नाथांनी पुणे येथील डेक्कन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. सन १९०८ साली ते इंटर झाले. शालेय जीवनापासूनच त्यांना वाचनाची गोडी लागली होती. डेक्कन कॉलेजमधील ग्रंथालयाने त्यांच्यातील वाचनाची गोडी वृद्धिंगत केली. या काळात त्यांनी शेक्सपिअरची नाटके, शेले, बायरन, वर्डस्वर्थ, स्कॉट, मिल्टन तसेच टेनिसन यांचे कवितासंग्रह वाचून काढले. ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, तुकाराम यांच्या ग्रंथांबरोबरच संस्कृत व मराठी वाङ्मय अभ्यासले. जोडीला स्वत:ची नाटके, कादंबऱ्या आणि कविता लिहिण्यात ते रमून गेले.परिणामस्वरूप अभ्यासाकडे त्यांचे दुर्लक्ष झाले. आणि ते बी.ए. अनुत्तीर्ण झाले. पुन्हा परीक्षेला बसण्याचा त्यांनी प्रयत्न केला; पण ते असफल झाले.

पुणे येथील वास्तव्यात एक गोष्ट मात्र अशी घडली जी त्यांच्या जीवनाची उद्दिष्टे ठरवून गेली. त्यांनी टिळक, आगरकर, न. चिं. केळकर यांची व्याख्याने व लेखन मन:पूर्वक ऐकली व वाचली. कवी-हृदयाच्या संवेदनशील नाथांच्या मनावर त्याचा सुयोग्य प्रभाव व परिणाम झाला. त्याच वेळी त्यांनी ‘राष्ट्रकार्य हेच आपले जीवनध्येय आहे,’ हे ठरवून टाकले. याच काळात त्यांनी सामाजिक सुधारणा, स्वदेशीचा स्वीकार, परदेशी मालाचा बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार व स्वराज्यप्राप्तीसाठी आपले जीवन समर्पित करण्याची प्रतिज्ञा घेतली.

सन १९१२-१३च्या दरम्यान नाथ सातारला आले. न्यू इंग्लिश स्कूलमध्ये जेमतेम पाचसहा वर्षे नोकरी केली. सन १९२० साली नाथ घाणेकर यांनी ‘राष्ट्रीय शाळा’ सुरू केली. आणि आपल्या आवडीच्या ज्ञानयज्ञास प्रारंभ केला. अल्पावधीतच शाळा नावारूपाला आली. म. गांधी सातारला आले त्या वेळी ‘राष्ट्रीय शाळेचे’ कार्य पाहून नाथ घाणेकर यांना त्यांनी दौऱ्यात जमलेल्या निधीपैकी एक हजार रुपयांची थैली अर्पण केली. हा सोहळा संपन्न होत असताना गांधी मैदानावर जमलेल्या श्रोतृसमुदायाने टाळ्यांचा गजर केला. नाथ घाणेकरांच्या कार्यास सार्वजनिकरीत्या मिळालेली ही शाबासकी होती. राष्ट्रपिता म. गांधींनी केलेल्या कौतुकाने नाथ घाणेकर कृतकृत्य झाले. ज्यांना आपण आपले दैवत मानले ते दैवत आज आपल्यावर प्रसन्न झाल्याचे त्यांनी या निमित्ताने पाहिले. आपण पाहिलेले एक स्वप्न सत्यात उतरलेले पाहून ते समाधान पावले. जोमाने कार्य करण्याची त्यांना प्रेरणा मिळाली. परंतु हे समाधान जास्त काळ त्यांना अनुभवता आले नाही. या शाळेतून राष्ट्रीय बाण्याचे विद्यार्थी बाहेर पडून स्वदेशीचा व स्वराज्याचा नारा बुलंद करतील, या भयापोटी सन १९३२ मध्ये ब्रिटिशांनी ही शाळा ताब्यात घेतली. सन १९३५नंतर ही शाळा कायमस्वरूपी बंद पडली. नाथ घाणेकरांनी उरी बाळगलेले राष्ट्रीय शिक्षण प्रसाराचे एक स्वप्न भंग पावले. नाथ घाणेकर कमालीचे अस्वस्थ झाले. पण थोड्याच दिवसात त्यांनी ही अस्वस्थता झटकून टाकली व ते नव्या जोमाने कामास सिद्ध झाले.

स्वदेशीच्या प्रचारासाठी त्यांनी कंबर कसली. सूतकताईस चरख्यावर प्रारंभ केला. खादीची वस्त्रे तयार केली. त्यांनी आजन्म खादीचे वस्त्र परिधान केले. नाथांनी राजपथावर ‘स्वदेशी भांडार’ सुरू केले. आराम हॉटेलशेजारी स्वदेशी भांडारचा बोर्ड आपल्या दृष्टीस पडतो.

सन १९४० पर्यंत नाथ घाणेकर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यकारिणीवर सदस्य होते. दोन वर्ष अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्षपद भूषविले.

सन १९२० साली ‘टाटा कंपनी’ने मुळा नदीवर मुळशी तालुक्यात धरण बांधले. विद्युतनिर्मिती केली. या धरणामुळे ५० गावे विस्थापित झाली. विस्थापितांना जमिनीचा मोबदला व गेलेल्या जमिनीच्या बदल्यात कसायत जमिनी देण्याबाबत दिरंगाई होऊ लागली. विस्थापितांना न्याय मिळवून देण्यासाठी सेनापती बापट यांनी विस्थापितांचे नेतृत्व केले. या लढ्याला ‘मुळशी सत्याग्रह’ म्हणून ओळखले जाते. नाथ घाणेकर यांनी सेनापती बापट यांच्याबरोबर या सत्याग्रहामध्ये भाग घेतला. यामध्ये नाथ घाणेकर यांना दोन वेळा कारावास भोगावा लागला. सेनापती बापट यांना सात वर्षे कारावास भोगावा लागला. ब्रिटिश सरकार व धनदांडगे टाटा यांमुळे विस्थापित व सत्याग्रही यांची ससेहोलपट झाली. शंभर वर्षानंतर आजसुद्धा विस्थापितांचे प्रश्न मार्गी लागलेत का, याविषयी नेमकेपणाने कोणी सांगत नाही.

सन १९३०-३१च्या दरम्यान सातारा तालुक्यातील जाळगेवाडी येथे जळित झाले. त्यामध्ये अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले. त्यांच्यासाठी मदत गोळा करण्यासाठी नाथ घाणेकर वाडीवस्तीवर फिरले. जेवणाची, झोपण्याची आबाळ झाली. त्यांनी खूप श्रम केले. एकसारख्या दगदगीमुळे त्यांना अर्धांगवायूचा तीव्र झटका आला. या दुखण्यातून बरे होण्यासाठी त्यांना दोन वर्षांचा कालावधी लागला, त्यातून ते सावरले आणि १९३० साली जागतिक

महायुद्धाबाबत काँग्रेसच्या ठरावाचा प्रचार करण्यासाठी जिल्हाभर त्यांनी दौरे काढले. पुन्हा शरीरावर अतिश्रमामुळे ताण आला. प्रकृती पुन्हा नाजूक झाली.

या ठिकाणी त्यांच्या महाविद्यालयीन जीवनातील एक आठवण मला सांगायची आहे, ती अशी. सन १९१२च्या दरम्यान नाथ घाणेकर यांनी विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार करणारे 'यमुना' हे नाटक लिहिले होते. होस्टेलमध्ये मित्रांच्या समोर त्यांनी या नाटकाचे वाचन केले. एक मित्र खट्याळपणे नाथांना म्हणाला, ''नाटक वगैरे लिहिणे ठीक आहे. नाथ, खरं सांग विधवेशी तू तरी विवाह करशील का?''

कवि हृदयाचे नाथ त्याच्या या प्रश्नाने किंचित संतापले; परंतु स्वत:ला सावरत निर्धारपूर्वक स्वरात म्हणाले, ''मी अशी आज प्रतिज्ञा करतो की, मी विधवेशी विवाह करीन. अन्यथा अविवाहित राहीन.'' उपस्थित सर्व मित्र नाथांच्या बोलण्याने स्तंभित झाले. नाथांचा एकूण आवेश पाहून कोणाला काही बोलण्याची हिंमत झाली नाही. प्रश्नकर्ता मित्र एवढंच पुटपुटला, ''नाथांना दुखावण्याचा माझा हेतू नव्हता.'' बाकीच्यांनी त्याला गप्प केलं. नाटकावरच्या चर्चेचे असे हे पर्यावसान नाथांच्या जीवनाला मात्र कलाटणी देऊन गेले.

सातारला आल्यानंतर घाणेकर कुटुंबीयांशी परिचित एक बालविधवा होती. तिच्या घरी जाऊन तिच्या आईवडिलांना नाथ म्हणाले, ''योग्यसमयी मी आपल्या बालविधवा कन्येशी विवाह करेन, असे आपणस वचन देतो.'' आणि पुढे जाऊन सन १९३८च्या दरम्यान नाथांनी बालविधवेच्या घरी जाऊन मी तुमच्या कन्येशी विवाह करण्यास तयार आहे. त्या वेळी तिथे उपस्थित असणारी बालविधवा म्हणाली, ''घाणेकर, मला सशक्त व निरोगी पुरुषाशी विवाह करायचा आहे. तुमच्यासारख्या व्याधीग्रस्त पुरुषाशी नाही.'' बालविधवेचे हे जळजळीत शब्द ऐकून त्यांना आपल्यावर घनघोर विजेचा लोळच कोसळतोय असे वाटले. एका क्षणातच त्या आघातातून ते सावरले. बालविधवेकडे पाहात ते म्हणाले, ''तुमचे हे मत असेल तर मीही इथे सांगू इच्छितो की, मी आजन्म अविवाहित राहीन.'' एवढे म्हणून नाथ त्या घरातून बाहेर पडले.

एका तत्त्वनिष्ठ सेवाव्रतीला, समाजसुधारकाला समाजाची स्पंदने शब्दबद्ध करणाऱ्या साहित्यिकाला नियतीने केलेला कुठराघात होता. त्यांनी तो शांतपणे सहन केला. नाथांचे हृदय किती विशाल होते याची आपण कल्पना करू शकतो.

अशाप्रकारे विधवा पुनर्विवाहाचे त्यांनी पाहिलेले दुसरे स्वप्न भंग पावले.

नाथ कशाप्रकारचे सच्चे समाजसेवक होते, याची एक हकिकत आण्णांनी मला सांगितली. नाथ सातारा नगरपालिकेचे तीन वर्षे नगरसेवक होते. त्या वेळेस नगरसेवपदाची मुदत तीन वर्षे असावी असे दिसते. राजकारण व समाजकारणाचा वारसा त्यांचे पिताश्री वामनराव घाणेकर यांच्याकडून चालत आला होता असे दिसते. कारण वामनराव सहा वर्षे नगरसेवक होते. नाथांचे कनिष्ठ बंधू नीलकंठ घाणेकर एक वर्ष कलेक्टर नियुक्त नगरसेवक होते, असे 'सातारा शहर नगरपालिका शताब्दिमहोत्सव स्मृतिग्रंथ १९५४' यांत प्रसिद्ध केले आहे. या तिघांचे फोटो आपणास या ग्रंथात पाहण्यास मिळतात. त्यांच्या नगरसेवक पदाचे वर्ष देण्यात आले नाही. हे असो.

नाथ मंगळवार पेठेतून निवडून आले होते. गायकवाड आळीतील सार्वजनिक शौचालयातील जुन्या पद्धतीची मैल्याची टोपली भरून वाहत होती. सर्वत्र दुर्गंधीचे साम्राज्य होते. तेथील नागरिकांनी पालिकेत रीतसर अर्ज दिला होता. परंतु काही कार्यवाही होत नाही, हे पाहून गायकवाड आळीतील नागरिक नाथांच्याकडे तक्रार घेऊन आले. नाथांनी सर्वांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले व मी काय करायचे ते करतो. तुम्ही एक दिवस त्रास सोसा. तुम्हाला जो त्रास होतोय त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. नगरसेवक म्हणून मीही यास जबाबदार आहे. तुम्ही मला क्षमा करावी, ही मी तुम्हाला हात जोडून विनंती करतो व त्यांनी सर्वांना हात जोडले. जमलेले सर्व जण एका स्वरात म्हणाले, ''अहो नाथ, तुम्ही हे काय करताय. तुम्ही आम्हाला हात जोडावेत यासाठी नव्हतो आलो आम्ही!'' यावर नाथ उद्‌गारले, ''ठीक आहे! मी जातीने लक्ष घालून हे काम करतो. तुम्ही निश्चिंत राहा.'' सर्व जण आपापल्या घरी निघून गेले.

रात्रीचे जेवण झाल्यानंतर नाथ आपल्या बिछान्यावर आडवे झाले. ते मनातल्या मनात पुटपुटले, 'लोकांनी हा त्रास का सहन करायचा? ते वेळच्या वेळी पालिकेला कर भरतायत. पालिकेने आपली कर्तव्ये नको का पार पाडायला? लोकांच्या आरोग्याचा विचार केला पाहिजे. हे असे झालेच कसे? मलाच आता काहीतरी केले पाहिजे.' मनाशी काही निश्चय करून ते निद्राधीन झाले.

दुसऱ्या दिवशी कोंबडा आरवण्याआधी ते उठले. १५ लिटर रॉकेलचा मोकळा डबा, खोरे, टिकाव व खराटा घेऊन तोंडाला पंचा बांधून ते बाहेर पडले. सार्वजनिक संडासाच्या पाठीमागे थोड्या अंतरावर त्यांनी गोल व खोल खड्डा खणला. माती ओलसर व

भुसभुशीत असल्यामुळे ते काम तासा अर्ध्या तासात उरकले. दोन्ही हातात कोपरापर्यंत प्लॅस्टिकच्या पिशवया बांधल्या. टोपलीबाहेर वाहिलेला मैला खोऱ्याने डब्यात टाकला. मैल्याची टोपली डब्यात रिकामी केली. तो डबा त्या खड्ड्यात नेऊन ओतला. मेहतर वाड्यातील वाल्मिकी मेहतराची छबी त्यांच्या डोळ्यापुढे तरळून गेली. हुं की चू न करता हयातभर त्याने हे काम केले. तासा दोन तासासाठी मी हे काम करतोय म्हणजे काही विशेष नाही. तो माझ्यासारखाच माणूस आहे. 'जावे त्याच्या वंशा' हाही अनुभव घेता आला हे ठीकच. अशा विचारात गर्क झाल्यामुळे त्यांचे स्वच्छतेचे काम पूर्ण झाले. काढलेल्या खड्ड्यातील माती खड्ड्यावर खोऱ्याने ओढली. बाजूला वाहणाऱ्या छोट्याशा ओहळामध्ये त्यांनी डबा, खराटा, खोरे, टिकाव स्वच्छ धुतले. बाजूला ठेवले. आपले हातपाय स्वच्छ धुतले. 'लोका सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडे पाषाण' असे आपण नाही, याची त्यांनी प्रचिती (प्रतीती) अनुभवली. 'आधी केले मग सांगितले,' या पठडीतील ते कर्ते समाजसुधारक होते. ते घराकडे जाण्याच्या रस्त्यावर आले. प्रात:र्विधीसाठी आलेल्या दोघांनी नाथांना पाहिले. नाथ काही न बोलता आपली वाट चालत राहिले. ते दोघे इसम शरीरधर्म विसरून नाथांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे आश्चर्यचकित होऊन पाहात राहिले. जो जो प्रात:र्विधीला आला तो तो स्वच्छ शौचालय पाहून आश्चर्यचकित झाला. त्या दोन इसमांनी नाथांनी शौचालय स्वच्छ केल्याची वार्ता घराघरात पोहोचवली. वाऱ्याच्या वेगाने ही बातमी पालिकेत व नगराध्यक्षापर्यंत जाऊन धडकली. नगराध्यक्ष नाथांच्या निवासी आले. नाथांशी बोलायला कशी सुरुवात करावी, या विचारात नगराध्यक्ष बरेच रेंगाळले. मग नाथांनीच नगराध्यक्षांच्याकडे नजर रोखत बोलायला सुरुवात केली. लोकांनी आपल्याला निवडून दिले. आपल्यावर विश्वास टाकला. नगराची सेवा करणारे म्हणून लोक आपल्याला नगरसेवक म्हणतात. गायकवाड आळीतील नागरिकांनी पालिकेत शौचालय तुंबले आहे, असा अर्ज दिलाय त्याच्यावर कार्यवाही का झाली नाही ते प्रथम पाहा. नाथांचा एकूण नूर पाहून नगराध्यक्ष होऽऽ होऽऽ पाहतो म्हणून तेथून बाहेर पडले. सकाळची वेळ असूनही कपाळावर घाम आल्याचे त्यांना जाणवले. खिशातील रुमाल काढून त्यांनी कपाळ टिपले. स्वत:चे शौचालय परिवारातील प्रत्येकाने स्वच्छ केले पाहिजे, हा महात्मा गांधींचा सक्त नियम होता. म.गांधी स्वत: हे स्वच्छतेचे काम करत असत. म. गांधींचे सत्शिष्य नाथ घाणेकर हे असे नगरसेवक होते. सार्वजनिक शौचालय स्वच्छ करणारे मला वाटते ते एकमेव नगरसेवक असावेत. महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात! नाथांचा सार्वजनिक स्वच्छतेचा हा गुण एकमेव अद्वितीय असाच होता. धन्य ते नाथ घाणेकर!!

नाथ घाणेकर यांचे सामाजिक, शैक्षणिक राजकीय व आपल्या व्याख्यानाद्वारे केलेले समाज प्रबोधन याचबरोबर नाथ घाणेकर यांनी केलेली साहित्य शारदेची सेवा पाहून सेनापती बापट यांनी पुढाकार घेऊन सन १९३८ मध्ये नाथ घाणेकर यांचा नागरी सत्कार करण्याचे ठरविले. मुळशी सत्याग्रहाचे नेतृत्व बापट यांनी स्वीकारले. टाटा कंपनी व ब्रिटिशांशी त्यांनी ज्या निर्धाराने लढा लढला सात वर्षाचा कारावास भोगला. त्यामुळे त्यांना विस्थापितांनी सेनापती ही उपाधी बहाल केली. अशा झुंजार सेनापतींना नाथ 'नाही', 'नको' असे म्हणू शकले नाहीत. त्यामुळे हा नागरी सत्कार स्वीकारण्यास अनुमती दिली. या सत्कारप्रसंगी नाथ घाणेकर यांना एक हजार पाचशे रुपयांची थैली अर्पण करण्यात आली. म. गांधींच्या हस्ते पहिला व सेनापती बापट यांचे हस्ते दुसरा नागरी सत्कार प्राप्त करण्याचे भाग्य नाथ घाणेकर यांना लाभले. नाथ घाणेकरांचे व्यक्तिमत्त्व उत्तुंग होते. हेच यातून दिसून येते.

नाथ घाणेकर यांनी एकूण १८ नाटके, ५ कादंबऱ्या, गद्य व पद्य असे विपुल लेखन केले आहे. अण्णांनी मला 'नाथ घाणेकर समग्र कविता खंड पहिला' हा ग्रंथ दिला आहे. तो माझ्या संग्रही आहे. याचे संपादन शिवराम गोविंद भावे यांनी केले आहे. या ग्रंथाला पुरस्कार न. चिं. केळकर यांनी लिहिला आहे. साह्य प्रकाशक मंडळींनी हा ग्रंथ १९४२ साली आदर्श मुद्रणालय, रामाचा गोट, सातारा येथे मुद्रित करून प्रकाशित केला आहे. त्याची किंमत दोन रुपये व पृष्ठे ३३२ आहेत.

राष्ट्रकार्यासाठी निरपेक्ष बुद्धीने देह झिजवणाऱ्या नाथ घाणेकर यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८०व्या वर्षी म्हणजेच सन १९६८मध्ये निधन झाले. समाजकार्याचा एक झंझावात शांत झाला. राष्ट्रप्रेमाने चेतलेला वन्ही निमाला. घाणेकरांचा एक वंशदीप काळाने मालवला. समर्थ रामदासांचे, 'मरावे परी कीर्तिरूपे उरावे.' हे वचन आपल्या जीवित कार्याने सार्थ करून त्यांनी दशदिशांना आपल्या कार्याचा कीर्तिसुगंध पसरविला. घाणेकर कुटुंबीय व समस्त समाजाला याचा अनंत काळापर्यंत सार्थ अभिमान वाटत राहील. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त भारतमातेच्या या सुपुत्राला विनम्र अभिवादन!

**वंदे मातरम् !!**

❑



# निखळलेला तारा

## श्री. हेमंतराव कुलकर्णी यांचे दुःखद निधन

■

**श्रीराम ओक**

'बाळासाहेब' या नावाने परिचित असणारा आणि भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस आनंद देण्याचा जणू वसा घेतलेला एक तारा अचानक निखळला. पुणे मराठी ग्रंथालयाचे माजी कार्यवाह, अभ्यासिका निमंत्रक आणि वर्तमानात कार्यकारिणी सदस्य म्हणून कार्य करणारे हेमंतराव कुलकर्णी यांचे दि. ७ मे २०२१ रोजी वयाच्या ७५व्या वर्षी निधन झाले.

बाळासाहेब ग्रंथालयाच्या आवारात असले, की तेथील वातावरण चैतन्याने फुलून गेलेले असे. अभ्यासिकेत येणारे विद्यार्थी असोत अथवा ग्रंथालयाचे सभासद, त्यांच्याशी दिलखुलास बोलणारे बाळासाहेब आपले सामाजिक बंध जपत व्यवसायातील निवृत्तीनंतरही अगदी मागील काही दिवसांपर्यंत कार्यरत होते. मूळचे बांधकाम व्यावसायिक असणाऱ्या बाळासाहेबांनी वयपरत्वे कामाचा व्याप जरी कमी केला असला, तरीदेखील काही मोठी कामे त्यांच्याकडे आवर्जून येत होती आणि आपल्या अनुभवांच्या जोरावर ती योग्य प्रकारे पूर्णही करत होते. ही कामे करत असतानाही त्यांच्याकडे बराच वेळ मोकळा असे (अर्थात योग्य नियोजनामुळे) त्याचेही त्यांनी नियोजन केले होते आणि तेही सामाजिक कार्यासाठी.

बाळासाहेब सांगलीतील चिकुरडे गावचे. तेथे जन्म झाल्याचा त्यांना सार्थ अभिमान जसा होता, तसेच आपल्या सामाजिक कार्याचे श्रेयदेखील ते या गावालाच द्यायचे. या गावातून शहरात आल्यानंतर ज्या अडचणी आल्या होत्या, त्यांचा अनुभव, त्यांच्या कामात त्यांना उपयोगी पडत होता. हे काम करत असताना, आपण कोणतेही सामाजिक कार्य करत असल्याचा आविर्भाव अर्थातच त्यांच्या वागण्यातून दिसत नव्हता. त्यामुळेच आपल्या कार्यक्षेत्रात सर्वांचेच लाडके असणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे बाळासाहेब. त्यांचे अभ्यासिकेतील सर्व विद्यार्थ्यांवर बारीक लक्ष असे, विद्यार्थ्यांनी घडावे या तळमळीतून ते हे कार्य करीत होते.

अभ्यासिकेत येणारी बहुतांशी मुले गावाकडची. पुण्यासारख्या शहरी वातावरणात करियर घडविण्यासाठी आलेल्या या विद्यार्थ्यांपैकी अनेकांना पुण्यात आलेल्या दिवसांपासूनच अडचणींचा सामना करावा लागतो. राहण्याच्या जागेपासून जेवणाच्या व्यवस्थेपर्यंत. येथे आल्यानंतर जी मुले एका ध्येयाने झपाटलेली असतात; पण ज्यांना नजरेच्या टप्यातही ध्येय दिसत नाही, ती मुले निराश व्हायला लागतात. त्यांच्या उत्साहाचे

रूपांतर नैराश्यात होऊ लागते. अशा अनेक ठिकाणी बाळासाहेबांचे सामाजिक कार्य सुरू व्हायचे. या मुलांचे प्रश्न, त्यांचे नैराश्य बाळासाहेबांना कळायचाच अवकाश, की त्या मुलांना उभारी देण्यापासून त्यांचे प्रश्न चुटकीसरशी सोडवण्यासाठी ते लगेचच पुढे यायचे. या सगळ्यामधूनच बाळासाहेबांनी या मुलांचे प्रेम, जिव्हाळा, आपुलकी मिळवली होती. या सगळ्याचा परिपाक म्हणजे या मुलांचा अभ्यासातील आणि जीवनातीलही उत्साह वाढत होता. आपण घर सोडून आलोय; पण येथेही आपले माणूस आहे, या विश्वासाने मुले अभ्यास करायची. ते मुलांच्या अभ्यासाला प्रोत्साहन देण्यासाठी वेगवेगळे कार्यक्रम ठरवायचे, जेणेकरून येथे आलेला विद्यार्थी आरोग्यदायी वातावरणात अभ्यास करेल आणि जीवनातील योग्य मार्गावर वाटचाल करेल. त्यांना केवळ पुढे नेणेच नाही तर त्यांना स्वत:च्या विचारांवर, पायांवर उभे राहता यावे यासाठी बाळासाहेब सदैव नवीन गोष्टींसाठी आग्रही असायचे. बाळासाहेब देखील ग्रामीण भागातून आलेले असल्यामुळे त्यांची या मुलांबरोबर एक नाळ जोडली जायची.

बाळासाहेबांच्या घरातील वातावरण कडक होते. सूर्यनमस्कार आणि रोजचा व्यायाम झाला तरच दूध मिळणार असा आईवडिलांचा निग्रह. हे झाले नाही तर काहीही खायला-प्यायला मिळायचे नाही. त्यामुळे व्यायामाची सवय त्यांना लहानपणीच लागली होती. रा. स्व. संघाच्या वातावरणात वाढलेले असल्याने सर्व गोष्टी नियोजनबद्ध करणारे बाळासाहेब विद्यार्थ्यांमध्ये देखील शिस्तप्रियता यावी, म्हणून प्रयत्नशील असायचे.

शरीरात जसे रक्त सळसळत असते, तसे माणसांनी सतत ध्यास घेऊन काम केले पाहिजे आणि हसत जगले पाहिजे, सकारात्मक विचार चालू राहिले पाहिजेत, रडत बसण्यात अर्थ नसतो. जीवन आनंदी होण्यासाठी जगले व झटले पाहिजे हे बाळासाहेबांचे विचार होते. या विचारांनी कायमच विद्यार्थ्यांना, ग्रंथालयातील कर्मचारी वर्गाला ते प्रोत्साहित करायचे. सकाळ आणि संध्याकाळचे काही तास त्यांनी या कार्याला दिलेले होते. अनेक शारीरिक व्याधी, शस्त्रक्रियांमधून ठणठणीत बरे झाल्या-नंतरही त्यांनी आपले सामाजिक कार्य तेवढ्याच जोमाने सुरू ठेवले होते, तेही नवतरुणाच्या उत्साहात.

आपल्या वेळेचा सदुपयोग करून सामाजिक कार्यात अग्रेसर राहणाऱ्या बाळासाहेबांना भावपूर्ण श्रद्धांजली.

❑

कळविण्यास अतिशय दु:ख होत आहे की, सार्वजनिक वाचनालयाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या 'ग्रंथालय भारती' या संस्थेचे पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे आमंत्रक, पुणे मराठी ग्रंथालयाचे माजी कार्यवाह तसेच वर्तमान कार्यकारिणी सदस्य, ग्रंथालय क्षेत्रातील ज्येष्ठ कार्यकर्ते

**श्री. हेमंतराव कुलकर्णी**

यांचे आज रात्री पुणे येथे दु:खद निधन झाले.

मृत्यूसमयी ते ७५ वर्षाचे होते.

ग्रंथालय क्षेत्रातील एक अभ्यासू व्यक्ती होते.

त्यांच्या आत्म्याला शांती मिळो ही ईश्वर चरणी प्रार्थना.

'ग्रंथालय भारती'तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!

# संस्था-वृत्त

■

**रवींद्र पांडे**

मार्च २०१९ मध्ये देशात सर्वत्र कोरोना महामारीचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे संपूर्ण भारतात ताळेबंदी जाहीर झाली. त्या काळात बाहेर जाण्यास पूर्णतः मज्जाव करण्यात आल्यामुळे देशातील सर्वच संस्थांची कामे बंद होती. शासनाच्या आदेशानुसार 'ग्रंथालय भारती'तर्फे आयोजित सर्वच कार्यक्रम, मासिक त्रैमासिक बैठका रद्द करण्यात आल्या.

कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने 'ग्रंथालय भारती'च्या वर्धापनदिनानिमित्त दि. १६ फेब्रुवारी २०२० रोजी नागपूर येथील संस्थेच्या बजाजनगर येथील कार्यालयात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

रा.स्व. संघाचे विदर्भ प्रांत संपर्क प्रमुख श्री. अनिल जी. सांबरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मध्यप्रदेशातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि संगीततज्ज्ञ डॉ. भास्करराव खांडेकर हे होते. तर विशेष अतिथी म्हणून डॉ. विलास चिंतामण देशपांडे, नागपूर येथील 'लोकांची शाळा' संस्थेचे अध्यक्ष मधुकर ढोक हे होते. अतिशय मोजक्या लोकांच्या उपस्थितीत शासन नियमाला अनुसरून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कोरोनाच्या काळात सर्व सार्वजनिक वाचनालये बंद असल्याने ग्रंथालय भारतीचे कुठलेही कार्यक्रम वाचनालयात आयोजित करता आले नाही. परंतु संस्थेचे मुखपत्र असलेल्या 'ग्रंथ भारती' या त्रैमासिकाच्या वर्ष २०१९ आणि वर्ष २०२०चा दिवाळी अंक हा ई-अंक म्हणून प्रकाशित करण्यात आला.

नागपूर येथील विदर्भ साहित्य संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त ग्रंथसहवासतर्फे 'ग्रंथालयांची शतकोत्तर आव्हाने' विषयावर एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादात भाग घेण्यासाठी राष्ट्रीय वाचनालयाचे अध्यक्ष श्री. पद्मश्री तांबेकर यांना मुख्य वक्ते म्हणून आमंत्रित केले होते, तर ग्रंथालय भारतीचे केंद्रीय सहसचिव रवींद्र गोविंद पांडे यांना विशेष अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमानंतर ग्रंथदिंडी काढण्यात आली.

ग्रंथालय भारतीतर्फे वाचन प्रेरणा दिननिमित्त दि. २३-१०-२०२१ रोजी एका आभासी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला केंद्रीय भुपृष्ठ आणि परिवहन मंत्री मा.श्री. नितीन गडकरी हे मुख्य वक्ते म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रांताचे अध्यक्ष प्रा. लक्ष्मीकांत पाठक हे होते. या वेळी श्री. गडकरी यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात डॉ. सत्यनारायण बाहेती, प्रा. विश्वास नेरकर, डॉ. जगदीश कुळकर्णी, श्री. रवींद्र गुर्जर, डॉ. अभय टोंगो, श्री. वामन निचंते यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रीय सहसचिव रवींद्र गोविंद पांडे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार-प्रदर्शन प्रा. हितेश ब्रिजवासी यांनी केले. या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील अनेक मान्यवर, ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते, ग्रंथालयांचे पदाधिकारी, शाळा-महाविद्यालयातील ग्रंथपाल फेसबुक लाइव्हवर सहभागी झाले होते.

❑

**(रवींद्र गोविंद पांडे हे 'ग्रंथालय भारती'चे केंद्रीय सहसचिव आहेत. भ्रमणध्वनी ९३२५४५७०५२)**

# कविता... कविता... कविता...

**कविता ... आजीनातीच्या नात्याची**
**देवाला नातीसवे लहान होण्याचे दान मागणारी.**

## शैशवगान

दे गा देवा! मज शैशव दान
फिरूनी एकदा होईन सान

मऊ दुपट्यातील गोंडस ध्यान
लुक लुक डोळे चांदण खाण

झुला नक्षत्रांचा बांधीला
राघूमोर चांदवा झुलला

मज हाती हळू सोपविला
अतीव आनंदे जोजवीला

झुलत्या डुलत्या बडबडगान
विसरून जाईन आयुष्यमान

सोनपरीचा तो घुंघुरचाळा
मोरपिशी स्पर्श लडिवाळा

रांगत सुटली माझी राधा
बालकृष्णासह लंगडा चाळा

मिश्किल हास्यासवे ठाकली
खेळू आठवांची भातुकली

ठकी फडताळातील उगा हासली
चूल बोळकी हाती उमगली

डोळ्यात खुशीची वरात सजली
बालखुणांच्या भेटल्या राशी

सोपविल्या ही नाती हाती
परकर पोलकी नि बाळलेणी

दिलेस देवा! शैशव दान
आजी मी, परी झाले लहान

नाती सवे लपंडाव खेळीन
फुगड्या मुरक्या मी घालीन

बांगड्या गजरे नि माळीन
सजले धजले शैशवध्यान

गाऊ दोघी शैशवगान...
शैशवगान...

**डॉ. अंजली ठोंबरे, पुणे**

## अंधारगर्भी...

स्वप्नांची दृष्ट काढण्या
एक चांदणी रेंगाळलेली
दिसली मज खिडकीतून
जुई शेजारी ठाकलेली

अल्याड मी पल्याड ती
रात पापणीवर उतरलेली
इवल्याश्या देहावरती
धुंद सावली मुसमुसलेली

मदगंध रातराणीसम
चंद्रिका खट्याळ हसते
ऋतुसंग तिला झालेला
चंद्राला सांगु पहाते

आसक्त चंद्रही होतो
तो गोड इशारा करतो
क्षितिजी मात्र निमिषांत
सूर्यरथ दौडत येतो

स्वप्न स्वप्नच राहते
फसवी आशा उरते
स्वप्नांची दृष्ट काढण्या
चंद्रिका मात्र रेंगाळते

**डॉ. अंजली ठोंबरे, पुणे**

## ती रात्र निश:ब्द होती

ती रात्र निश:ब्द होती
वारा कुशीत वेढलेली
केवड्याच्या बनाभोवती
अत्तर कुपी जागलेली

कुस बदलत्या वाऱ्याला
हलकेच वळून लगटली
गंधीत तनुवेलींनाही
सहजी जाग आली

बोचऱ्या थंडीसवे
वारा उधाणलेला
भवतीचे सोडून भान
डोळ्यात गुंतलेला

ओठांच्या थरथरीला
वेढीले अवकाशी त्याने
मोरपिशी शहारलेला
फुलविला देह किनारा

स्पर्शाच्या लाटेसरशी
तो पवन बेभान दिसला
घनदाट कुंतलात...
मल्हार सांडताना...

झिंग ओलेती देऊन गेला...

**अंजली ठोंबरे, पुणे**



# तो...

पाऊस माझ्या घरात येताना थोडे भान ठेवून येतो
दवबिंदूसारखे तुषार मला भेट म्हणून आणतो
त्याचे स्वागत करताना चेहरा अधिकच सुंदर होतो
टर्किश टॉवेल देऊन हाती कुठे ठेवू कुठे बसवू असे मला होते...।
पाहुणचार करताना किती भांबावते...
हळूच गालात हसून, तो बे विंडोमध्ये स्थिरावतो
खिडकीतून पर्वती दिसताच भाईबंधांना हातही हलवतो...।
ओलेत्या पावसाला पाणी कसे विचारावे
म्हणून मी अवघडते ...तर आलं घातलेला
चहा हवा आवाज कानी येतो...
चहाचा वाफाळता कप भज्यांची प्लेट मी समोर ठेवताच पाऊस खुशाल होतो...
जायला मी वळते तोच पाठमोऱ्या मला विळखा जो बसतो.
पाऊस मला घेऊन घरभर नाचतो ।...
अरे, अरे ओलं होतंय म्हणे तो... तो मात्र निथळतच राहतो...

**अंजली ठोंबरे, पुणे.**



# नातं गुरुशिष्याचं

गुरुशिष्याचं नातं सदैव अनमोल असतं
हे नातं म्हणजे प्रतीक असतं निरागसतेचं
गुरु म्हणजे परमेश्वर मानत असतात मुलं
त्याला तडा जाऊ न देणं कर्तव्य असे गुरुचं

चातकासारखी वाट पाहणारी ही बालकं निरागस
बाई शाळेत येताच फुलासारखी उमलतात गोंडस
दोघांचं ऋणानुबंधाचं नातं अतूट असतं
ते शेवटच्या क्षणापर्यंत कधीच संपत नसतं

शिष्य पीत असतात गुरुकडून ज्ञानाचा अखंड झरा
त्यांना उपयोगी पडतो ज्ञानाचा अखंड मंत्र खरा
आईपेक्षाही ते देतात जीवनात गुरुला अग्रभागी मान
त्यांनाच मिळत जाईल तिथं पहिल्या नंबरचं स्थान

म्हणूनच गुरुनं प्रत्येक मूल आपलं म्हणून शिकवावं
प्रत्येक शिष्याच्या हृदयावर अधिराज्य गाजवावं
प्रत्येक गुरुला शिष्य ठेवेल शेपटपर्यंत मनात
गुरुला पहिल्यासारखं स्थान मिळेल प्रत्येक घरात

**संगीता साळुंखे, पुणे.**



# उदे गं अंबे उदे...

उदे गं अंबे उदे
अजिंक्यगड निवासिनी
मंगला आई उदे उदे...
तुझ्या कृपेने
भगवा अटकेपार फडकला
उदे गं अंबे उदे...

सज्ञनगड निवासिनी
आंगला आई उदे उदे...
अकरा मारुती उभे ठाकले
राजारामाच्या पाठी
पराक्रमाची गाथामाई
कोयना–कृष्णाई
उदे गं अंबे उदे...

प्रतापगड निवासिनी
जय भवानी उदे उदे...
तुझा महिमा किती गावा
गर्देस मिळवुनि अफझला
विजयी राजा शिवाजी झाला
उदे गं अंबे उदे...

सकलगडाच्या आई उदे
उदे ग शक्तिरूपिणी
देई उर्जा आम्हां सर्वा
विनवणी हीच तुझे पायी
शुभ होय नवरात्री
उदे गं अंबे उदे...

**– सुरेश गायकवाड**

# वरदहस्त तुझा लाभू दे

जगद्‌उद्धारक परम पवित्र
अंबे चरण कमल हे तुझे,
हृदयी आमच्या नित्य विराजती
हे परमभाग्य आमुचे

ब्रह्मा विष्णु आणि महेशाची
तू अनसूया माऊली,
तू आदिमाया ब्रह्म स्वरुपिणी
जगताची अधिकारिणी.

जन्म–मृत्यूच्या फेऱ्यातून
मनुजा मुक्त तू करिशी,
वरदहस्त तुझा लाभू दे
आम्हा प्रिय तो अमृताहुनि

**– सुरेश गायकवाड**

## शुभ हो घटस्थापना

शरदऋतुतील नवरात्र
ही शुभ हो घटस्थापना
सफल हो मनोकामना,
ब्रह्मा, विष्णु आणि महेशासह
देवी लक्ष्मीची आराधना

लक्ष्मी दुर्गा काली माता
येती सवे घेऊनि पद्मावती,
सर्व कार्य सिद्धीस नेती
सर्वा म्हणती 'शुभंभवतु'.

ब्रह्मांडातील सर्व शक्ती
घटामध्ये येती मिळुनि,
होय मंगल पवित्र पावन
सर्व चराचर अन् अवनी

बीज पेरुनि नव सृजनाचे
दीप उजळविले 'मांगल्या'चे
करती आरती तेजाची.

शोभा अशी नवरात्रीची
अखंड उज्वल ऊर्जेची
दु:खांना हरवून
गाऊ आनंदाने गान.

**– सुरेश गायकवाड**

## हर जागर

हर हर महादेव
जागर मी मांडला,
आदिशक्तीचा
उद्‌घोष मी केला

शिवाला संचलित करिशी
तू प्रेरणा त्याची शक्ती,
तूच व्यक्त अव्यक्ताला
माते, सजग करिशी.

दु:खी कष्टी जिवाला
आधार शिवमंत्र,
म्हणूनि जागविती भक्त
हरजागर रात्र

रूपे शक्तिची येती
लोकसंस्कृतिच्या कवनात,
गाती गोंधळी, डौरकार
आराधी संबळ वाजवणार.

जागर करता रात संपती
पूर्व दिशेला येते लाली,
हर हर महादेव
सारे गजर करती

**– सुरेश गायकवाड**



## मुलगी

मुलगी म्हणजे गोड साखर
मुलगी असते दयेचा सागर
मुलगी दोन्ही घरचा आधार

मुलगी जशी तलवारीची धार
मुलींना द्यायचे चांगले संस्कार
मुलगीच पेलते संसाराचा भार

मुलीविना धरणीमाता निराधार
मुलीशिवाय असे अपूर्ण संसार
मुलीची नसते कुणावर मदार

मुलीसाठी नका करू आहाकार
जन्माआधी करू नये तिचा संहार
तिच्यामुळेच होई जगाचा उद्धार

माय बाप ना करितो नमस्कार
मुलींचा करा मनापासून स्वीकार
आचरणात आणावा चांगला विचार

**– डॉ. अशोक पाटील**

# व्यथा

जमिनीला भेगा पडलेल्या बघून
लय काळीज माझं गेलं फाटून
पाऊस माझ्याशी खेळतो लपंडाव
अन् उधळून लावतो मांडलेला डाव
पण माझी व्यथा सांगू कुणाला?

पावसानं दडी मारल्यावर कुठं सांधावं
अन् लेकराचं लाड कसं पुरवावं
मी पुरता गेलो मनोमन खचून
घरच्या लक्ष्मीचं त्राण जातं निघून
पण माझी व्यथा सांगू कुणाला?

शेतात जरी पिकलं लाख मोलाचं सोनं
मुश्किल होतं माझं सोन्यासारखं जिणं
शेलका माल नेऊन बाजारात विकतो
कसलं बसलं निवडून खातो घरात
पण माझी व्यथा सांगू कुणाला?

चिमटा सदा घेतो सदा माझ्या पोटाला
का तर पोरंबाळं लागतील पोटापाण्याला
अशी ही माझी असे करुण कहाणी
हे सांगताना काळजाचं होतंय पाणी
पण माझी व्यथा सांगू कुणाला?



# शेतकरी बाप

पाखरांच्या चोचीतली निराळी ही गाणी,
झोपडीत नाही साधं प्यायला मला पाणी ।।
बाप होता अगदी माझा मनाचा साधा–भोळा,
सावकाराने त्याच्या हातचा हिसकावून घेतला गोळा।।

सावकाराच्या शेतात राबून सरली त्याची हयात,
पण तो कधीही म्हटला नाही माझ्या पायाला गोळा आला ।।
दिल्या आहेत सर्व गोष्टी त्याने आम्हाला,
साध्या चपला सुद्धा नाहीत त्याच्वा पावलाला घालाया ।।

जेव्हा ठेवूशी वाटतो आम्हाला त्याच्या चरणी माथा,
नसतो तेव्हाच घरात आमचा खरा अन्नदाता।।
नसतं जेव्हा घरात आमच्या खायला दाणा–पाणी,
तेव्हा घाम गाळून शेतामंदी कष्ट करतो एका–एका घासासाठी।।

बाप होता अगदी माझा दयाळू मनाचा,
कष्ट करून जीव गेला माझ्या शेतकरी बापाचा।।
शेतकरी बाप माझा जगाचा पोशिंदा,
जीव गेला त्याचे तवा कुणी नाय आलं बघाया।।

**– अर्पिता संभाजी भोसले**

# स्त्री



पांढऱ्याशुभ्र कागदावर काळ्या शाईने उभ्या, आडव्या, तिरप्या रेघा माराव्या
आणि तयार व्हावी एक आकृती अगम्य आणि गूढ अगदी तिच्या सारखीच
त्या गूढतेमध्ये तिला जाणून घेण्याचा प्रयत्न करते मी.
मी प्रयत्न करते तिला शोधण्याचा आणि,
तिच्यात दडलेल्या प्रत्येक पैलूचा शोध घेताना सापडत जाते मीच मला स्वतःला.
मी शोधत राहते तिच्या निस्सीम आणि निस्वार्थ प्रेम करण्यामागचं कारण.
मी शोधत राहते तिच्यातली ती जी आजवर मला कळली नाही.
मी शोधत राहते तिच्या डोळ्यातल्या भावाचे अगणित अर्थ,
आणि ती मात्र माझ्या मूर्खपणावर फक्त मिश्किलपणे हसत राहते.
तिच्या इतरांसाठी जगण्याचं आणि परमार्थातील स्वार्थाचं,
कौतुक नव्हे तर आश्चर्य वाटत राहते मला पुन्हा पुन्हा.
कधी ती वाटते निवांत आणि शांत एखाद्या निर्मळ आणि स्तब्ध तळ्यासारखी,
तर कधी जणू उत्साहाने खळाळत वाहणारा झरा.
कधी वाटते ठाम एखाद्या निश्चल पर्वतासारखी,
तर कधी वाटते गोंधळलेली आणि भरकटलेली वादळात सापडलेल्या जहाजासारखी.
तेव्हा मला तिला सांगायचं असतं की मी आहे
पण त्या आधीच ती सावरते आणि मलाच सांगते, भिऊ नकोस मी आहे.
मी हसते मनातल्या मनात आणि पुन्हा एकदा शोधू लागते तिच्यातल्या मला आणि माझ्यातल्या तिला
पण ती सापडत नाही, उलट होत जाते अजूनच गूढ आणि रहस्यमय
आणि राहते कायम अगम्यच.

**– प्रा. धाराश्री प्रकाश कदम**




‘ग्रंथ भारती दीपावली २०२१’ला हार्दिक शुभेच्छा!

रवींद्र गुर्जर

<u>गायत्री साहित्य</u>

२६/१२, प्रतीकनगर, येरवडा, पुणे ४११००६.
भ्रमणध्वनी : ९८२३३२३३७०

ग्रंथ जीवनाचे सार ।
ग्रंथ मनाचा आधार ।।

हार्दिक शुभेच्छा!

**ललित पुस्तकांचे प्रमुख वितरक**

# विजया वितरण

कथा, कादंबरी, ललित, शैक्षणिक पुस्तके,
शैक्षणिक चार्ट यांचे वितरक

पाटील हाईट्स, बेसमेंट शॉप नं. ८/२१३, मंगळवार पेठ,
कृष्णा नाका, कराड ४१५ ११०.

भ्रमणध्वनी : ९४२३२६०६५१ / ९८५०१०७९

# यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. यवतमाळ

**मुख्य कार्यालय :** पाच कंदील चौक, यवतमाळ ४४५ ००१.
फोन नं. ०७२३२-२४२१८२

## बँकेच्या समस्त ग्राहकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा....

| **ठेवीवरील व्याजदर** | |
|---|---|
| **बचत ठेव ३.००%** | |
| **मुदत ठेव** | |
| ३० दिवस ते १८० दिवसाकरिता | ६.०० टक्के |
| १८१ दिवस ते १ वर्षापर्यंत | ६.७५ टक्के |
| १ वर्षाचे वर (१३ महिने) ते ३ वर्षापर्यंत | ६.७५ टक्के |
| ३ वर्षाचे दर (३७ महिने) ते ५ वर्षापर्यंत | ७.०० टक्के |

**Micro ATM व IMPS सुविधा उपलब्ध**

**शेती व बिगर शेती कर्ज योजनेचा सभासदांनी अवश्य लाभ घ्यावा.**

टीप : सविस्तर माहितीकरिता शाखा व्यवस्थापक यांचेशी संपर्क करावा.

**आपलीच माणसं.... आपल्या सेवेत....**

**अरविंद दे. देशपांडे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**एम. देवेंदर सिंह**
प्राधिकृत अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, यवतमाळ